# प्राथमिक शिक्षण पदविका

## (डी. ई. एल. इडी)

## पाठ्यक्रम - 503

## प्राथमिक स्तरावरील भाषा शिक्षण

## गट - 3

## वर्गातील भाषेचे अध्ययन

**NATIONAL INSTITUTE OF OPEN SCHOOLING**

A – 24/25, Institutional Area, Sector – 62, NOIDA

Gautam Buddha Nagar, UP – 201309

Website : www.nios.ac.in

# *गट - 3*

# *वर्गातील भाषेचे अध्ययन*

**गटातील घटक**

**घटक 7 :** साहित्य आणि भाषा

**घटक 8 :** वर्गातील भाषा अध्यापन पद्धती

**घटक 9 :** शैक्षणिक साहित्य : काही नवीन दृष्टीकोन

**घटक 10 :** मूल्यांकन

## घटकाची ओळख

घटक 7 ते 8 मध्ये आपण साहित्याचे भाषिक मर्म जाणून घेणार आहोत. आपण हे पाहणार आहोत की भाषा ग्रहणाची अशी कोणती मूलतत्त्वे असतात. जी विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता निर्माण करतात आणि ती कशी करतात. या बरोबरच भाषा अध्ययनातील काव्य, कथा, नाटक इ. ची भूमिका शोधणार आहोत.

9 वा घटक वर्गाध्यापनात भाषा शिकविण्यासाठी कोणती शैक्षणिक साधने वापरता येतात याशी संबंधित आहे आणि भाषा अध्यापन पद्धती परिणामकारक व्हावी म्हणून आपण कोणकोणत्या कृतींचे नियोजन करू शकतो. याचा विचार करणार आहोत हे सुस्पष्ट आहे की वर्गाध्यापनात रुची निर्माण केल्याशिवाय आणि विद्यार्थ्याला विचार करायला लावणारी शैक्षणिक साधने वापरल्याशिवाय त्याला वर्गात आवड वाटणार नाही व म्हणून त्याचे भाषा अध्ययन ही होणार नाही.

घटक 10 वा हा तपासणीकाम व मूल्यमापनाशी निगडीत आहे. आपण रुढीबद्ध पारंपारिक तपासकामाच्या पद्धतीचे परीक्षण करणार आहोत आणि मूल्यमापनाची आधुनिक व्यवस्था वापरून विद्यार्थ्यांच्या अध्ययनाचे योग्य प्रकारे मोजमाप करून श्रेणी कशी देतायेईल हे पाहणार आहोत.

# पाठ्यक्रम


| अ.नं. | घटकांचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| 1. | घटक – 7 : साहित्य व भाषा | |
| 2. | घटक – 8 : वर्गातील भाषा अध्यापन पद्धती | |
| 3. | घटक – 9 : शैक्षणिक साहित्य काही नव परिमाणे | |
| 4. | घटक – 10 : तपासकाम | |

# घटक 7 : साहित्य व भाषा

Notes

## संरचना/आराखडा :

7.0 प्रस्तावना
7.1 अध्ययन उद्दिष्टे
7.2 वाङ्मयीन युक्त्या
7.3 भाषा अध्यापनातील साहित्याची भूमिका
 7.3.1 साहित्य म्हणजे काय?
 7.3.2 साहित्याचे प्रकार
 7.3.3 साहित्याचा भाषा अध्यापनातील उपयोग : ऐतिहासिक दृष्टीकोन
7.4 साहित्य अध्यापनाची उद्दिष्टे
 7.4.1 वर्गांचे प्रकार
 7.4.2 प्रथम भाषा व द्वितीय भाषा (किंवा परकीय भाषा) वर्ग
 7.4.3 साहित्याच्या माध्यमातून विविध कौशल्यांचा विकास
7.5 साहित्याचे विविध प्रकार
 7.5.1 प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरावर साहित्य प्रकार समावेशाची मूलतत्त्वे
 7.5.2 वर्गात वाङ्मयीन प्रकार कसे वापरावेत
 7.5.3 वर्गातील समस्या निराकरण
7.6 समारोप
7.7 सुचविलेले ग्रंथ व संदर्भ ग्रंथ
7.8 अभ्यास

## 7.0 प्रस्तावना

या घटकामध्ये आपण भाषा अध्ययनातील साहित्याची भूमिका तपासणार आहोत. बऱ्याच शाळांमध्ये प्राथमिक वर्गात साहित्य हा स्वतंत्र विषय म्हणून विचारात घेतला जात नाही त्याचा भाषेच्या पाठ्यक्रमात समावेश केला जातो. (मग ती हिंदी, इंग्रजी संस्कृत किंवा अन्य भाषा) जरी गोष्टी, कविता, निबंध हे जवळ जवळ सर्व पाठ्यपुस्तकात आढळतात तरी असे काही संवाद कानावर पडतात की त्यांची आवश्यकता का आहे आणि भाषा ग्रहण करण्यात त्यांची काय भूमिका आहे. या घटकात आपण काही प्रश्नांवर चर्चा करणार आहोत जसे की साहित्य म्हणजे काय? बाल साहित्य म्हणजे काय? ते वर्गात कसे वापरावयाचे आणि त्यातून कोणती उद्दिष्टे साध्य होतात?

## 7.1 अध्ययन उद्दिष्टे

हा घटक वाचल्यानंतर

- साहित्याच्या विविध रूपे व प्रकारांशी तुमची ओळख होईल.
- भाषा ग्रहणातील साहित्याच्या भूमिकेसंदर्भात तुम्ही विश्लेषण करू शकाल.
- प्राथमिक व उच्च प्राथमिक वर्गामध्ये साहित्य निवडी संबंधातील तुमचा दृष्टीकोन तुम्ही सादर करू शकाल.
- साहित्याच्या अध्यापनात येणाऱ्या समस्या तुम्ही ओळखू शकाल.
- साहित्य अध्यापनातील शिक्षकाची भूमिका स्पष्ट करू शकाल.

Notes

## 7.2 वाङ्मयीन युक्त्या

सामान्य बोली भाषेपेक्षा साहित्यिक भाषा ही वेगळी असते कारण त्यामध्ये विविध प्रकारचे साहित्यिक सौंदर्य निर्माण करण्याच्या क्लुप्त्या वापरलेल्या असतात जसे की उपमा रूपक analogy, अनुप्रास, स्वरसादृश्य, स्वरसंयोग, यमक, तालबद्धता, सदृश्य, प्रतिशब्द इ. त्यापैकी काही युक्त्यांची चर्चा आपण खाली करणार आहोत.

1) **उपमा :** एखाद्या वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्माच्या पायावर दोन वस्तुतील गुणवैशिष्ट्यांची तुलना करणे म्हणजे उपमा होय. उपमेयेचे चार घटक आहेत. क्ष आणि य या दोघांची एकमेकाशी तुलना केली आहे. त्या गुणधर्माच्या पायावर या दोघांची तुलना केली आहे. त्याला झेड समजू आणि शेवटी तो गुण जो क्ष, य आणि झेड संबंध प्रस्थापित करतो. उदाहरणार्थ ‘तिचा चेहरा चंद्रासारखा सुंदर आहे.’ यामध्ये ‘तिचा चेहरा’ हे ‘क्ष’ ‘चंद्र’ हा ‘य’ आणि गुण वैशिष्ट्य सुंदर हे झेड आणि यांना जोडणारा शब्द ‘सारखा’

2) **रूपक :** साम्य नसणाऱ्या दोन वस्तुंमध्ये साम्य आहे असे मानने हा रूपकाचा अत्यावश्यक घटक आहे. या प्रक्रियेत त्या दोन वस्तुंमधील काहीतरी विलक्षण साम्य अधोरेखित केले जाते. उदा. खालील अ व ब विधाने लक्षात घ्या.
(अ) उंट वाळवंटात सापडतात.
(ब) उंट म्हणजे वाळवंटातील जहाज होय.
‘अ’ विधानात रूपक नाही पण ‘ब’ विधानात रूपक आहे. जेव्हा तुम्ही उंटाकडे पाहता किंवा विचार करता तेव्हा सामान्यपणे तुमच्या मनासमोर जहाज यावे असे त्यात काहीच नाही. पण इते उंटाला जहाल संबोधले आहे हे थोडे विचित्र वाटते पण हे तुम्हाला विचार करायला प्रवृत्त करते. की उंट वाळवंटात तीच भूमिका पार पाडतो जी जहाज समुद्रात पार पाडते. काही रूपके काळाच्या ओघात ‘मृत’ होऊन जातात ती आपल्या दैनंदिन भाषेत (बोली भाषेत) वापरली जातात व त्यामुळे त्यांचा ‘रूपकात्मक’ प्रभाव नाहीसा होतो. उदा. 'to take steps' 'to take stock' किंवा 'it's raining cats and dogs.' इत्यादी.
गोंधळात टाकणाऱ्या प्रतिमा घेऊन काही मिश्ररूपकेही असतात उदा. 'I smell a rat'

3) **अनुप्रास :** म्हणजे एकाच व्यंजन किंवा स्वराची कविता किंवा गद्याच्या पुनरावृत्ती होय. याचे सहजपणे समजण्यासारखे उदाहरण म्हणजे, 'she sells seashells by the seashore' जर ती एखाद्या व्यंजनाची पुनरावृत्ती असेल तर त्याला स्वरसंयोग म्हणतात. हिंदीमध्ये जोगी जंगल जाते जाते जगसे जाता रहा.
स्वर सादृश्य (Assonance) स्वराच्या ध्वनीची पुनरावृत्ती होणे म्हणजे स्वर सादृश्य 'His house is in the villege though' मध्ये 'i' ची पुनरावृत्ती झालेली दिसते.

4) **अन्योक्ति :** ‘क्ष’ वाक्य बोलले जाते पण ते ‘य’ या अर्थाने लक्षात घेतले जाते. पुष्कळ वेळा दुसऱ्या कोणाला तरी दुखविण्यासाठी किंवा त्याची / तिची गंमत करण्यासाठी अलंकाराचा हा प्रकार वापरला जातो. उदा. लेकी बोले सुने लागे 1 या प्रकारात व्यक्ती जे बोलते त्या पेक्षा वेगळाच अर्थ त्याला सूचवायचा असतो. उदा. ‘आपण फार विद्वान आहात’ म्हणजे प्रत्यक्षात तुझ्या सारखा मूर्ख तूच हे सूचित होते.

5) **व्याजोक्ती (Allusion) :** एखादे विशिष्ट गुणवैशिष्ट्य सुचविण्यासाठी किंवा ठरविण्यासाठी तुम्ही काही निंदा अगर मानहानीकारक बोलता तेव्हा त्याला असे म्हणतात उदा. हे अमित हा सरदार पटेलांसारखा बळकट आहे. येथे सरदार पटेल यांच्यातील बळकटपणाचा उपयोग अमितच्या गुणवत्तेचे उपरोधाने वर्णन करण्यासाठी वापरला आहे.

**6) अतिशयोक्ती :** कवी किंवा लेखक कांही वेळा एखाद्या गुणवैशिष्ट्याचे किंवा प्रसंगाचे अतिशयोक्ती पूर्ण वर्णन करतात. त्याला अतिशयोक्ती अलंकार म्हणतात. उदा. दमडीचे तेल आणले. सासुबाईंची वेणी झाली, मामांजींची शेंडी झाली.

**7) यमक :** वाक्याच्या शेवटी, मध्ये किंवा ठराविक ठिकाणी एक किंवा अनेक अक्षरे यांची पुनरावृत्ती झाल्यास त्याला यमक म्हणतात.

सुसंगती सदा घडो, सुजन वाक्य कानी पडो
कलंक मातीचा झडो, विषय सर्वथा नावडो

**8) चेतनागुणोक्ती :** साहित्यामध्ये काही अद्‌भुत परीणाम निर्माण करण्यासाठी लेखक व कवी निसर्ग आणि प्राण्यांवर ते मानव असल्याप्रमाणे वर्णन करतात एखादा कवी म्हणेल, ''वारा माझ्या समोर उभा राहिला व मला म्हणाला...'' या ठिकाणी वारा हा बलशाली मनुष्य असल्याप्रमाणे त्याचे वर्णन आले आहे.

**9) चिन्हे :** आपण जेव्हा x हा y च्या वर्णनासाठी वापरतो तेव्हा त्याला चिन्ह म्हणतात. उदा. 'कबूतर' हे शांततेसाठी चिन्ह म्हणून वापरले जाते तर 'सफरचंद' ॲडम आणि ईव्हच्या संदर्भात वाईट म्हणून वापरले जाते. आपण अशी आशा करुया की आता जेव्हा तुम्ही कविता आणि गोष्टी वाचाल तेव्हा तुम्ही या साहित्यिक युक्त्या ओळखाल व त्याचा वाचकावर होणारा परिणामाचे परीक्षण कराल.

**तुमची प्रगती तपासा 1**

1) चिन्हे (प्रतिके) उपमा व रूपक यात कोणता फरक आहे?

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

2) खालीलपैकी उपमा, रूपक व अनुप्रास यांची उदाहरणे ओळखा.

अ) माझे प्रेम लालभडक गुलाबाप्रमाणे आहे.

ब) तिचे हास्य मोनालिसाच्या हास्यासारखे सुंदर आहे.

क) आयुष्य म्हणजे संघर्ष

ड) त्याने पहिल्या दोन खेळी जिंकल्या पण तिसरी खेळी त्याच्यासाठी वॉटर्लू सारखी होती. (पानीपत)

ई) त्यांची आई ताकदीचा स्तंभ आहे.

फ) ती खांबा इतकीच अचल आहे.

ग) ती गणितामध्ये चांगली आहे.

3) तुम्ही वाचलेल्या कवितेतून चेतनागुणोक्तीची उदाहरणे शोधा.

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

4) तुम्ही वाचलेल्या इंग्रजी / हिंदी कवितेतील यमक शोधा.

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

Notes

5) 'strong' व 'string' व Blank आणि think यामध्ये स्वरसंयोग दिसून येतो. अशी आणखी उदाहरणे लिहा.

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

6) 'Lake' व 'fate यामध्ये स्वरसादृश्य दिसून येते अशा आणखी शब्द जोड्या शोधा.

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

7) योग्य पर्याय निवडा. 'Do you like blue' हे स्वरसंयोग, स्वरसादृश्य किंवा अनुप्रास कशाचे उदाहरण आहे?

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

## 7.3 भाषा अध्यापनात साहित्याची भूमिका

### 7.3.1 साहित्य म्हणजे काय?

वापरलेल्या शब्दांचा अर्थ व्यक्त करणे म्हणजे साहित्य होय. पण शब्द व अर्थ यांचा संयोग हा अन्य विषयांच्या पाठ्यांशात ही आढळतो. उदा. इतिहास, भूगोल, शास्त्र इ. याचा अर्थ असा की प्रत्येक विषयाचे असे एक साहित्य असते व ते त्या विषयासंबंधीची सविस्तर माहिती देते. उदा. स्वयंपाक कला या विषयाचे स्वत:चे असे एक साहित्य असते जे स्वयंपाकातील सर्व पायऱ्या (त्या विशिष्ट पदार्थाबद्दलच्या) विशद करते. दुसऱ्या शब्दात साहित्याची व्याख्या करायची झाली तर असे म्हणता येईल की कोणत्याही विशिष्ट विषयासंबंधीची संपूर्ण व सविस्तर माहिती साहित्यामध्ये असते.

अन्य विषयांच्या लेखनापेक्षा (भाषेपेक्षा) साहित्याची भाषा ही वेगळी व भिन्न असते. हे आपण समजून घेतले पाहिजे यामध्ये शब्द व त्यांचे अर्थ यातील हा सरळ व सोपा नसतो तर तो कलात्मक असतो. कोणत्याही भाषेचे साहित्य हा त्या त्या काळातील व त्या त्या समाजाचा आरसाच असते ते त्या काळाचे व समाजाचे वास्तववादी व प्रतिकात्मक रूप प्रकट करते. त्या काळातील त्या समाजाच्या भावनांचे कलात्मक दृष्ट्या प्रकटन करते. यातून वैश्विक मानवी मूल्यांचेही प्रकटीकरण होते म्हणून साहित्याचा कोणताही भाग घेतला (जसे कविता, कादंबरी नाटक इ.) तरी त्या सामाजिक, सौंदर्यात्मक व वैश्विक अशा बाजू असतात सामाजिक दृष्टीकोन हा धार्मिक विधी, सण व उत्सव इ. तून बारकाईने त्या समाजाचे चित्रण करतो. साहित्यातील सौंदर्यात्मक दृष्टीकोन हा त्यासाठी वापरलेली अलंकारीक भाषा व वाचकाच्या भावभावनांच्या अभिव्यक्तीतून स्पष्ट होते आणि वैश्विक दृष्टीकोन हा त्या साहित्यातील सत्य व सौंदर्याच्या मूल्यांतून होतो. जी मानवी समाजात सदासर्वकाळ असतात.

अशा प्रकारे साहित्याच्या उद्दिष्टांनुसार त्याचे तीन प्रकारात वर्गीकरण करणे शक्य आहे.

**i) माहितीपर साहित्य :** या वर्गामध्ये आपण संदर्भग्रंथ, विश्वकोष, शब्दकोष, ज्ञानकोष, उच्चारण शब्दकोष व अन्य संदर्भ विषयक पाठ्यपुस्तके इ. चा समावेश करू शकतो. यातून ज्या गोष्टी आपणास ठावूक नसतात त्यांच्याविषयी माहिती मिळते. हे साहित्य अत्यंत उपयुक्त असते परंतु ते खऱ्या अर्थाने साहित्य या संज्ञेस पात्र नसते कारण त्या मध्ये सौंदर्यात्मक व वैश्विक दृष्टीकोनाचा अभवा असतो.

**ii) टीकात्मक साहित्य :** या प्रकारामध्ये असे लेखन समाविष्ट होते की जे एखाद्या विषयाबद्दल तर्कशुद्ध मांडणी करते आणि त्या विषयासंबंधातील कारणे व परीणाम याचे विवेचन करते. अशा प्रकारचे साहित्य हे वाचकाला अधिक काहीशोध घेण्यास प्रवृत्त करते. उदा.

**iii) सृजनशील किंवा कल्पनात्मक साहित्य :** या प्रकाराअंतर्गत आपण काव्य, नाटक, कादंबरी, महाकाव्ये, लघुकथा इ. चा समावेश करू शकतो. हे साहित्य आपल्या मनात वाचनाची इच्छा निर्माण करते ज्याच्या वाचनाने आपल्याला आनंद मिळतो. तसेच आपला रिकामा वेळ गुंतवून ठेवला जातो. हे साहित्य वाचकांना साहित्यातील व्यक्तीमत्त्वांच्या भावभावना जाणवल्याची अनुभूती देते. या साहित्यप्रकारामुळे वाचकांमध्ये मानवतेचा तसेच सृजनशीलतेचा विकास होतो.

या घटकात आपण भाषा अध्ययनामध्ये सहाय्यभूत ठरणाऱ्या विविध प्रकारच्या साहित्याची चर्चा करणार आहोत भाषा शिक्षकासाठी मग ती प्रथम भाषा किंवा द्वितीय भाषेची पाठ्यपुस्तके हा साहित्याचा महत्त्वपूर्ण स्त्रोत त्याला उपलब्ध असतो. वेळ व स्त्रोतांची उपलब्धता कमी असल्यामुळे शाळा पाठ्यपुस्तकांशिवाय वेगळे साहित्य पुरवू शकत नाही म्हणून शिक्षकाने त्याला विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाखेरीज अन्य योग्य साहित्य सुचविले पाहिजे. साहित्य म्हणजे काय हे विवेचन संपवताना काही महत्त्वाची मार्गदर्शक माहिती खालील प्रमाणे :

- काळजीपूर्वक भाषेची निवड असलेले व योग्य माहितीचे पाठ्यपुस्तक लिहिले गेले पाहिजे. हे रुपकादि अलंकार, म्हणी, आणि भाषेचा नाविन्यपूर्ण उपयोग यांनी समृद्ध असले पाहिजे.
- पाठ्यपुस्तकामध्ये गद्य, पद्य, नाटक, कादंबरी इ. पैकी कोणताही एक प्रकार घेतलेला असावा.
- या द्वारे मुलांना मनोरंजन व भाषिक सौंदर्यात्मक दृष्टीकोन दोन्हीचाही लाभ व्हावा.

हे निकष काटेकोरपणे पाळलेच पाहिजेत असे नाही यांचा हेतू इतकाच आहे की शिक्षकाला पाठ्यपुस्तक तयार करताना ते साहित्याने परिपूर्ण असेल हे ठरविता यावे. जरी आपल्याला चांगल्या साहित्याची सर्व गुण वैशिष्ट्ये माहीत असली तरी आपल्या इयत्तेसाठी कोणते साहित्य योग्य ठरेल हे ठरविण्याचीही आवश्यकता असते. आपल्या वार्गतील विद्यार्थ्यांचे वय हे मुख्यत्त्वे लक्षात घ्यावे लागेल. आपण ज्याला बालसाहित्य म्हणतो ते बालकांच्या पाठ्यपुस्तकासाठी घेणे योग्य ठरेल.

बालसाहित्यातील अनेक प्रकारांमध्ये प्रमुख व्यक्तीचित्रण (नायक) हे बालकच असावा. परीकथा उदा. लिटील रेड रिडींग हुड (Little Red Riding Hood) किंवा कादंबऱ्या जसे की आर. एल. स्टिव्हनसन, लिखित किडनॅप्ड ॲड ट्रेझर आयलंड (kidnapped and Treasure Island) यामध्ये लहान मूलच मध्यवर्ती व्यक्ती आहे. पण आपण साहित्य निवडताना फक्त लहान मूल नायक आहे. एवढ्या एकाच निकषावर निवडू शकत नाही. वस्तुत: काही गोष्टींची उदाहरणे देता येतील ज्यात मुख्य नायक बालक आहे पण त्यातील कल्पना किंवा विचार हे गुंतागुंतीचे आहेत उदा. मुन्शी प्रेमचंद यांची ‘इदगाह’, जयशंकर प्रसादांची ‘छोटा जादुगार’ जैनेंद्रांची ‘खेल’ या काही गोष्टी उदाहरणार्थ देता येतील जी मुलांच्या दृष्टीने समजण्यास कठीण आहेत. पाठ्यपुस्तकाची भाषा व कथेतील कल्पना व विचार हे मुलांच्या पातळीनुसार व त्यांना सहज समजतील अशी असावी या घटकामध्ये आपण भाषा अध्ययनातील साहित्याची भूमिका यावर लक्ष केंद्रित करणार आहोत. या खेरीज अन्य छापील साहित्य जसे जाहिराती, व्यंगचित्रे इ. हे जरी साहित्य नसले तरी ही उपयुक्त असते.

**तुमची प्रगती तपासा 2**

1) सौंदर्यात्मक साहित्य व गैर सौंदर्यात्मक साहित्य यातील फरक स्पष्ट करा.

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

Notes

2) आत्तापर्यंतच्या चर्चेवरून तुम्ही बालसाहित्याची व्याख्या कशी कराल? 6 ते 14 वयोगटाच्या बालकांसाठी उपलब्ध असणाऱ्या लिखित साहित्याच्या आधारे तुम्ही ते स्पष्ट कराल का?

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

3) बालकांसंबंधीच्या सर्वच गोष्टी बालसाहित्य असते का? तुमच्या उत्तराच्या पुष्टीकरणासाठी उदाहरणे द्या.

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

4) विचार करा व ठरवा – खालील उदाहरणे साहित्याची आहेत का?

a) वर्तमानपत्रे, जाहिराती

b) शब्दकोष

c) केक बनविण्याची लिखित कृती

d) कविता

### 7.3.2 साहित्याचे प्रकार

विद्यार्थ्यांना जीवनाच्या सामाजिक, सांस्कृतिक व सौंदर्यात्मक दृष्टीकोनांचा परिचय व्हावा म्हणून वर्गात आपण काव्य, कथा, नाटके, आत्मचरित्रे, चरित्रे, कांदबरी, निबंध इ. चा साहित्य म्हणून पाठ्यपुस्तकात समावेश करतो. यामध्ये मुळीच शंका असण्याचे कारण नाही की विविध साहित्य प्रकारांची ओळख विद्यार्थ्यांना करून देण्याने त्यांची प्राविण्य पातळी सुद्धा वाढते.

**नाटक :** नाटक हे काही वेळा श्रेष्ठ व्यक्तीच्या जीवनावर आधारित भूमिका असलेले असते. नाटक लेखनाचे काम हे इतर लेखनापेक्षा वेगळे व वैशिष्ट्यपूर्ण असते. नाटकात त्याला तिला अनेक व्यक्तीमत्त्वांची भूमिका साकारावी लागते व ती प्रेक्षकांना अस्सल वाटेल अशी वठवावी लागते. ज्यायोगे वाचक किंवा प्रेक्षक त्यांना अनेक भूमिकांनुसार ओळखू शकतात. सर्व नाटकांचा प्रारंभ, मध्य व शेवट असतो. ते दुःखांत, विनोदी किंवा दोन्हींचा समन्वय असलेले असे असते. तसेच ते काव्यात, गद्यात किंवा दोन्ही प्रकारात लिहिलेले असू शकते. श्रेष्ठ नाटककार शेक्स्पीअरचे हॅमलेट किंवा किंग लियर ही दोन्ही नाटके काव्यात्मक आहेत. श्रेष्ठ नाटकाची सर्वोत्कृष्ट परीक्षा म्हणजे रंगमंचावर त्यांचे होणारे सादरीकरण ही परीक्षा नाटक, लघुकथा किंवा काव्याला लागू होत नाही. जे कलाकार, नाटकातील विविध भूमिका आपल्या समोर अभिनित करतात. त्यांना 'नट' म्हटले जाते. नाटकाचे खरे यश त्याच्या रंगमंचावरील सादरीकरणावर अवलंबून असते. नाटकातील कथानक त्यातील विविध भूमिका करणाऱ्यांच्या संवादातून उलगडत जाते हे संवाद काही वेळा त्याच्या / तिच्या स्वगत स्वरूपातही असू शकतात.

**एकपात्री नाटक :** या प्रकारात नाटकातील संपूर्ण क्रिया या एकाच ठिकाणी व एकाच वेळी घडतात. ही नाटके छोटी व अतिशय भावनायुक्त शेवट असणारी असतात. ही खास करून शिक्षकासाठी उपयुक्त असतात कारण तो ती सहजपणे सादर करू शकतो. आणि ही नाटके पूर्ण लांबीच्या नाटकापेक्षा लहान असतात. तसेच यासाठी अनेक रंगमंच रचनांची आवश्यकता नसते. विद्यार्थ्यांना अभ्यास म्हणून आम्ही नाटके लिहिणे व सादर करण्यासाठी सांगता येईल.

**कादंबरी :** म्हणजे अनेक व्यक्तीमध्ये असलेली दीर्घ कथा होय ती ज्या काळात लिहिली जाते त्या काळातील व स्थळांचे वास्तव वर्णन यामध्ये असते काही प्रसिद्ध इंग्रजी कादंबरीकार यांनी आपल्या

कादंबऱ्यात मानवी जीवनाचे चित्र अशा प्रकारे रेखाटले की वाचकांचे लक्ष त्याकडे एकाग्रतेने केंद्रित झाले व मग त्यांची लांबी हा वाचकाला वाचनातील अडथळा वाटला नाही.

**कथा :** लघुकथा हा साहित्यातील अत्यंत लोकप्रिय प्रकार असून शालेय पाठ्यपुस्तकांमध्ये वारंवार वापरला जातो. हे कथाकाराने केलेले निवेदन असते जे एका बैठकीत वाचून होते व वाचकावर परीणाम घडविते. कथेच्या मध्यवर्ती प्रसंग किंवा व्यक्तीमत्त्वांशी ज्यांचा थेट संबंध पोहोचत नाही. अशा सर्व गोष्टी कथेच समाविष्ट केल्या जात नाहीत लघुकथेद्वारे मजबूत असा अध्यापनशास्त्रीय परिणाम साधता येतो हे आपण लवकर अभ्यासणार आहोत. काही श्रेष्ठ लघुकथा कारांची नावे पुढीलप्रमाणे सांगता येतील. रस्कीन बाँडच्या गोष्टी लहान मुलांत लोकप्रिय आहेत. द लास्ट लिफ (The last leaf) व द गिफ्ट ऑफ द मॅगी (The gift of the Magi) या ओ हेन्रीच्या कथाही प्रसिद्ध आहेत.

**निबंध :** हा गद्याचा प्रकार आहे. यात विचार तर्कशुद्ध पद्धतीने व सुसंगत रित्या मांडले जातात. निबंध लेखनासाठी वाचन व विषयाचे ज्ञान यांची आवश्यकता असते. असे म्हटले जाते की संक्षिप्तता, नीटनेटकेपणा आणि समर्पक उदाहरणे ही निबंधाची वैशिष्ट्ये आहेत. तुम्ही कदाचित पुढील निबंधकारांचे निबंध वाचले असतील. चार्लस् लॅम्ब, ॲडीसन, आर. के. नारायण, नेहरू, गांधी, रस्कीन बाँड इ. तुम्हाला त्यांचे निबंध वाचून आनंद मिळेल तसेच नवीन कल्पनाही मिळतील.

**आत्मचरित्र :** जेव्हा एखादी व्यक्ती तिच्या जीवनातील घटना लिहिते तेव्हा त्याला आत्मचरित्र म्हणतात. आत्मकथेचा नायक हा स्वत: लेखकच असतो. तो त्याच्या स्वतःच्या भूतकाळातील घटना सांगतो तसेच त्याचा जीवन संग्राम व सुख दु:खाच्या आठवणीचे वर्णन करतो. एक अत्यंत लोकप्रिय आत्मचरित्र म्हणजे गांधीजींचे 'My Experments with Truth' अर्थात 'माझे सत्याचे प्रयोग'

**चरित्र :** चरित्र लेखन करणारा लेखक दुसऱ्या व्यक्तीबद्दल लिहितो. बॉसवेल लिखित (Bos well) प्रथम शब्दकोशाचे लेखन करणारे डॉ. जॉनसन यांचे चरित्र हे चरित्र लेखनातील 'विशेष रचना' मानली जाते.

**प्रवास वर्णन :** जेव्हा लेखक त्याच्या प्रवासादरम्यानच्या घटनांचे लेखन करतो तेव्हा त्या साहित्य प्रकाराला प्रवासवर्णन म्हटले जाते. तो यात विविध ठिकाण, दृश्ये, प्रवासादरम्यान घडलेल्या घटना आणि त्याचे स्वानुभव यामध्ये संगतवारपणे वर्णन करतो. प्रसिद्ध हिंदी लेखक अज्ञेय यांनी लिहिलेली प्रवास वर्णने अत्यंत प्रसिद्ध आहेत आणि खासकरून त्यांचे भेटलेल्या लोकांचे व निसर्गाचे वर्णन अत्यंत प्रसिद्ध आहेत हे वर्णन अत्यंत संवेदनशील म्हणून ओळखले जाते.

**रूपरेखा :** जेव्हा लेखक एखादी व्यक्ती, जागा, वस्तु, प्रसंग, दृश्य इ. विषयी अशा प्रकारे लेखन करतो की वाचकाला त्या व्यक्ती किंवा वस्तुबाबत आलेखात्मक चित्रण वाचावयास मिळते. तेही जणू काही रूपरेषात्मक चित्रण असते.

**स्मरणचित्रे :** जेव्हा लेखक त्याच्या जीवनातील किंवा अन्य कुणाच्या जीवनातील घटना किंवा दृश्य इ. चे वर्णन करतो तेव्हा त्याला स्मरणे म्हटले जाते. स्मरणे लिहिण्यासाठी लेखकाचे त्या शक्तीशी किंवा प्रसंगाशी व्यक्तिश: संबंध असले पाहिजे स्मरणे ही भूतकाळाशी संबंधित असतात, वर्तमानकाळ किंवा भविष्यकाळाशी संबंधित नसतात. लेखकाने त्यामध्ये स्वतःच्या सृजनशीलतेची किंवा विचारांची भर घालायची नसते.

**काव्य :** काव्य हे सर्व साहित्याचे प्रमुख तत्त्व मानले जाते. हा कदाचित साहित्याचा सर्वात पहिला प्रकार आहे सर्व समाजातील महान महाकाव्ये ही काव्यात लिहिली गेली आहेत. मग ते ग्रीक मधील ओडेसी किंवा इंलियड असेल किंवा प्राचीन भारतीय महाभारत अथवा रामायण ती सर्व काव्यात मांडलेल्या गोष्टी आहेत. त्यानंतर यामध्ये इतरही महान कवींची नावे जोडता येतील जसे की कालीदास, भट्ट, शेक्स्पीअर, डोन, शेले, किटस्, बायरन, वर्डस्वर्थ, इलियट, Yeats ही अनेक

Notes

अन्य कवींपैकी परीचित नावे आहेत. काव्य हे नेहमी भावात्मक व अस्पर्श असते. त्यामध्ये उपमा, अनुप्रास व यांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जातो. कादंबरी, कथा किंवा निबंधाच्या विरुद्ध काव्यात खूप सारे विचार व भावना अगदी कमी शब्दात व्यक्त केलेल्या असतात. यामध्ये अनेक गोष्टी चर्चेसाठी मुक्त ठेवलेल्या असतात तसेच अर्थ लावण्याबाबतही अनेक संभाव्यता निघू शकतात. कविता ही सुप्रतिष्ठित छंदोबद्धरित्या लिहिली जाते. किंवा मुक्त छंदातही लिहिली जाते. साहित्याच्या कोणत्याही प्रकारापेक्षा काव्य हे समजण्यासाठी व भाषांतरासाठी अत्यंत कठीण असते.

ह्या सर्व साहित्य प्रकारांचा समावेश करण्याचा हेतू हा की विद्यार्थ्यांना वर्गात भाषा शिकवत असताना कोणते शैक्षणिक साहित्य वापरावे याबाबत मदत करणे हे उद्दिष्ट होते. हे लक्षात घेतले पाहिजे की आमची अशी अपेक्षा नाही की मुलांना या सर्व साहित्यिक प्रकारांची उद्दिष्टे माहीत व्हावीत तर असा प्रयत्न व्हावा की मुलांची या प्रकारांशी ओळख व्हावी व त्याचे परीक्षण त्यांनी कारवे. तसेच विद्यार्थ्यांनी त्या साहित्यात वापरल्या जाणाऱ्या म्हणी, वाक्प्रचार विशिष्ट शब्दसंग्रह त्यातील कल्पना इ. ही जाणून घ्यावे. त्यांनी फक्त त्यातील कथाच समजून घेऊ नये.

**तुमची प्रगती तपासा 3**

1) गद्यामध्ये याचा समावेश होत नाही.

   (a) नाटक (b) कादंबरी (c) काव्य (d) गोष्टी

2) आत्मकथन व चरीत्र यात काय फरक आहे?

3) काव्याचे विशेष गुणधर्म कोणते?

4) काही प्रसिद्ध लघुकथा लेखकांची नावे लिहा.

5) तुमच्या आवड्या कवितेच्या काही ओळी लिहा. तिचे कवि कोण आहे? त्या ओळींचा अर्थ काय?

6) काही अतिशय प्रसिद्ध अशा लघुकथाकारांची नावे लिहा? त्या कथेवर चित्रपट निर्माण केला आहे का? त्याची कथा कोणी लिहिली आहे?

Notes

### 7.3.3 साहित्याचा भाषा अध्यापनातील उपयोग ऐतिहासिक दृष्टीकोन

20 व्या शतकाच्या पहिल्या चार दशकांपूर्वी भाषा अध्यापनाची मुख्य पद्धती ही साहित्य वापरणारीच होती. असे गृहीत धरले गेले होते की परकीय भाषा अध्ययनासाठी साहित्याचा सखोल अभ्यास आवश्यक आहे. पण 1940 ते 1960 या काळात परकीय भाषा अध्यापनात साहित्य विशेष महत्त्व दिले गेले नाही. कारण त्याची जागा गरजांवर आधारीत पाठांनी घेतली. त्या काळामध्ये साहित्याचा संबंध निम्न जातीय समाजाशी आला म्हणून साहित्याचे भाषा अध्यापनातील महत्त्व नाहीसे झाले. पूर्वापार पद्धती नुसार भाषा शिक्षण म्हणजे व्याकरणाचे अध्यापन होते. नंतर त्यात अनुवादाची भर पडली. पाठ्यपुस्तके (अध्ययन साहित्य) ही नेहमीच व्याकरणाचे नियम पाळू शकत नव्हती आणि ज्यातून ज्ञानात्मक पातळी (व्याकरण नियम) व भाषिक क्षमतांचा विकास हे दोन्ही ही साधता येईल असे पाठ्यपुस्तक निवडणे ही अवघड होते. व्याकरण–अनुवाद पद्धती ही घोकंपट्टीवर आधारीत पद्धती होती. नामे व क्रियापदे घोकून पाठांचा अनुवाद जी भाषा शिकायची आहे तिचा प्रथम भाषेत अनुवाद करून भाषा अध्यापन केले जात होते व ती खूप काळापासून लोकप्रिय पद्धती होती आणि वस्तुत: आजही मोठ्या प्रमाणावर वापरली जाते. 1970 ते 1980 च्या दशकात भाषा अध्यापनाच्या ज्ञानात्मक पद्धतींचा उदय झाला असे गृहीत धरले गेले की मुले शाळेत येताना प्रारंभीची भाषा व तिच्या बद्दलचे ज्ञान विषयक क्षमता घेऊनच येतात. शिक्षकाचे काम एवढेच की त्याने रुचिपूर्ण व आव्हानात्मक पाठ्यपुस्तकांच्या सहाय्याने भाषा अध्ययनाची संधी देऊन मदत करावी हे त्यामुळे घडले की भाषा शिक्षणात पुन्हा साहित्य थोडे स्थान दिले गेले.

विडॉवसनच्या मते (Widdowson) भाषा विषयक विज्ञानाच्या दोन पातळ्या असतात. एक शिकण्याची पातळी (use) व दुसरी ते नियम व्यवहारात (usage) वापरण्याची पातळी या 'use' चा अर्थ भाषा विषयक ज्ञान व नियम आणि usage चा अर्थ हे ज्ञान पुढे जाऊन प्रत्यक्ष संपर्क साधण्यासाठी कसे वापरावयाचे आजचे बहुतेक सर्व साहित्यिक पाठ्यक्रम आपणास भाषा शिकण्याचे नियम व अर्थ ग्रहण करण्याचा पाया देतात. पॉव्ह (Pove - 1972) यांचे असे म्हणणे आहे की ''साहित्य हे भाषेसंबंधातील सर्व कौशल्ये वाढविण्यास उपयुक्त आहे. कारण साहित्यातून भाषा–विज्ञानासंबंधीचे ज्ञान ही निर्माण होत असते.''

अशा प्रकारे 20 शतकाच्या अंताकडे साहित्याची भाषा कौशल्याच्या विकासाचा स्त्रोत म्हणून पुन्हा प्रस्थापना झाली याचा पुरावा म्हणून असे सांगता येईल की आज बालके भाषा ही घोकंपट्टी करून शिकत नाहीत तर भाषेतील अक्षरे ही गोष्ट, कविता अशा साहित्याचून त्यांना शिकविली जातात.

**तुमची प्रगती तपासा 4**

1) भाषा अध्यापनाचा पारंपारिक पाया हा होता.
   (a) अर्थ शिकविणे (b) वाक्ये शिकविणे
   (c) व्याकरण शिकविणे (d) ध्वनी शिकविणे.

2) '20 व्या शतकाच्या अखेरीस भाषा अध्यापनात साहित्याचा उपयोग यावर प्रकाश टाका.'

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -
- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -
- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

3) भाषा अध्यापनाच्या व्याकरण–अनुवाद पद्धतीची मूलभूत तत्त्वे कोणती?

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -
- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -
- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

Notes

## 7.4 साहित्य-अध्यापनाची उद्दिष्ट्ये

साहित्यातील अनेक प्रकार हे वर्गात स्विकारले जातात साहित्य अध्यापनाची व प्रथम भाषा तसेच द्वितीय भाषा शिक्षणाची उद्दिष्ट्ये ही अभिवृत्ती व वर्गातील सादरीकरणावर अवलंबून असतात.

**1) भाषा पद्धती (Formet) :** या प्रकारामध्ये सुरवातीला साहित्याचा उपयोग हा भाषा विकासासाठी, ज्यामध्ये शब्दसंपत्ती व वाक्यरचना यावर अधिक लक्ष केंद्रित केले जाते. या पद्धतीची मुख्य मर्यादा ही आहे की यामध्ये साहित्यातील बालकाची रुची हरवते. खरे पाहता या पद्धतीद्वारे मुले व्याकरण ही शिकत नाहीत. शब्दसंपत्तीही मिळत नाही आणि साहित्याची रुची ही निर्माण केली जात नाही.

**3) विद्याविषयक पद्धती (Literary) :** साहित्य प्रबल वर्गात पाठ्यांश अमूर्त कल्पना यावर अधिक भर असतो याचा मुख्य उद्देश विशिष्ट संस्कृतीची ओळख तसेच वैश्विक मानवी मूल्ये जाणून घेणे हा असतो हे गृहीतच आहे. की अशा प्रकारच्या वर्गात आपोआपच भाषा समृद्धी होते पण व्याकरण वाक्यरचना इ. मोजमापांवर कमी लक्ष केंद्रित केले जाते.

**3) व्यक्तिमत्त्व विकास पद्धती :** या पद्धतीमध्ये सुरुवातीला व्यक्तिगत व सामुदायिक संवेदनशीलता व विद्यार्थी मनाचा विकास साहित्य अध्ययन द्वारे करणे यावर लक्ष केंद्रित केले जाते. हे या आशेने केले जाते की मुलांनी जर अशा प्रकारे साहित्याचे अध्ययन केले तर त्यांचे एक चांगला माणूस व जीवनाच्या सर्व क्षेत्रातील आदर्श व्यक्ती म्हणून जडणघडण होईल.

### 7.4.1 वर्गाचे प्रकार

आपण साहित्य अध्यापनाची उद्दिष्ट्ये व पद्धती याबद्दल चर्चा केली आहे. पण वर्गात त्याचा समावेश कोणत्या पद्धतीने करावा? तुम्ही कधी विचार केला आहे का? वर्गात भाषा अध्यापनाचा कोणकोणत्या पद्धती आहेत? आणि मुले त्यांच्या घरात कोणत्या प्रकारची भाषा बोलतात? या दोन्हीत काय फरक आहे हे तुम्ही सांगू शकाल का? हा भाग अशा काही प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करणार आहे. क्रशेन (Krashen) यांनी मागील घटकात दाखविल्याप्रमाणेच भाषा ग्रहण व अध्ययन या दोन्हीत फरक करतो. भाषा ग्रहण (acquisition) चा अर्थ मूल नैसर्गिक वातावरणात घरात व समाजात शिक्षक असलेली भाषा होय. आणि Learning म्हणजे औपचारिक शाळेत शिकणे.

नैसर्गिक वातावरणात मूल त्याच्या / तिच्या भाषेचे नियम यांत्रिकपणे प्राप्त करते. कारण तिथे त्याला शिकण्याची संधी मोठ्या प्रमाणावर मिळते आणि तिथे त्याची / तिची पूर्ण काळजी घेतली जाते व प्रेम मिळते यामुळे त्याचे भाषेचे अध्ययन शक्य होते. तथापि भाषा विषयक नैसर्गिक मनाच्या सामर्थ्या खेरीज, भाषेची रचना जी त्या भाषे इतकीच गुंतागुंतीची असते ती मिळविणे शक्य होत नाही. आपण शाळेत भाषा विभाग मोठ्या प्रमाणावर प्रेरीत करण्याची गरज आहे. सुदैवाने त्यासाठी साहित्य हे एक प्रभावी साधन आहे. नैसर्गिक वातावरणात भाषा शिकताना साहित्य बालकाला भाषेच्या रचनेपेक्षा अर्थाकडे लक्ष देण्यास मदत करते तेव्हा साहित्याचा अर्थ विद्यार्थी आत्मसात करतात तेव्हा त्यानंतर भाषेचे व्याकरण, शब्दसंपत्ती इ. औपचारिक गोष्टीही ते आत्मसात करतात. तथापि द्वितीय भाषेसंदर्भात स्पष्टपणे व्याकरणाचे नियम शिकणे व नवीन शब्दांचा वापर करणे ह्या गोष्टीही आवश्यक ठरतात.

शिक्षक म्हणून तुम्हाला हे माहितच आहे की पूर्व प्राथमिक किंवा प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांची द्वितीय भाषेपेक्षा प्रथम भाषेवर पूर्ण वर्चस्व असते. द्वितीय भाषा शिक्षकाने ही त्या भाषेचे नियम शिकविण्यापेक्षा त्या भाषेचा व्यवहारातील उपयोग शिकविण्यावर भर दिला पाहिजे. वर्ग व्यवस्था अशी केली पाहिजे की मूल नैसर्गिक रित्या द्वितीय भाषा शिकेल. प्रत्यक्ष जागत वावरताना विद्यार्थ्याला ती भाषा वापरण्यासाठी व जगाशी आंतरक्रिया करण्यासाठी सक्षम बनविले पाहिजे.

द्वितीय भाषा अध्यापनाची सध्याची नमुनेदार वर्गखोली कशी असते? ती घर किंवा समाजाच्या नैसर्गिक वातावरणापेक्षा खूपच वेगळी असते. अनेकदा द्वितीय भाषा व परकीय भाषा शिकविण्याच्या शिक्षकांचा विश्वास व्याकरण अनुवाद पद्धतीवर दिसून येतो. हे शिक्षक पाठ्यांशातील शब्दांची यादी देतात व व्याकरणाचे नियम काही उदाहरणे देऊन स्पष्ट करतात. नंतर काही नमूना उदाहरणे दिली जातात. ज्यातून नियम स्पष्ट केले जातात. त्यानंतर कठीण शब्दांचे अर्थ दिले जातात आणि शेवटी सरावासाठी काही प्रश्न दिले जातात. ही शिक्षक केंद्रित वर्गखोली झाली. जी नैसर्गिक भाषा वर्गखोली पेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. नैसर्गिक भाषा वर्गखोलीत या सर्व गोष्टी कधीच केल्या जात नाहीत.

या विरुद्ध नैसर्गिक भाषा खोली सारख्या वर्गखोलीत मुलांना तणाव रहित वातावरण दिले जाते आणि योग्य असे बौद्धिक अनुभव दिले जातात. विद्यार्थ्यांच्या चुका काढण्याचा व दाखविण्याचा प्रयत्न केला जात नाही. वर्गाबाहेर भाषेचा वापर करण्यास सक्षम केले जाते. दैनंदिन जीवनात त्यांचा वापर करून भाषा बोलणे, संवाद साधने यशस्वी होते.

**तुमची प्रगती तपासा 5**

1) (✓ खूण करा) – मूल त्याची प्रथम भाषा शाळेत येण्यापूर्वीच शिकते.

   (a) शिक्षक केंद्रित व्यवस्थेतून  (b) नैसर्गिक व्यवस्थेतून

   (c) पालाकांनी शिकविल्यामुळे  (d) यापैकी एकही नाही.

2) द्वितीय भाषा शिक्षकाचे उद्दिष्ट्य काय असले पाहिजे?

3) भाषा अध्ययना संदर्भात नैसर्गिक व्यवस्था व शिक्षक केंद्रित व्यवस्था यात फरक काय आहे?

4) व्याकरण अनुवाद पद्धती म्हणजे काय?

### 7.4.2 प्रथम भाषा व द्वितीय भाषा (किंवा परकीय भाषा) वर्गखोली

तुम्हाला विद्यार्थ्याची घरी बोलली जाणारी भाषा व वर्गातील भाषा यातील फरक समजला असेल हे फरक विद्यार्थ्यांना भाषा अध्ययनाच्या संधीची मर्यादा व पुरेशी माहिती उपलब्ध न झाल्याने घडते. शाळेमध्ये कोणत्या प्रकारचे अध्ययन–साहित्य विद्यार्थ्याला पुरवावे, ज्या योगे तो द्वितीय भाषा त्याच्या मातृभाषेप्रमाणे शिकेल? कोणतीही भाषा शिकविण्यासाठी मग ती प्रथम भाषा असो की द्वितीय भाषा असो अथवा अन्य कोणतीही भाषा असो त्यासाठी साहित्य वापरता येते. निवडलेले साहित्य सोप्या शब्दातील, साध्या वाक्यातील व शब्द असे असावेत की जे संदर्भाने सहज समजतील असे असावे. निवडलेले अध्ययन साहित्य रुचिपूर्ण असावे व्याकरणाचे अध्यापन जिथे खूपच गरजेचे आहे तिथे व तेवढेच असावे. अध्ययन कर्त्याला मोठ्या प्रमाणावर अध्ययन साहित्या पुरविले तर त्याच्यात सुधारणा होईल. यासाठी साहित्य हा चांगला स्त्रोत आहे. शिक्षकांनी त्यांच्या विद्यार्थ्यांची क्षमता जाणली पाहिजे आणि विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर, त्यांच्या

सरासरीपेक्षा थोडे जास्तच अध्ययन साहित्य दिले पाहिजे म्हणजे विद्यार्थी ते आव्हान म्हणून स्विकारतील. हे शिक्षकांसाठी खूप महत्त्वाचे आहे की त्यांना त्यांच्या विद्यार्थ्यांची बौद्धिक पातळी ठरविता आली पाहिजे आणि असे अध्ययन साहित्य मिळविले पाहिजे की ज्यात विद्यार्थ्याला रुची वाटेल आणि त्याच्या बौद्धिक क्षमताना आव्हानही मिळेल. भाषेशी ते जितके जास्त झगडतील तितकी जास्त भाषा ते शिकतील.

बऱ्याच राज्यात इंग्रजी ही इयत्ता पहिली पासून शिकविली जाते. शिक्षकाला अध्ययन साहित्य निवडताना आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधताना अधिक दक्षता घ्यायला हवी कारण मातृभाषा बोलता येणाऱ्या बालकांना दुसऱ्या भाषेचे साहित्य शिकणे हे अवघड जाते. अध्ययन साहित्याचे शिक्षकाने स्पष्टीकरण कमीत कमी प्रमाणात करावे आणि मुलाला स्वतंत्रपणे गोष्टी शोधण्यासाठी प्रेरित करावे.

साहित्य वापरताना खालील मुद्यांकडे लक्ष दिले पाहिजे.

1) पूर्णपणे नाही तरी काही प्रमाणात का होईना अध्ययन साहित्याचे आकलन मुलांना होणे गरजेचे आहे.
2) प्रतिक्रिया : विद्यार्थ्यांनी अध्ययन साहित्यावर व्यक्तीगत प्रतिक्रिया दिल्या पाहिजे.
3) सर्जनशीलतेसाठी संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.
4) थोडक्यात पुनरावृत्तीवर किंवा चुकांवर नसावे तर मुलांनी जे काही वाचले आहे त्यावर प्रतिक्रिया देण्यासाठी त्यांना उद्युक्त केले पाहिजे. त्यांच्या पुढे साहित्याचा जो भाग आहे. त्यातील मुद्यांची तर्कसंगती लावण्यासाठी, त्यातील कल्पना व भावना समजून घेण्यासाठी त्याला प्रेरित केले पाहिजे.

## 7.4.3 साहित्यातून विविध कौशल्यांचा विकास

आपण आत्तापर्यंत साहित्य वर्गात कशा प्रकारे वापरता येईल हे पाहिले. अध्ययन कर्ता गोष्टी व कवितांमधून येणाऱ्या संदर्भातून भाषेचा योग्यप्रकारे उपयोग करायला शिकतो पण आपण साहित्याचे इतरही काही गुण पाहू शकतो. रूची निर्माण करणाऱ्या व मोठ्या अक्षरातील गोष्टी एकाग्रता वाढविण्यास मदत करतात. अध्ययन साहित्य वाचल्यानंतर विद्यार्थी त्याच्या कल्पनाशक्तीत विकास करू शकतो आणि व्यक्तिमत्त्व विकास व स्वावलंबित्त्व यात वाढ होऊ शकते. त्याच्या / तिच्यामध्ये अनोळखी शब्दांचे अर्थ जाणून घेण्याचे आकलन कौशल्य विकसित होते. त्याची / तिची विचार प्रक्रिया साहित्याच्या वापराने नियंत्रित करायला शिकता येते व त्यातून समाजासाठी सकारात्मक सहभाग द्यायला शिकता येते. स्कॉट (scott) च्या मते साहित्य हे सौंदर्य, नैतिकता व आत्मीक मूल्ये यांचा आरसा असते आणि सामाजिक शिस्त व संस्कृतीचे प्रकटीकरणसुद्धा यातून होते. जेव्हा साहित्याच्या माध्यमातून भाषा अध्ययन होते तेव्हा व्यक्तिमत्त्व विकासाच्या संधी सांस्कृतिक संदर्भातून प्राप्त होतात त्यामुळे साहित्य अध्ययनातून विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक जीवनाशी परिचय होतो आणि त्यात सहभागी होण्याची संधीही त्यांना उपलब्ध होते.

Widdowson च्या मते साहित्य हे भाषा अध्ययन, भाषिक कृती करणे किंवा सांस्कृतिक विषय समजून घेण्यापुरतेच मर्यादित न ठेवता त्यातून संभाषण कौशल्यांचाही विकास झाला पाहिजे. अध्ययन साहित्य हे फक्त अध्ययन कौशल्यांचाच विकास करीत नाही तर श्रवण, वाचन व लेखन कौशल्यांचाही विकास करते.

खरे पाहता साहित्य विश्लेषण व वापर यामुळे विद्यार्थी जागतिक घडामोडी व अनुभव समजून घेऊ शकतो ते आपल्याला आपले सामाजिक व वैयक्तिक प्रश्न सोडविण्यास मदत करते. व्यक्तीच्या भावनिक क्षमतेनुसार साहित्य त्याला सांस्कृतिक व वाङ्मयीन दृष्ट्या प्रगती करण्यात मदत करते.

**तुमची प्रगती तपासा 6**

1) अभिरूची पूर्ण कथा खालीलपैकी काय वाढविण्यास मदत करतात.
   (a) एकाग्रता (b) अंदाज करण्याची कौशल्ये
   (c) कल्पनाशक्ती (d) वरील सर्व
2) विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर साहित्य उपलब्ध करून देण्याचे फायदे काय?
   ------------------------------------------------------------
   ------------------------------------------------------------
   ------------------------------------------------------------

## 7.5 विविध प्रकारांचे अध्यापन

भाषा शिक्षण म्हणून तुम्ही अनेक साहित्यिक प्रकार उदा. कथा, कविता, बडबड गीते निबंध इ. विविध साहित्य अभ्यासक्रमाच्या पुस्तकात असते. प्रकार शिकविता त्यापैकी कोणता प्रकार शिकविताना तुम्हाला जास्त आनंद मिळतो? जेव्हा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना कथा वाचन आवडते तेव्हा तुम्ही त्यांना कविता वाचनासाठी कसे उद्युक्त कराल? तुम्ही निबंधाची समर्पकता कशी स्पष्ट कराल? विद्यार्थ्यांची पाठ्यपुस्तकाबरोबरची आंतरक्रिया वाढविण्यासाठी तुम्ही कोणते धोरण निश्‍चित कराल व कोणती शैक्षणिक साधने वापराल? यापैकी बरेचसे दृष्टीकोन येथे सांगितले आहेत आणि पाठ नियोजनाच्या घटकात ते अधिक सविस्तरपणे मांडले जातील.

### 7.5.1 प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरावर विविध साहित्यिक प्रकार शिकविण्याची मूलतत्त्वे

कथा, लोककथा, पौराणिककथा, बोधकथा आणि आख्यायिका त्याबरोबर तालबद्ध कविता प्राथमिक स्तरावरील पाठ्यपुस्तकात समाविष्ट केलेल्या असतात उच्च प्राथमिक स्रावर या बरोबरच कादंबरी, नाटके, रेखाचित्रे, स्मरणचित्रे, चरित्रे व आत्मचरित्रे इ. चा समावेश असतो.

लहान मुलांसाठी लघुकथांचा उपयोग करण्याचेही कितीतरी फायदे आहेत. त्या सोप्या असतात व सामान्यपणे पुस्तके लवकर वाचून होतात त्यांचा संक्षिप्त आकार मुलांना वाचनासाठी प्रेरक ठरतो. त्या आव्हानात्मक ही असतात. कारण संपूर्ण कथेचा आराखडा काही पानातच संपवावा लागतो. या घटकामुळे वाचकाची वाचनातील आवड टिकवून ठेवली जाते.

अगदी प्रारंभीच्या स्तरावर विद्यार्थ्यात आवड निर्माण करण्यासाठी सोप्या बाल कविता उपयुक्त ठरतात. वरच्या स्तरावर त्यांचा उपयोग संवेदनशीलता व तालबद्धता विकसित करण्यासाठी होतो. काव्यात वरचेवर रूपक, अनुप्रास उपमा इ. चा उपयोग गद्यापेक्षा अधिक नैसर्गिकपणे कवितांमध्ये होतो आणि मुलांना हे घटक काव्याच्या माध्यमातून परिचित करता येतात. त्यांचा उपयोग सर्जनशील भाषिक कौशल्यांच्या विकासासाठी ही होऊ शकतो.

नाटकांचा उपयोग विद्यार्थ्याची श्रवण कौशल्ये विकसित करण्यासाठी होतो. नाटकात व्याकरणाच्या विविध संरचना वापरणे शक्य असते व त्यातून विद्यार्थ्यांना साहित्य प्रकार संदर्भाने समर्पकपणे समजून घेणे शक्य होते. जेव्हा विद्यार्थी नाटक वाचतो तेव्हा नाटकातील प्रसंगाची दृश्ये तो कल्पनेने डोळ्यासमोर उभी करतो तसेच एखादे पात्र विशिष्ट वाक्य कशा प्रकारे उच्चारेल हे जाणून घेऊन त्यात जणू सहभागी होतो यामुळे विद्यार्थ्याच्या कल्पना शक्तीला चालना मिळून तिचा दर्जा उंचावतो.

अलिकडील काळात साहित्याचे सामाजिकरण यावर झालेल्या संशोधनातून असे दाखवून दिले आहे की साहित्य वाचनामुळे वाचनाची गती व क्षमता यात सुधारणा होते.

हे वाचनाला प्रेरणा मिळाल्यामुळे शक्य होते आणि आपण अधिकाधिक चांगले वाचक तेव्हाच होतो जेव्हा आपण जास्तीत जास्त वाचत जातो. विद्यार्थ्यांना ज्यात आनंद वाटेल असे साहित्य वाचनासाठी दिले पाहिजे. त्यातून त्यांच्या कल्पनाशक्तीला आव्हान मिळते त्यांना संवेदनशील बनविते व विविध संस्कृतीतील सूक्ष्म भेद जाणण्यास सक्षम करते.

लहान वर्गामध्ये साहित्य हे प्रामुख्याने कादंबरी, कथा, काव्य, बालकाव्य लोककथा या स्वरूपाचे असावे. पुस्तके विद्यार्थ्यांना सहज समजतील यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सृजनशील वाचनाचे कौशल्य दिले पाहिजे तसेच इतर विषयांच्या वाचनाचे कौशल्य विकसित केले पाहिजे. अभ्यास क्रम व पाठ्यक्रमाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांची साहित्याचे विविध प्रकार व त्यातील उदाहरणांशी ओळख करून देणे तसेच विद्यार्थ्यात अभ्यास व वाचनाबाबतची सकारात्मक अभिवृत्ती निर्माण करणे हा आहे.

साहित्यातून विद्यार्थ्यातील पायाभूत भाषिक कौशल्ये (वाचन, लेखन, श्रवण व बोलणे) विकसित होतात तसेच भाषेची अन्य क्षेत्रे ( शब्दसंग्रह व व्याकरण) विकसित होतात. विद्यार्थ्यांकडून आपेक्षित केलेली कौशल्ये व पातळीनुसार पाठ्यपुस्तक कसे विकसित करावे हे आपण एन. सी. ई. आर. टी. (NCERT) च्या हिंदी व इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकांचे अवलोकन करून जाणून घेऊ शकतो. इ. 1 ली चे हिंदीच्या पाठ्यपुस्तकाची सुरवात ही सोप्या बडबडगीतांनी होते व गोष्टी या पाठ्यपुस्तकाच्या शेवटी घातल्या आहेत असे गृहीत धरले गेले आहे. तोपर्यंत विद्यार्थ्यात पुरेसे लक्ष केंद्रीत करण्याचे कौशल्य विकसित होईल व काही दिवसात तो एक गोष्ट वाचू शकेल. इ. 5 वीच्या पाठ्यपुस्तकात गद्याच्या विविध प्रकारांचा समावेश केला आहे. (गोष्टी, निबंध, मुलाखत इ.) त्याचप्रमाणे काव्य व नाटकाचाही समावेश केला आहे. मुन्शी प्रेमचंदाच्या ‘इदगाह’ सारख्या कथातून विद्यार्थ्यांमध्ये संवेदनशीलता विकसित करण्याचा हेतू साध्य होतो. पाठ्यपुस्तकाच्या विश्लेषणाने तुम्हाला तुमच्या वर्गासाठी पाठ्यपुस्तक निवडताना मदत मिळेल.

प्राथमिक वर्गात विद्यार्थी हे बाल्यावस्था व युवावस्थेच्या मधील अवस्थेत असातात. या काळातील साहित्य गोष्टी आणि कविता या एकीकडे या वयाच्या मुलांच्या बालपणीच्या आठवणी जाग्या करणाऱ्या असाव्यात याचवेळी या गोष्टी व कवितांनी त्यांना भविष्य काळातील आशांना साद घालावी अशा असाव्यात नाटकानी त्यांच्या अभिव्यक्तीला वाट करून द्यावी त्याच वेळी मुलांना आधीच्या काही वर्षांपूर्वी ज्यांचे आकलन होत नव्हते अशा विषयांचे व भावनांचे आकलन करून घेण्यात मदत करावी. आपण अशाप्रकारचे साहित्य निवडले पाहिजे की त्यातून बाल्यावस्था व युवावस्थेतील फरक स्पष्ट झाला पाहिजे.

### 7.5.2 वर्गात साहित्याचे प्रकार कसे वापरावेत

या पाठ्यांशात आपण नेमून दिलेले पाठ्यपुस्तक किंवा पाठ्यक्रम यांच्या सहाय्याने भाषा अध्यापन करताना विविध साहित्याचे प्रकार गोष्टी, कविता, कादंबरी, एकपात्री प्रयोग यांचा उपयोग कसा करावा याची चर्चा करणार आहोत.

**गोष्टी किंवा लघुकथांचे उतारे वापरून :** जवळ जवळ सर्वच पाठ्यपुस्तकात गोष्टी किंवा लघुकथांचा समावेश असतो. योग्य अशा गोष्टींचे उतारे वापरून खालील कृती करता येतील.

जर पाठ्यांश हा मोठ्या गोष्टीतील उतारा असेल तर तुम्ही मुलांना त्यानंतर किंवा त्यापूर्वी काय घडेल किंवा घडले असेल या विषयी लेखन करायला सांगू शकता.

तुम्ही विद्यार्थ्यांना पाठातील एखाद्या पात्राच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल लेखन करायला सांगू शकाल.

विद्यार्थ्यांना ऐन वेळी पाठ्यपुस्तकातील दोन पात्रांचा भूमिकाभिनय करायला सांगू शकाल.

वर्गात गोष्टी सांगत असताना एक विशिष्ट ठिकाणी येऊन थांबतील व शिक्षक विद्यार्थ्यांना प्रश्न विचारू शकतील या प्रश्नांचे स्वरूप वेगवेगळ्या वर्गांसाठी वेगवेगळे असेल. विद्यार्थ्यांना प्रश्नावर

प्रत्युत्तर द्यायला सांगितले जाईल जसे त्यांना यापुढे काय घडेल असे वाटते? कथेतील विविध पात्रांविषयी त्यांच्या मनात कोणत्या भावना आहेत? गोष्टी विषयी त्यांच्या मनात कोणते प्रश्न आहेत? प्राथमिक स्तरावर विद्यार्थी तोंडी उत्तरे देतील तर वरच्या वर्गातील मुलांना प्रश्नांची उत्तरे वहीत नोंदविण्यास सांगावे. या उपक्रमासाठी अकबर–बिरबल, अल्लाउद्दीन, तेनाली रामन Gonu Jha अशा लोककथा निवडाव्यात. ज्या योगे विद्यार्थ्यांना त्यांचा कथाभाग रचता येईल.

**काव्याचा उपयोग :**

तुम्ही कविता पाठ करू शकता किंवा विद्यार्थ्यांना योग्य उच्चार व हावभावासह पाठ करण्यास सांगू शकता. तुम्ही खालील गोष्टीही करू शकता.

विद्यार्थ्यांना कवितेत लपलेली गोष्ट लिहिण्यास सांगू शकता ही कविता कोणासाठी आहे. कविता का लिहिली गेली आहे?

विद्यार्थी कवितेतील मुद्द्यांवर चर्चा करू शकतात तसेच हे मुद्दे त्यांच्या जीवनाशी कसे जोडलेले आहेत याबद्दल त्यांचे विचार मांडण्यास सांगू शकता.

कवितेची रचना न बदलता अर्थ बदलून ती कविता विद्यार्थ्यांना पुन्हा लिहिण्यास सांगू शकता.

अधिक वरच्या वर्गातील विद्यार्थ्यांना कवितेची विविध वैशिष्ट्यांचे वर्णन करायला सांगू शकता. त्या कवितेतील कोणता भाग ऐकण्यास चांगला वाटतो. हे सांगावे तसेच कवितेच्या प्रकाराविषयी चर्चा करण्यास सांगू शकता.

**नाटकाचे उपयोग :**

तुमच्या वर्गात कशा प्रकारची नाटके उपयुक्त ठरतील हे तुम्ही ठरवू शकता. काही लोक समकालीन नाटकांना महत्त्व देतात. जसे ऑथर मिलर, साकी इ. कारण नाटकाची भाषा समजणे सोपे जाते. इतर काहीना प्राचीन वाङ्मयातील नाटके आवडतात जसे शेक्स्पीअर किंवा भरतेंदुचे 'अंधेर नगरी' रामकुमार वर्मांचे 'अशोक शस्त्र त्याग' ही काही प्रसिद्ध हिंदी नाटके आहेत. असे असले तरी जी नाटके बुद्धीचा विकास करता व भावनिक गुंवणूक करतात अशी नाटके विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरतात. याबाबत दुमत होणे शक्य नाही.

विद्यार्थ्यांना त्यांची स्वत:ची नाटके रंगमंचावर सादर करावयास सांगता येईल तसेच त्यासाठी लागणारे साहित्य ही त्यानाच आणावयास सांगता येईल. ते वर्तमानपत्रे, कात्रणे, लिखित साहित्य, चित्रे किंवा अन्य साहित्य जे त्यांच्या नाटकासाठी उपयुक्त ठरेल असे साहित्य वापरू शकतात. अशा प्रकारचा अभ्यास विद्यार्थ्यांना एकमेकांशी संपर्क साधण्यास मदत करेल आणि त्यांच्या भोवतालच्या जगाविषयी त्यांचा दृष्टीकोन एकमेकांसमोर मांडण्याची क्षमता त्यांच्यात विकसित होईल.

### 7.5.3 साहित्याच्या वर्गात येणाऱ्या अडचणी

जर साहित्यिक साधने योग्य मार्गाने निवडली नसतील आणि ती विद्यार्थ्यांच्या भाषिक व बौद्धिक पातळीशी मिळतीजुळती नसतील तर वर्गात गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो. जर विद्यार्थ्यांना ते अभ्यासत असलेले पाठ्यपुस्तक शब्द संपत्तीचा अभाव किंवा व्याकरण न कळणे यामुळे समजत नसेल तर लवकरच विद्यार्थ्यांची त्यातील आवड नाहीशी होते आणि संपूर्ण अभ्यासच नि:फळ ठरेल. जर विद्यार्थ्यांना अशा भाषेचा अभ्यास करावा लागला की जी खूप अडचणी पार केल्यावर जाणून घेता येते तर मग विद्यार्थ्यांनी त्या पाठ्यांशावर चर्चा करावी आणि भाषेचे स्वरूप जाणून घ्यावे अशी अपेक्षा करणे निरर्थक ठरेल. वेगवेगळ्या भाषेच्या शिक्षकांना वेगवेगळ्या समस्यांना तोंड द्यावे लागते. शिक्षकांना असे विद्यार्थी हाताळावे लागतात, ज्यांच्या पार्श्वभूमीमध्ये खूप मोठी तफावत असते. ज्यांच्या प्राविण्य पातळीत व अवधान कक्षेत ही विविधता असते शिक्षकानी हे ही लक्षात घेतले पाहिजे की प्रथम भाषा शिकविताना वापरण्याची भाषा ही द्वितीय भाषा शिकवितानाच्या

Notes

भाषेपेक्षा नक्कीच वेगळी हवी. पाठ्यपुस्तकासाठी निवडलेले साहित्य हे द्वितीय भाषेसाठी निश्चितच निम्न दर्जाचे असायला हवे, प्रामुख्याने प्राथमिक स्तरावरील किंवा प्रथम भाषेसाठी निवडलेल्या साहित्यापेक्षा द्वितीय भाषेचे साहित्य निम्न स्तराचे हवे. शिक्षकाची द्वितीय भाषेतील प्राविण्य पातळी, तसेच त्या भाषेतील साहित्याची ओळख हीसुद्धा महत्त्वाची Parameters आहेत. हे निश्चितच आहे की शिक्षक त्याच्या भाषा अध्यापनाच्या कार्यात यशस्वी व्हावा म्हणून आपणास अतिशय सखोल असा शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाची आवश्यकता आहे.

**तुमची प्रगती तपासा 7**

1) साहित्याच्या अभ्यासाने कोणती कौशल्ये वाढतील?

(a) वाचन (b) लेखन (c) बोलणे (d) ऐकणे

2) वर्गात नाटकाच्या माध्यमातून भाषा शिकविताना विद्यार्थ्यांमध्ये कोणती मूल्ये रुजविता येतील?

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

3) प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरावर वापरलेल्या साहित्यिक प्रकारांचे वर्गीकरण करा व कोणत्या प्रकारचे साहित्य वापरले गेलेले नाही त्याची यादी करा.

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

4) प्राथमिक स्तरावर साहित्य प्रकार निवडण्याचा पाया काय असावा?

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

## 7.6 समारोप

- साहित्यमध्ये सर्व प्रकारचे लेखन येते पण त्याचे महत्त्वपूर्ण / अत्यावश्यक भाग म्हणजे सृजनशील व कल्पनारम्य लेखन होय. माहितीवजा साहित्य व जाहिराती हे साहित्याचे खरे प्रकार नव्हेत.
- साहित्य हे दोन प्रकारचे असते. सृजनशील साहित्य व सृजनशील नसलेले साहित्य सृजनशील साहित्याची उद्दिष्टे म्हणजे आनंद देणे तसेच सहानुभूती व संवेदनशीलता विकसित करणे ही असतात. या अंतर्गत आपण कथा, कविता, निबंध, चित्रावरून निबंध रचना इ. चा अभ्यास करतो सृजनशील नसलेल्या साहित्यातून माहिती मिळविणे, तथ्ये लक्षात ठेवणे आणि प्रश्न सोडविणे ही आपली मुख्य उद्दिष्टे असतात. या साहित्याचे प्रकार म्हणजे वर्तमानपत्र, शब्दकोष, विश्वकोष, विज्ञानाशी संबंधित साहित्य इ.
- भाषा वर्गात साहित्य तीन रूपात वापरले जाते. भाषिक रूप (प्रकार) साहित्यिक रूप व व्यक्तिविकासात्मक रूप.
- भाषा अध्ययनाचे दोन मार्ग आहेत. भाषा प्राप्ती व भाषा अध्ययन नैसर्गिक स्वरूपात भाषा ही कोणतेही औपचारिक शिक्षण न घेता प्राप्त होते. तसेच भाषा या औपचारिक शिक्षणामध्ये वर्गातही शिकली जाते. साहित्याच्या मदतीने भाषा अध्ययन परिस्थिती ही भाषा प्राप्तीच्या परिस्तितीजवळ आणता येते.

- भाषा वर्गामध्ये जे साहित्य वापरले जाते ते विद्यार्थ्यांच्या दृष्टीने योग्य व आनंददायी असले पाहिजे.
- साहित्याचा उपयोग करून मुले सर्जनशीलता, साहित्यावर अभिप्राय देणे, स्वची जाणीव, विश्लेषण व लक्षकेंद्रिकरणाची शक्ती इ. कौशल्ये विकसित करतात. ती कल्पक बनतात तसेच सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या संवेदनशील बनतात.
- बालसाहित्याच्या सहाय्याने मुलांमध्ये कल्पनाशक्ती, अभ्यासाची आवड व आत्म प्रकटीकरण विकसित होते.
- मूलभूत भाषिक कौशल्यांबरोबर (वाचन, लेखन, श्रवण, संभाषण) साहित्य भाषेच्या अन्य विभागात जसे की प्रकटीकरण, सृजनशील लेखन शब्दार्थ व व्याकरण इ. मध्ये ही महत्त्वपूर्ण सहयोग देते.

**कार्य :**

तुमच्या वर्गाच्या एका कोपऱ्यात ग्रंथालय स्थापन करा आणि पाठ्यपुस्तक साहित्याच्या निवडी संदर्भात सविस्तर माहिती द्या. पुस्तकसंख्या, माहिती, अचूकता त्यामध्ये असू द्या.

## 7.7 वाचन व संदर्भ साहित्य


Agnihotri, R. K. (2007), Hindi: An Exsential Grammar. London: Routledge.

Krashen, Stephen D. 1981. Principles and Practice in Second Language Acquisition. English Language Teaching serien. London: Prentice-Hall Internation (UK) Ltd.

Widdowson H. G. 1990. Aspects of Language Teaching. Oxford: Oxford University Press.

Working Papers of the Summer Institute of Linguistics, 1997, University of North Dakota Session 1997 Volume 41.1

ler.letras.up.pt/uploads/ficheiros/6082.pdf10Nov.2011


## 7.8 घटकानंतरचा अभ्यास

1. उद्दिष्टांच्या आधारे साहित्याचे कोणकोणते विविध प्रकार पडतात?
2. शिक्षक म्हणून साहित्याचा उपयोग करीत असताना तुमचे अनुभव कोणते असतील?
3. तुम्ही विद्यार्थ्यांना मूळ पुस्तक परिचित कराल की त्यांना फक्त सारांश सांगाल? कारणे द्या.
4. विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यासाठी तुम्ही कोणत्या प्रकारचे समकालीन साहित्य वापराल?
5. वर्गात साहित्याचा वापर करीत असताना विद्यार्थ्यांना तुम्ही कौशल्यांचा सराव कसा द्याल?
6. महाकाव्य म्हणजे काय? सोदाहरण स्पष्टीकरण करा.
7. भाषा शिकवताना तुम्ही साहित्याचे विविध प्रकार कसे वापराल? कवितेचे उदाहरण देऊन स्पष्ट करा.
8. प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी कथा व कविता निवडताना तुम्ही कोणत्या गोष्टी लक्षात घ्याल?
9. भाषा अध्यापनात ऐतिहासिक दृष्टीकोन यावर थोडक्यात चर्चा करा.

Notes

# घटक 8 : वर्गाध्यापनातील अध्ययन व अध्यापन पद्धती

**संरचना / आराखडा :**


8.0 प्रस्तावना

8.1 अध्ययन उद्दिष्टे

8.2 पाठनियोजन करण्याचे महत्त्व

8.3 पाठनियोजन म्हणजे काय?

8.4 पाठनियोजनाचे घटक

- 8.4.1 काय शिकवायचे?
- 8.4.2 कोणाला शिकवायचे?
- 8.4.3 मूल्यमापनाची रचना
- 8.4.4 पाठनियोजनाची साधने

8.5 पाठनियोजनाचा समूह

8.6 नमूना पाठ टाचण

- 8.6.1 तुलीकाची वर्गखाली
- 8.6.2 सातपुडा चे घनदाट जंगल
- 8.6.3 अक्षरांचे अध्यापन
- 8.6.4 राधाची वर्गखोली
- 8.6.5 कथाकथनाची तंत्रे

8.7 भित्तीपत्रके व जाहिराती

8.8 पाठ टाचण कसे बनवायचे?

8.9 समारोप

8.10 सुचविलेली पुस्तके व संदर्भ

8.11 घटकावरील अभ्यास


## 8.0 प्रस्तावना

आपण मुलांना भाषा कशी शिकवतो याचे अनेक मार्ग आहेत. त्या पैकी काही तंत्रांची आपण आधीच चर्चा केली आहे. विविध कृतीतून अध्यापन, पाठाचे स्पष्टीकरण झाल्यावर सारांश कथन करणे, विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या प्रश्नांची उत्तरे तयार करायला सांगणे. सर्वेक्षण करणे इ. पद्धतींचा अवलंब होतो.

प्रत्येक तंत्र हे कोणत्या तरी विशिष्ट भाषा अध्यापन पद्धतीशी संलग्न आहे, आणि प्रत्येक पद्धतीला विशिष्ट अशी तत्त्वे आहेत. काही शिक्षक हे त्यांच्या पद्धतीने शिकवतात व ते अध्यापन कोणत्याही अध्यापन पद्धतीशी संलग्न नसते.

उदा. आपल्याला हे ठाऊक आहे कि काही शिक्षक पाठाच्या शेवटी दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहून घेण्यास सांगतात व ती पाठ करायला ही सांगतात. त्यांची अशी अपेक्षा असते कि त्यामुळे विद्यार्थ्यांना वर्गाच्या परीक्षेत तसेच बोर्डाच्या परीक्षेत चांगले यश मिळेल. काही वर्गात अध्यापन अध्ययन पद्धती खूपच दिखाऊ स्वरुपाची होते जिथे शिक्षक एका विशिष्ट मार्गाने अध्यापन करतो आणि मुलांनीही तोच मार्ग वापरावा अशी अपेक्षा करतो या उलट काही वर्गात अनेक नाविण्यपूर्ण तंत्रे अध्यापन – अध्ययन प्रक्रियेत वापरली जातात. या मागे हा हेतू असतो कि अध्यापन – अध्ययन

प्रक्रियेत वापरली जातात. या मागे हा हेतू असतो कि अध्यापन – अध्ययन प्रक्रिया अविस्मरणीय व्हावी. आणि अशी अपेक्षा असते कि विद्यार्थ्यांच्या पायाभूत ज्ञानात प्रायोगिक मूल्याची भर पडावी व कायमस्वरुपी अध्ययन घडावे आपल्याला हे ही माहित आहे की मुले वर्गाबाहेरही बरेच काही शिकतात. ते त्यांच्या सभोवती असणाऱ्या सामाजिक वातावरणातून तसेच कुटुंबातूनही बरेच काही शिकतात.

आता मुद्दा हा आहे की जर मुले स्वत:च त्यांच्या मार्गाने भाषा शिकतात ती शिकताना कोणतेही नियोजित मार्गाने शिकत नाहीत तरीही चांगली शिकतात तर मग आपण शिक्षकांना भाषा अध्यापनाच्या पद्धती शिकविण्यात वेळ वाया घालवतो? इथे हे स्पष्ट करणे अगदी महत्त्वाचे आहे की वर्गाच्या व्यवस्थेत भाषा शिकणे व परिसरातून, अशैक्षणिक व्यवस्थेतून भाषा शिकणे ह्या दोन्ही ही वेगवेगळ्या अध्ययन परिस्थिती आहेत आणि या दोन्हीतून मिळणारा अंतिम परिणाम ही भिन्न भिन्न असतो.

शाळाही अशी व्यवस्था आहे जिथे औपरिक शिक्षण दिले जाते तिथे येणारे विद्यार्थी हे भिन्न भिन्न पार्श्वभूमीतून आलेले त्यांच्याकडे विभिन्न कौशल्ये असतात. व ते सर्व एकत्र बसून त्यांच्यासाठी तयार केलेले विशिष्ट पाठ्यक्रम विशिष्ट वेळात शिकत असतो. आपण लोकशाही समाजात राहतो या समाजात विभिन्न पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्याला अजून व परिणामकारक संगोपन मिळणे हे याचे उद्दिष्ट आहे. प्रभावी अध्यापन पद्धती कोणती असावी हे जाणून घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. जितके एका विशिष्ट कालावधीत, अध्ययन प्रक्रियेच्या विशिष्ट टप्प्यावर, आणि जे शिकणे अनिवार्यच आहे त्या पैकी विद्यार्थ्याने किती उत्कृष्टतेने शिकले आहे हे जाणून घेणे ही महत्त्वाची आहे. अध्ययनाचे मूल्यमापन करण्यासाठी सुद्धा प्रभावी मूल्यमापन तंत्रे असलीच पाहिजेत. शाळा ही विद्यार्थ्याला सुयोग्य पद्धतीने अध्यन करण्यास स्वत:चे योग्य मूल्यमापन करण्यामध्ये विकास करण्यात. आणि विश्लेषण कौशल्य विकसित करण्यात मदत करते. म्हणून आपण अत्यंत प्रभावी अशा अध्यापन पद्धती विकसित करणे अत्यंत अनिवार्य आहे त्याच प्रमाणे वर्ग कृतींचे अचूक नियोजन ही केलेच पाहिजे. या गोष्टी दिलेल्या अभ्यासक्रमाचे परिणामकारक प्रभावी अध्यापन अध्ययन होण्याच्या दृष्टीने अत्यंत योग्य आहेत.

दिलेल्या वर्गासाठी पाठनियोजन करीत असताना आपण हे अनिवार्यपणे मान्य केलेच पाहिजे की वयाच्या विशिष्ट टप्प्याची मुले शालेय व्यवस्थेत येण्यापूर्वीच अनेक गोष्ट जाणत असतात म्हणून विद्यार्यांचे दैनंदिन जीवन व ज्या वातावरणात तो वावरत असतो ते वातावरण यांच्या संदर्भात पाठनियोजन प्रक्रियेत प्रयत्न झालाच पाहिजे ज्यामुळे विद्यार्थ्यांचे अध्ययन अत्यंत प्रभावी होईल.

या घटकात आपण अध्यपनाच्या विभिन्न पद्धतींची उदाहरणे पाहणार आहोत आणि त्यातून आपले स्वत:चे अध्यापन प्रतिमान विकसित करू शकू.

## 8.1 अध्ययन ध्येय

- पारंपारिक पद्धतीने भाषा शिकवण्याचे प्रकार कोणते होते? व त्याच्या मर्यादा काय होत्या?
- पाठ टाचणाचे महत्त्व
- पाठ टाचण म्हणजे काय? आपण नेहमी पाठ टाचणाबद्दल बोलतो परंतु शिकवण्याचे टाचण या बद्दल बोलत नाही का?
- प्रभावी पाठ टाचण व मूल्यमापन
- पाठ टाचणात चालण्याजोगी शक्य तेवढी लवचिकता आणि वाव.
- परिणामकारक पाठ टाचण तयार करणे.

Notes

## 8.2 पाठ टाचणाच्या नियोजनाचे महत्त्व

आपल्याला हे समजण्याची गरज आहे की पाठ नियोजन करण्याची आवश्यकता का आहे आणि ते शिकणे का गरजेचे आहे. जरी आपण त्यांना भाषा शिकवण्यासाठी जास्त वेळ दिला नाही. तरी लहान मुले भाषा बोलण्यास शिकतात. अभ्यासक्रमात भाषेचा वर्ग किंवा तास का असला पाहिजे? लहान मुलांना त्यांची मातृभाषा शिकण्याची नैसर्गिक प्रवृत्ती असते तरी नियोजनाची गरज का आहे? आपल्याला माहीत आहे की काही शिक्षक वर्गात तयारी न करता जातात तरीही चांगल्या पद्धतीने विद्यार्थ्यांच्या गरजा पूर्ण करू शकतात. अशा शिक्षकांचे आपल्या / त्यांच्या विषयावर चांगले प्रभुत्व असते. व वर्गातील विद्यार्थ्यांना याबद्दल कल्पना असते अशा प्रकारचे शिक्षक आपल्या तासाचे मानसिक नियोजन करतात आणि विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार त्यांचे तास घेतात.

शाळेतील शिक्षण घेण्याचे स्वरूप हे नैसर्गिक ज्ञानप्राप्तीपेक्षा वेगळे आहे. आपल्याला हे समजणे महत्त्वाचे आहे की वर्गात शिकवणे हे रचनात्मक पद्धतीचे असते आणि त्या पद्धतीने विद्यार्थ्यांना कौशल्य व ज्ञान दिले जाते ते पद्धतशीर भाषा प्राप्तीपेक्षा वेगळे आहे. ज्या पद्धतीने आई आपल्या मुलाला विशिष्ट भाषा घरी शिकवते तीच भाषा त्या मुलाला शाळेत शिकवण्याची पद्धत वेगळी असते. भाषा एक अवघड चमत्कार आहे, शिष्टाचाराची पायरी, वाक्यांचे प्रकार व रचना आणि शब्दांची निवड ही प्रत्येक संदर्भापेक्षा वेगळी असते.

घरी शिक्षण प्रक्रिया प्रयोगात्मक पद्धतीची असते, चुका झाल्या तरी कुणी हसत नाही आणि विद्यार्थी स्वत:ला सुधारू शकतो. अशा प्रकारची लवचिकता आणि वेळ मुलाला शाळेत मिळू शकत नाही. कारण शाळेत शिकण्याचे ध्येय हे 'बिनचूकपणा आणि प्राविण्य हे' असते. मानवी भाषेचे तत्व म्हणजे विविधता दोन्ही बाजूने असली पाहिजे वयक्तिक आणि सामाजिक स्थरावरती जर विद्यार्थ्याला भाषेत प्राविण्य मिळवायचे असेल त्याने संदर्भ व श्रवण / श्रोता म्हणून तुलनात्मक पातळी गाठली पाहिजे. इथे पाठ नियोजनाचे महत्त्व लक्षात येते. व्यक्तिगत सामाजिक, सांस्कृतिक, भाषाविषयक विविधता वर्गात मिळत असल्यामुळे पाठ नियोजन आव्हानात्मक असते .

**तुमची प्रगती तपासा – 1**

1) भाषा शिकवण्यासाठी घरी उपलब्ध करून दिलेली संधी शाळेत दिलेल्या संधीच्या तुलनेत ........... आहे.

   a) कमी  b) सारखी  c) पुष्कळ  d) पुरेशी नाही.

2) मूल आपल्या ज्ञानाचा पाया वातावरण किंवा आजुबाजूच्या परिसरापासून तयार करते – हे विधान तुम्ही अनुभवलेल्या विद्यार्थ्यांचे उदा.– देऊन स्पष्ट करा.–

   ------------------------------------------------------------------

   ------------------------------------------------------------------

3) वर्गात भाषा शिकवण्यासाठी नियोजन का महत्त्वाचे आहे.

   ------------------------------------------------------------------

   ------------------------------------------------------------------

## 8.3 पाठ नियोजन म्हणजे काय?

पाठ नियोजन काय आहे हे समजण्यासा आपण वर्गरचने पासून सुरुवात करू. ही घटना आहे महिमा नावाच्या शिक्षिकेची जी राजस्थान मधील कोटडा नावाच्या शाळेत इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी नेमली होती. वर्गात पंचवीस विद्यार्थी होते. त्या शिक्षिकेने NCERT पुस्तकातून 16 वा धडा त्यो नाव होते जपान (Japan) शिकण्याचे नियोजन केले. जपानी लोकांचे

सण, उत्सव, संस्कारांबद्दल तो धडा होता. तिने आपला पाठ प्रकट वाचनाने सुरू केला जरी विद्यार्थी आपले ओळींवर बोट फिरवून वाचत होती तरी त्यांना तिचे वाचन काही ही समजत नव्हते. दोन उतारे वाचल्यानंतर ती थांबली व मुलांना जपान बद्दल माहिती सांगण्यास सुरुवात केली. विद्यार्थी तिच्याकडे गंभीर चेहरे करून बघत होते. त्याची परवा न करता तिने त्याच पद्धतीने शिकवणे चालू ठेवले जपान बद्दल थोडी माहिती देऊन धड्यातील राहिलेले उतारे मोठ्याने वाचले. वर्गात कुठलीही कृती नव्हती. सर्व विद्यार्थी नुसते बसलेले होते. बऱ्याच विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे चित्र काढण्यास सुरवात केली. काही मुलांनी धड्याचे चिन्ह म्हणून फुलदाणीचे चित्र काढण्यास सुरवात केली तर दुसऱ्या मुलांनी खेळण्यांचे चित्र काढण्यास सुरवात केली.

संपूर्ण वर्गाला शिकवल्यानंतर ती उभी राहिली आणि फळ्यावर अवघड शब्द त्यांच्या अर्थासह लिहिण्यास सुरवात केली. विद्यार्थ्यांनी ते शब्द वहीत उतरवून घेतले. वर्गातून बाहेर पडण्यापूर्वी तिने एका दिवसानंतर त्या शब्दार्यांवर चाचणी होणार असे सांगितले. 'महिमा' ने (शिक्षिकेने) सांगितले की जर चाचणीत पास व्हायचे असेल तर शब्दार्थ पाठ करण्यास सांगितले.

**तुमची प्रगती तपासा : 2**

जर तुम्हाला महिमाच्या शिकवण्याच्या पद्धतीचे परिक्षण करण्यास सांगितले तर खाली दिलेल्या मुद्यांवर तुम्ही 10 गुणांपैकी किती गुण द्याल?

- वर्ग सहभाग
- विद्यार्थी केंद्रित अध्यापन
- आशयाचा संबंध
- शिकवण्याची तयारी
- विषय ज्ञान
- विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययनासाठी दिलेली संधी.

## 8.4 पाठ नियोजनाचे घटक

रघूने त्याच पाठ परिणामकारक होण्यासाठी पाठ नियोजन केले ते आपण पाहू :-

1) काय शिकवायचे
2) पाठ घेण्यासाठी किंवा शिकवण्यासाठी स्वत:ची काय तयारी केली पाहिजे.
3) पाठ कसा घ्यायचा?
4) कोणती शैक्षणिक साधने वापरता येतील
5) विद्यार्थ्यांना समजले किंवा नाही याचे मोजमाप कसे करायचे?
6) जर मुल्यमापन करताना पाठ नियोजनाचे यश दिसून आले नाही तर आणखी कोणते पर्याय देणे शक्य होईल.

पाठाची सुरवात कशी करायची त्याचा हा एक कच्चा आराखडा आहे. कच्चे नियोजन अधिक धारदार किंवा प्रभावी होण्यासाठी तुमच्याकडे आणखी काही मुद्दे असतील तर आपण ते ह्यात मांडू शकतो. आपण काही ठळक मुद्दे पहाणार आहोत.

### 8.4.1 काय शिकवायचे

क्रमीक पुस्तक लिहिणारे विद्यार्थ्यांची वयानुरूप पात्रता व अध्ययन अपेक्षा लक्षात घेऊन पुस्तक तयार करतात. पुस्तकातील आशय आपल्या हातात नाही परंतु काय शिकवायचे, किती व कसे शिकवायचे हे आपण ठरवू शकतो. आपल्याला कसे व काय शिकवायचे हे ठरवण्यासाठी

मुलांची पात्रता समजणे आवश्यक आहे. लहान वर्गांसाठी शिक्षकांना ठराविक पुस्तक क्रमिक पुस्तक म्हणून निवडण्यासाठी मुभा दिली जाते. शिक्षक म्हणून आपल्याला आपल्या वर्गाची तुलनात्मक पातळी माहित पाहिजे जेणे करून त्यांच्यासाठी उत्कृष्ट पुस्तक त्यांच्यासाठी निवडता येईल आणि त्या पुस्तकातून नेमके त्यांना काय शिकवायचे ते ठरवता येईल. जर पुस्तकात वीस (20) धडे असतील तर त्याचा अर्थ असा होत नाही की आपण सर्व वीस धडे शिकवले पाहिजेत. आपण त्यातून कमी करू शकतो किंवा वाचनाचे ज्यादा घटक घालू शकतो. जर वीस पैकी आपण बारा (12) धडे शिकवायचे ठरवले तर आपण ते (12) धडे कोणत्या आधारावर निवडले ते आपल्याला माहीत हवे. आपण नियोजन केल्या शिवाय आपण ते (12) धडे का निवडलेत आणि तेच विद्यार्थ्यांच्या भाषा विकासासाठी योग्य आहेत किंवा नाही हे आपल्याला कळणार नाही. जे काही शिकवायचे ते शिकवल्यावर विद्यार्थ्यांवर किंवा विद्यार्थ्यांकडून नेमके काय अपेक्षित आहे ते आपल्याला माहीत पाहिजे. शेवटी काय शिकवायचे हे तुम्ही निवडलेल्या पुस्तकाद्वारे विद्यार्थ्यांना ते कौशल्य आत्मसात झाले किंवा नाही यावर ठरते.

## 8.4.2 कोणाला शिकवायचे

आपण आपले पाठ नियोजन परिणामकारक तेव्हा करू शकतो. ज्या वेळेस आपण आपल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या कुवतीनुसार ओळखू शकतो किंवा समजू शकतो. ज्यावेळेस विद्यार्थी आपल्या वर्गात प्रवेश करतात त्या वेळेस त्यांना काय येते आणि काय शिकण्याची गरज आहे हे आपल्याला माहीत पाहिजे. जर आपण विद्यार्थ्यांना त्यांना जे आधीच माहीत ते शिकवले किंवा काही ज्ञान मोघम कल्पनेने मिळवलेले असेल तर तुम्ही शिकवलेले ज्ञान तो आत्मसात करू शकेलच असे नाही. एका नंतर एक वर्ग संपतील, शिकवण्याचा भागही संपले परंतु विद्यार्थी बिना अध्ययनाचे राहतील धड्याबद्दल किंवा पूर्ण अध्ययन करू शकणार नाहीत. आपल्याला काल्पनिक माहिती स्पष्टपणे असायला हवी आहे की जे धडे आपण निवडलेत त्यातून विद्यार्थ्यांना रूची निर्माण होऊन जे अध्ययन ते करतील ते ध्येय आणि उद्दिष्टांना धरून असेल.

जर कुणाला शिकवायचे ते जर आपल्याला माहीत नसेल तर जो वेळ आपण पुस्तक निवडण्यास घालवला, शिकवण्यास घालवला, आणि वर्गात वेगवेगळ्या कृती करण्यात घालवला तो वाया जाईल. दुसरी गोष्ट आपण शिकवण्याआधी विद्यार्थ्यांना काय माहीत आहे ते जाणून घेणे गरजेचे आहे. उदा. जर तो धडा दिवाळी उत्सवावर आधारित असेल, तर आधी विद्यार्थ्यांना दिवाळी बाबत काय माहीत आहे. ते विचारा आणि मग दिवाळी पाठातून भाषेची गुंतागुंत शिकवण्याचा प्रयत्न करा. आपल्याला हे देखील माहीत पाहिजे की जी भाषा आपण वर्गात शिकत आहोत ती विद्यार्थ्यांची पहिली भाषा आहे की दुसरी किंवा तिसरी भाषा आहे. उदा. जर ओरिया भाषा बोलणारा विद्यार्थी जो घरात सुद्धा ओरिया बोलतो आणि ज्या शाळेत तो जातो तिथे हिंदी प्रथम भाषा आणि 90% विद्यार्थी हिंदी भाषिक आहेत तर शिक्षकांनी हे पाहिले पाहिजे की तो एकटाच मुलगा आहे ज्याने हिन्दी भाषा प्रथम भाषा म्हणून घेतली आहे जी मुलत: त्याची दुसरी किंवा तिसरी भाषा आहे किंवा त्याच्यासारखा विद्यार्थ्यांचा समुह आहे ज्यांना वर्ग चालू असताना विशेष लक्ष देण्याची गरज आहे. आपण हे लक्षात ठेवले पाहिजे का आपण आपल्या पाठ नियोजनात किंवा पाठात त्या विद्यार्थ्याला असे सामावून घेतले पाहिजे की तो पण इतर विद्यार्थ्यांसारखा चांगला अध्ययनार्थी बनला पाहिजे. प्रारंभी सांगितल्याप्रमाणे मुलांना सुरवातीला आपली मातृभाषा वापरली तरी चालते.

## 8.4.3 अध्ययनाचे महत्त्व (मुल्यमापन)

आपण विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण मुल्यमापनाबाबत जागरूक रहाणे गरजेचे आहे जेणे करून आपल्याला त्याच्या अध्ययनाच्या दर्जाबद्दल त्याच्या वर्ग सहभागातून, प्रतिसादातून आणि ठराविक पाठासंबंधी उत्सुकतेतुन कळू शकेल. जर आपल्या वर्गाची प्रगती व परिणाम सकारात्मक वाटत

नसेल तर आपण थांबून आपले नियोजन विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून सोयीचे करावे जेणेकरून विद्यार्थ्यांची वर्गातील व्यस्तता ही सकारात्मक दृष्टिकोन अध्ययन अध्यापन प्रक्रियेत निर्माण करेल. यासाठी सतत मुल्यमापन करणे गरजेचे आहे. एखाद्या वेळेस शिक्षिकेला असे वाटेल की विद्यार्थ्यांना एखाद्या अध्ययन कृतीत व्यस्त करावे पण प्रत्यक्षात तसे होत नाही. ज्या वेळेस आपण एखादी कृती आधीच ठरवून ठेवत नाही. त्यावेळेस असे होते. आपल्या विद्यार्थ्यांची प्रगती आपण ठरवून केलेल्या नियोजना प्रमाणे साध्य होणार नाही. परंतु प्रत्यक्षात आपण त्यांच्यासाठी ठरवून केलेल्या नियोजनाप्रमाणे विद्यार्थ्यांनी किती प्रगती केली हे पहायचे. हे फक्त सततच्या मुल्यमापनाने शक्य होईल. आपणास ही खात्री हवी की आपण केलेले नियोजन हे लवचिक आहे किंवा नाही आणि सततच्या मुल्यमापनाने ते आपल्याला सोयीचे करावे लागणार आहे.

Notes

### 8.4.4 कसे शिकवायचे

योग्य नियोजन करण्यासाठी हे फार जरूरीचे किंवा महत्त्वाचे आहे की दिलेल्या वर्गात विद्यार्थ्यांनची नक्की अध्ययन अध्यापन प्रक्रिया कशी झाली पाहिजे. उदा. आपल्याला ठरवावे लागते की विद्यार्थ्यांना 5 किंवा 10 च्या समुहात विभागावे, नियोजनाप्रमाणे जावे असा वर्ग नसेल कारण चांगल्या अध्ययनासाठी वर्ग कृतीला जास्त वेळ लागला किंवा पाठाचे स्पष्टीकरण करण्यासाठी शिक्षिकेने जास्त वेळ घेतला. अशा वेळेस पुढच्या वर्गासाठी शिक्षिकेला याच पाठासाठी किंवा दुसऱ्या पाठासाठी वेळेची सोय करावी लागते जेणेकरून पाठ पुर्ण होईल दिलेला भाग पूर्ण शिकवून होईल.

पुष्कळ अशा नवीन पद्धतींच्या मदतीने आपण वर्ग एकत्रित करून वर्गकृतीतून नवीन विचार किंवा संबोध संकल्पना शिकवू शकतो. सर्वप्रथम शिक्षकाला शिकवण्याचे संबोध किंवा संकल्पनांचे ज्ञान असणे आवश्यक आहे. जेणेकरून त्या पुर्वनियोजन, वयक्तिक आणि समूहकृती बाबत करू शकतल आणि शिकवण्याचे संबोध किंवा संकल्पना स्पष्ट हातील, नियोजन हे लवचिक असले पाहिजे म्हणजे आवश्यकते नुसार त्यात बदल करता येतो.

शिकवण्यास सुरवात करण्यापूर्वी आपण सर्व शैक्षणिक साधने तयार ठेवले पाहिजेत. महत्त्वाचे शैक्षणिक साधने म्हणजे – पाठ टाचण, कार्य कागद, चार्टस्, (तक्ते) चित्र, कार्यपुस्तक. भाषेचे शैक्षणिक साहित्य महत्त्वाचे आहेत कारण शैक्षणिक साधने तयार करण्यासाठी त्याची फार मदत होते. उदा. चित्राचे कार्ड किंवा अक्षराचे कार्ड वर्गाच्या आवश्यकतेनुसार महत्त्वाचे आहे. जे साहित्य आहे ते अनेक ठिकाणी वापरण्यासाठी, त्यात थोडे बदल करून, त्यात आणखी काही सोडून नवीन काहीतरी तयार करता येते. जो काही शिकवण्याचा भाग आहे त्याच्या भोवती शिक्षिक आपले पाठ नियोजन करत असतात.

**तुमची प्रगती तपासा – 3**

1) बालकाला त्याच्या अध्ययन मार्गात प्रथम मार्गदर्शक ................. कडून मिळते. :

   अ) शिक्षक ब) पालक क) बालक स्वता: ड) अभ्यासक्रम निर्माते

2) दिलेल्या वर्गाची जागा व वर्गातील हजर विद्यार्थ्यांची कुवत किंवा पात्रता जाणून घेणे तुमच्यासाठी किती महत्त्वाचे आहे ?

   ------------------------------------------------------------------

   ------------------------------------------------------------------

3) पाठात लवचिकता का असावी?

   ------------------------------------------------------------------

   ------------------------------------------------------------------

Notes

4) प्राथमिकच्या वर्गामध्ये आपण भाषा त्यांच्या पातळीप्रमाणे वापरणे का आवश्यक आहे?

--------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------

## 8.5 नियोजन करावे नियोजन किती आधी करावे

बऱ्याच शाळांमध्ये शिक्षकांनी पाठ नियोजन करणे आवश्यक असते. शिक्षक पाठ नियोजन करून त्यांची वार्षिक दैनंदिनी पूर्ण करतात ह्या अपेक्षेने की वार्षिक प्रगती पहाण्याचा हा एक प्रशासकीय मार्ग आहे. शिक्षक कष्ट घेत आहेत याची जरी खात्री असली तरी अध्ययन आपेक्षेप्रमाणे परिणामकारक होत नाही. अशा ठिकाणी शिक्षकांनी रोज किंवा आठोड्याला केलेल्या प्रगतीला महत्त्व दिले जाते मग शिक्षक ज्या दिवशी व ज्या वर्गाला शिकवायचे त्यावर लक्ष केंद्रित करतो आणि स्वता: व विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाकडे दुर्लक्ष करतो व विसरून जातो की जर आपले ध्येय उद्दिष्टे अध्ययनातून साध्य झाले नाहीत तर अशा ठिकाणी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला महत्त्व दिले जात नाही. तर फक्त संपूर्ण अभ्यासक्रम किंवा पाठ्यक्रम पूर्ण केल्याची खात्री करतात. असे पण लक्षात आले की शालेय व्यवस्थापनेच्या पद्धती विद्यार्थ्यांसाठी कोणत्याही प्रकारचे नवीन मार्ग किंवापद्धती ठेवत नाहीत, किंवा नवीन पद्धतींचा मार्ग अमलात आणत नाहीत. जेणेकरून अध्ययन अध्यापन प्रक्रिया विद्यार्थ्यांच्या रूची प्रमाणे परिणामकारक होतील. हे अध्ययनाच्या तत्त्वा विरुद्ध आहे, प्रत्येक मूल भाषा आपल्या पद्धतीने शिकते.

पाठ नियोजन किती आधी केले पाहिजे? ह्या प्रश्नाला नेमके उत्तर नाही कारण अध्ययन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मानसिक पात्रता, त्यांची उत्सुकता, त्यांचा सहभाग व स्वताच्या पात्रतेत समन्वय साधला पाहिजे. त्यासोबत त्यांना कृतीयुक्त सहभाग दिला पाहिजे. पाठ नियोजनात वरील सर्व गोष्टी नसतात. पाठ नियोजनात विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची तसेच उत्तर शोधण्याची मुभा असली पाहिजे. शिक्षकांनी स्वताचे विचार आणि संभ्रम स्पष्ट करायला हवेत तसेच विद्यार्थ्यांचे विचार व्यक्त करायला संधी द्यावी. विद्यार्थ्यांना स्वता वाक्यांची रचना करण्यास व अर्थासह आराखडा तयार करण्यास शिकले पाहिजे, परंतु त्यांचे नियोजन शिक्षकांच्या नियोजनापेक्षा वेगळे नसावेत पण दोन्ही नियोजनाचे एकत्रिकरण करावे.

शिक्षकांनी ही एक गोष्ट लक्षात ठेवलली पाहिजे की वैयक्तिक लक्ष विद्यार्थ्यांकडे देणे गरजेचे आहे. तसेच विद्यार्थ्यांचा सहभाग असावा म्हणून त्यांना प्रोत्साहान दिले पाहिजे. चुकीचे उत्तर फक्त लाल शाईने मार्क करण्यापेक्षा शिक्षिकांना विद्यार्थ्यांने ह्या चुका का केल्यात ते पहावे. ह्याला चुकांचे पृथक्करण असे म्हणतात. चुका काही रोग नाही जो मुळापासून बरा केला पाहिजे किंवा काढून टाकला पाहिजे. चुकांचे पृथक्करण करून, नियोजन करून विद्यार्थ्यांच्या ज्ञानातून त्या काढून टाकल्या पाहिजेत म्हणजे त्या चुका विद्यार्थी परत करणार नाहीत.

**तुमची प्रगती तपासा - 4**

1) वाक्य पूर्ण करा. :

   बऱ्याचदा शिक्षक .............. करण्यावर आणि ........... पूर्ण करण्यावर जोर देतात.

2) ह्या उपप्पटकात विद्यार्थी केंद्रित पाठ नियोजनात कोणत्या महत्त्वाच्या मुद्द्यांची चर्चा केली आहे?

--------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------

Notes

3) जर पाठनियोजनामध्ये विद्यार्थी हा केंद्रस्थानी मानला तर अध्यापनाचे वेळी प्रत्येक मुद्याला ठराविक वेळ दिली जाते तर परिणामकारक अध्यापनासाठी नियोजनामध्ये कसा बदल कराल?

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

4) तुम्ही पाठाचे नियोजन करण्यापूर्वी विषय ज्ञानाबाबत खात्रीकरून त्याचे नियोजन कसे करता?

-----------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------

## 8.6 नमुना पाठ टाचण नियोजन

आता आपण पाहू काही पाठ टाचणांचे नियोजन व त्यात घेतलेल्या पद्धतीचे पृथक्करण करून व शोध घेऊ हे सर्व नियोजन वेगवेगळे संदर्भ घेऊन तयार केले आहेत. आपण बघू शिक्षिका ह्या पाठांची मदत कशी घेते व कोणत्या गोष्टी टाळते. आपण पाहू शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या सहभागासाठी कसा पाया तयार केला किंवा टाळला व अध्ययन अध्यापनाचे कोणते उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न केला.

### 8.6 नमुना टाचण एक – तुलीकाचा वर्ग

हे नमुना पाठ टाचण इयत्ता दुसरी class-2 या वर्गाचे आहे. त्या शिक्षिकेचे नाव तुलीका आहे. आपण तिचे पाठ टाचण पाहू व त्याचे पृथक्करण करू.

बिहारच्या ग्रामीण भागांत कल्याणपुर येथे तुलीका प्राथमिक शाळेत शिक्षिका आहे. शाळेच्या एका बाजूला गाव आहे आणि दुसऱ्या बाजूला जंगल आहे. शेती करणे हा लोकंचा मुख्य व्यवसाय आहे. काही पालक तालुक्याच्या ठिकाणी रिक्षा ओढणारे, सुतारकाम करणारे, गवंडी काम, विक्री करणारे अशी कामे करतात. आठवड्यातून एकदाच ते आपल्या घरी येतात. बरीच मुलं आपल्या आईला शेती कामात मदत करतात, तसेच स्वयंपाक करतात व आपल्या लहान भावंडांचा सांभाळ करतात. बऱ्याच मुलांचे पालक अशिक्षित आहेत तर काही पालकांनी प्राथमिक शिक्षण घेतले आहे व थोडे लोक माध्यमिक शाळेपर्यंत शिकले आहेत. तुलीकाच्या वर्गातील मुलांना वर्तमानपत्र, मासिक किंवा पुस्तके देखील माहित नाहीत.

दुसरी इयत्तेतील तीस (30) विद्यार्थ्यांना तुलीका शिकवते. तिच्या वर्गातील मुले घरी भोजपुरी बोलतात तर शाळेत ह्यांना हिंदी भाषा शिकवली जाते. शाळा हिंदी माध्यमाची आहे. हिंदी अक्षरे विद्यार्थी ओळखू शकतात व काही शब्द वाचू शकतात, परंतु ते हिंदी अस्खलित बोलू शकत नाहीत व त्यांना दिलेली गोष्टीची पुस्तक वाचू शकत नाहीत लिपीतील अक्षरे माहीत झाल्याने काही शब्द वाचू शकतात की वाक्य समजू शकत नाहीत. उदा. एका क्रमिक पुस्तकातुन घेतले आहे की ती अशा तुकडीला शिकवते. त्या गोष्टीचे नाव आहे सच्चा मित्रै जो बिहार बोर्डच्या दुसरीच्या पुस्तकातल 10 वा धडा आहे.

तुलीकाला हे उमगले आहे की तिला मुलांना दोन्ही भाषेतुन शिकवावे लागणार आहे. भोजपुरी भाषेतुन व हिंदी भाषेतुन तिला ही परिस्थिती माहीत आहे की विचारलेल्या प्रश्नांचा मुलं भोजपुरी भाषेतून उत्तर देतील आणि त्यांना त्यांची प्रथम भाषा बोलण्यापासून ती मज्जाव करू शकत नाही. तिचा असा विश्वास आहे की वर्गात छोटे छोटे समुह केले तर विद्यार्थी एकमेकांना पाठ समजून घेण्यासाठी मदत करतील. तिला हे पण समजते की तिला श्रवण, भाषण, वाचन आणि लेखन

Notes

कौशल्यांना महत्त्व दिले पाहिजे. वर्गात ते तिला अर्थपूर्ण पद्धतीने घेतले पाहिजे जेणेकरून विद्यार्थ्यांना धडा व त्याचा अर्थ समजेल आणि ते भाषा शिकण्याकडे प्रगती करतील.

ही गोष्ट आहे दोन मित्रांची ज्यांना घरी येताना अस्वल भेटले होते. त्यांना माहीत असलेल्या प्राण्यांचे प्रकार विचारून वर्ग सुरू करते. त्याबाबत चर्चा करते. कारण तिला माहीत आहे मुलांना आजुबाजुच्या परिसरातील प्राण्यांची माहिती आहे.

तिला ही गोष्ट एका आठवड्यात करायची आहे आणि रोज 35 मी ती शिकवते. वर्गात जाण्याआधी तिने ती गोष्ट दोन ते तीन वेळेस वाचली तिच्या पाठ टाचणात व उद्दिष्टांमध्ये खालील मुद्दे होते.

- चित्र काढण्यस सांगून वर्ग व्यस्त  ठेवणे.
- गोष्टी बाबत शिक्षकेशी व इतरांशी चर्चा करण्याची संधी देणे.
- चित्रां बाबत बोलण्याची संधी देणे.
- गोष्ट वाचून समजण्यासाठी त्यांना वाचन करण्यस सांगणे.
- मुलांना गोष्टीत असणाऱ्या प्राण्यांची नावे लिहिण्यास सांगणे.
- ह्या गोष्टीचा अंत काय असेल ते विचारणे.
- आजुबाजूच्या परिसरात कोणते प्राणी आहेत. त्याबाबत त्यांना बोलण्यास सांगणे.

**तिचे दिवसाप्रमाणे पाठ नियोजन कसे होते.**

**पहिला दिवस :** मुलांना आजुबाजूच्या परिसरातील असणाऱ्या प्राण्यांची नावे लिहिण्यास सांगून त्यांच्या नावांशी ओळख करून घेणे.

**प्रक्रिया :**

1) मुलांना आजुबाजूला दिसणाऱ्या प्राण्यांची नावे लिहिण्यास सांगणे.
2) प्राण्यांची नावे लिहिण्यास सांगून आपल्या आवडत्या प्राण्याचे चित्र त्यांच्या वहीत काढण्यास सांगणे आणि त्यांच्या वहीत असणाऱ्या प्राण्यांच्या नावाला गोल करण्यास सांगणे.
3) फळ्यावर लिहिलेल्या प्राण्यांचे नाव वाचण्यास सांगणे त्यासाठी भाषिक खेळा द्वारे ठराविक प्राण्यांचे आवाज त्यांच्या सारखे काढणे.

**दुसरा दिवस :** भविष्य किंवा अंदाज करण्याचे कौशल्य निर्माण करणे.

**प्रक्रिया :**

1) तीन गोष्टींचे निरिक्षण करण्यासाठी मुलांना थोडा वेळ सोडणे.
2) मुलांना ती गोष्ट प्रस्तुत करण्यास सांगणे व आवडल्याचे किंवा कौतुक करण्यास सांगणे.
3) गोष्टीच्या मध्यात मुलांना भाकीत करण्यास सांगणे.
4) सर्व भाकीत फळ्यवर लिहिणे.

**तिसरा दिवस :** भविष्य किंवा भाकीत करण्याचे कौशल्य निर्माण करणे.

**प्रक्रिया :**

1) पूर्ण गोष्ट वाचून मुलांना माहीत असलेले शब्द फळ्यावर लिहिणे जसे : गाव, भालू, फुटबॉल, मित्र, मुर्दा दादी, मुख, नाक, राम, शाम इत्यादी.
2) मुलांना हे शब्द त्यांच्या वहीत लिहिण्यास सांगणे.
3) मुलांना पहिल्या पानावर गाव व फुटबॉल सारख्या शब्दांना गोल करण्यास सांगणे व हीच प्रक्रिया तिसऱ्या पानावर शेवटच्या उताऱ्यात करावी जसे मुँह, कान, नाक इत्यादी शब्दांना गोल करण्यास सांगावे.
4) ''भेडिया आया'' हा भाषिक खेळ यांच्या सोब खेळावा.

**चौथा दिवस :** गोष्टीचा सुरुवातीचा भाग कठीण शब्दांत समवेत वाचावा आणि त्या शब्दांच्या अर्थाचा त्यांना अंदाज बांधण्यास सांगावा.

**पाचवा दिवस :** धड्याच्या शेवटी दिलेल्या शब्द स्वाध्यायावर एकत्रित काम करणे किंवा सोडवणे.

**सहावा दिवस :** धड्याच्या शेवटी दिलेल्या वाक्य पात्रतेच्या स्वाध्यावर एकत्रित काम करणे.

**नियोजनाचे दिवसानुसार सारांश व पृथक्करण :**

**पहिला दिवस :** आजुबाजूच्या परिसरात दिसणाऱ्या प्राण्यांची नावे विचारून तुलीकाने शिकवण्यास सुरुवात केली. त्या प्राण्यांची नावे तिने फळ्यावर लिहिली. मुलांनी पाळीव प्राण्यांनपासून सुरुवात केली व नंतर जंगली प्राण्यांन बद्दल बोलले. सर्व नावे लिहून झाल्यावर ती मुलांसोबत एक खेळ खेळली. त्या खेळात मुलांना ती घेईल किंवा सांगेल त्या प्राण्याचे आवाज लगेच काढायचे होते. फळ्यावर लिहिलेल्या प्राण्यांची नावे विचारली. जेव्हा तिला कळाले की मुलांनी ती नावे ओळखली तेव्हा तिने ती त्यांना वहीत लिहिण्यास सांगितली. मग मुलांना आवडणाऱ्या प्राण्यांचे चित्र काढण्यास सांगितले व सारख्या असणाऱ्या नावांना गोल करण्यास सांगितले तुलीकाने वर्गात फेरी मारण्यास सुरवात केली व त्या विद्यार्थ्यांची कृती पुर्ण होत नव्हती ती पूर्ण करण्यास सांगितले व त्यांना मदत केली.

**दुसरा दिवस :** गोष्टीत दिलेल्या तीन चित्रांवर तुलीकाने लक्ष केंद्रित केले. चित्रात काय दिसते ते यांना सांगण्यास सांगितले. मुलांनी सांगितले त्यांनी दोन मुलांना जंगलात उभे राहिलेले पाहिले, तिथे एक अस्वल होते व एक मुलगा झाडावर होता. मग पुढे चित्रात काय दिसते ते  सांगण्यास सांगितले जसे चित्रात मुलं काय करत होती? अस्वल काय करत होते? इत्यादी मग तिने हे चित्र पाहून मुलांना गोष्ट सांगण्यास सांगितले. सुरवातीला मुलं थोडी कचरली परंतु त्यांनी नंतर शक्य होईल तेवढ्या गोष्टी कल्पना करून सांगितल्या. तुलीकाने सर्व गोष्टींची प्रशंसा केली व मुलांना प्रोत्साहन दिले. मग तुलीकाने ती गोष्ट सर्व मुलांसाठी वाचली. ती गोष्ट तिने हळूहळू व मोठ्या आवाजात वाचली. तिने मुलांना ती काय वाचते हे ओळखण्यास सांगितले. जवळ जवळ अर्धा वर्ग तिच्या सोबत हळू आवाजात गोष्ट वाचत होता. ज्यांना वाचता येत नव्हते ते काळजी पुर्वक गोष्ट ऐकत होते. तुलीकाने खात्री करून घेतली की कमकुवत मुलांना तिने बरोबर मदत मिळेल असे बसवले की नाही. ज्या मुलांना वाचता येत नव्हते त्या मुलांना तिने चांगले वाचता येणाऱ्या मुलांनबरोबर बसवले. गोष्ट वाचता वाचता ती जेव्हा दोन मित्र अस्वलाला भेटतात. त्या ठिकाणी थांबली. मग तिने विचारले काय झाले असेल जेव्हा दोन मिश्र एकटे जंगलात सापडले? मुलांनी बरीच वेगवेगळी उत्तरे दिली. तिने सर्व भाकीते फळ्यावर लिहिली व मुलंचे नावही लिहिले.

**तिसरा दिवस :** आज तुलीकाने गोष्ट पुन्हा मोठ्याने वाचली व आधी जिथे थांबली होती तिथे पुन्हा थांबली. परत तिच प्रक्रिया केली किंवा तीच पद्धत वापरली. पुन्हा मुलांना गोष्टीचा अंत काय होणार विचारले व पुन्हा वाचण्यास सुरुवात केली. तुलीकाने पात्रांचे पृथक्करण स्पष्टीकरणाच्या स्वरुपात केले. तिने प्रश्न विचारले मुलांना त्या मित्रांचा स्वभाव आवडला का त्यांच्या मैत्रीवर काय परिणाम झाला? जर ते त्या दुसऱ्या मित्राच्या भूमिकेत असते तर त्यांनी काय केले असते? मग तिने भालू शब्द फळ्यावर लिहिला आणि मुलांना गोल करण्यास सांगितले व मुलांना विचारले की किती वेळेस भालू शब्द गोष्टीत आला आहे. तिच पद्धत तिने गाव, मुर्दा इत्यादी शब्दांसाठी वापरली.

शब्द ओळखण्याच्या खेळा नंतर तिने भेडिया आया खेळ सुरू केला. ह्या खेळात सर्व मुलांना एखाद्या पुतळ्या सारखे निचिप्त पडायचे असते जसे काय मृत झाले आहेत. आणि एका मुलाला भेडिया म्हणून वावरायचे असते. भेडिया बनलेला मुलगा सर्व मुलांनकडे जाणार आणि त्यांना स्पर्श न करता पहाणार जो मुलगा हसेल किंवा हालचाल करेल किंवा डोळे उघडेल तो खेळातून बाद होईल. सुवातीला खेळ समजण्यास मुलांना वेळ लागला. खेळ समजल्यानंतर ते गांभीर्याने खेळ खेळू लागले. ते जमिनीवर एका नंतर एक झोपले, काहीचे शरीर हलके होते काही गुद्गुदल्या

Notes

झाल्यासारखे करत होते. अर्धाधिक मुले बारीक डोळे उघडून हसत होते म्हणून पहिल्या फेरीत खेळ लवकर संपला. आणखी काही फेऱ्यानंतर खेळ लवकर संपला नाही कारण मुलांना तो खेळ नेमका कसा खेळायचा ते कळले होते.

**चौथा दिवस :** चौथ्या दिवशी तलीकाने अवघड शब्द घेऊन वर्ग सुरू केला तिने मुलांना गोष्टीत असलेले अवघड शब्दांना गोल करण्यास सांगितले. ते अवघड शब्द फळ्यावर लिहिले. तिने मुलांना त्या शब्दांचे अर्थ विचारले व ते शब्द वापरून वाक्य बनवण्यास सांगितले. मग तिने अवघड शब्दांचे अर्थ सांगितले व ते शब्द वापरून वाक्य म्हणण्यास सांगितले.

**पाचवा दिवस :** तुलीकाने धडा संपल्यावर सर्व स्वाध्याय सोडवण्यास मुलांना मदत केली. एका प्रश्नात मुलांना दिलेल्या अक्षरापासून शब्द तयार करण्यास सांगितले होते. तो प्रश्न सोडवून घेण्यापूर्वी तुलीकाने दोन मुलांना कोणतेही दोन शब्द सांगण्यास सांगितले. तिने दोन शब्द कुरसी (Kursi) आणि किताब (Kitab) फळ्यावर लिहिले. तिने si अक्षर पहिल्या शब्दातून तर ta अक्षर दुसऱ्या शब्दातून घेतले आणि दोन्ही अक्षर एकत्रित केल्यावर कोणता शब्द तयार होतो ते विचारले. ही पद्धत मुलांन साठी सोपी होती. मुलांना लगेच ते प्रश्न सोडवण्यास सांगितले. मुलं लगेच त्यांना माहीत असलेली प्राण्यांची नावे शोधू लागली. थोडा वेळाने तुलीकाने दिलेले प्रश्नांची वर्गात चर्चा केली. आता थोडे अवघड काम होते. मुलांना नुसते अक्षरे लियचे नव्हते तर ते व्यवस्थित रचून त्यापासून अर्थपूर्ण शब्द तयार करायचे होते. त्यानंतर सहाव्या प्रश्नात दिलेल्या वाक्यासाठी योग्य शब्द निवडायचा होता. तिने प्रश्न मोठ्याने वाचून मुलांना त्याचे उत्तर सांगण्यास सांगितले. मग तुलीकाने अपूर्ण वाक्य फळ्यावर लिहिली व मुलांना पूर्ण करण्यास सांगितले व प्रोत्साहन दिले. बऱ्याच मुलांनी तसेच उत्तर दिले तर काही मुलांनी वहीत लिहिले. ज्या वेळेला तुलीका ह्या पद्धतीने प्रश्न सोडवून घेत होती. त्यावेळेस वर्ग संपला.

**सहावा दिवस :** सहाव्या दिवशी तुलीकोन वाक्य स्वरूपाचे प्रश्न घेण्यास सुरवात केली. पहिले तिने प्रश्न – उत्तरांना सुरवात केली. तिने विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देण्याचे प्रोत्साहान मुलांना दिले. काही मुलांनी उत्तर दिले काहींनी दिले नाही. तिने उत्तरांची चर्चा मुलांसोबत केली. मुलांकडून उत्तरे काढून घेतल्यानंतर प्रत्येक प्रश्नाचे उत्कृष्ठ उत्तर तिने फळ्यावर लिहिले. संपूर्ण प्रश्न उत्तरे अशा पद्धतीने पूर्ण केल्यानंतर मुलांनी ते आपल्या वहीत लिहिले. तुलीकाने संपूर्ण वर्गात फेरी मारून पाहिले की सगळी मुले लिहित आहेत किंवा नाही. ज्या मुलांना लिहिणे अवघड वाटत होते त्यांना तिने मदत केली.

तिने नंतर प्रश्न चौथा सुरू केला. ज्या मध्ये मुलांना दिलेल्या शब्दातून वाक्य तयार करायची होती. शब्दांचे अर्थ समजेपर्यंत तिने भरपूर उदाहरणे मुलांना सांगितली. काही मुलांना शब्दांचे स्पेलिंग येत नसल्यामुळे वाक्य तयार करणे अवघड वाटत होते. ते शब्द तिने फळ्यावर लिहिले. जवळपास पाच शब्द वापरून सर्व मुलांना वाक्य तयार करता आले. प्रश्न पूर्ण करेपर्यंत वर्ग संपला व तीन शब्द बाकी होते. ते तिने गृहकार्य करण्यास दिले.

**तुमची प्रगती तपासा - 5**

1) तुलीकाच्या वर्गातील विद्यार्थी संख्या किती होती?
   अ) 10  ब) 20  क) 30  ड) 40

2) चित्राचे कार्ड वापरण्या ऐवजी तुलीकाने मुलांना चित्र काढण्यास का सांगितले?
   ------------------------------------------------------------
   ------------------------------------------------------------

3) मुलांना माहीत आहे किंवा नाही हे पहाण्यासाठी तिने काही प्राण्यांची नावे मुलांना का सांगितली नाही?
   ------------------------------------------------------------
   ------------------------------------------------------------

4) तिने गोष्टीचा शेवट मुलांन सोबत चर्चा करण्यापेक्षा त्यांना अंदाज करण्यास का सांगितले?

5) तिसऱ्या दिवशी तिने सुरवातीची अर्धी गोष्ट पुन्हा का सांगितली?

6) जर तुम्ही तुलीका असता आणि पालकांनी तक्रार केली असती की तुम्ही शिकवण्यापेक्षा वेगवेगळी कृती वर्गात घेऊन मुलाचा वेळ वाया घालवला तर ही परिस्थिती प्रसंग तुम्ही कसा हताळला असता?

Notes

### 8.6.2 नमुना पाठ – 2 सातपुड्याची घनदाट जंगले

आता आपण पाहू हिनाने वर्गात कविता शिकवण्याचे नियोजन कसे केले ते :

भोपाळ शहराच्या जवळपास असलेल्या मंगोलपुरी शाळेत हिना पाचवी इयत्तेला हिंदी शिकवते. त्या ठिकाणी राहाणाऱ्या लोकांची घरे कच्या स्वरूपाची आहेत. ह्या परिसरात गटाराची, पिण्याच्या पाण्याची, लाईटची व चांगल्या रस्त्यांची सुद्धा सोय नाही. संध्याकाळी अभ्यास करण्यासाठी रस्त्यावरचे दिवे त्यांच्यासाठी एक प्रकारची सोय आहे. पालकांचे शिक्षण पाचवी पर्यंत झाले तर बरेच पालक अशिक्षित आहेत. तिथे रहाणाऱ्या लोकांचा मुख्य व्यवसाय रोजंदारिवर काम करणारा मजुर, रिक्षा चालक, चिंध्या वेचणे किंवा घरकाम करणे असा आहे. शाळेला जाणारी मुले आपल्या पालकांना चिंध्या वेचण्यास व घरकामात त्यांच्या आईला मदत करतात. हिनाच्या वर्गात पंचवीस मुले आहेत. मुले हिंदी बोलतात. परंतु त्यामध्ये उर्दु, गोंदी आणि मालवी शब्द वापरून. बऱ्याच मुलांना वाचता येत नाही. ज्या मुलांना वाचता येत ते थांबत थांबत वाचत अक्षरे एकत्र वाचतात. सात – पुरा – के – घने – जन– ग– ल –

सातपुड्याची घनदाट जंगले ही एक कविता आहे जी मध्य प्रदेशाच्या दाट जंगलांवर आधारित आहे. तिन मध्यप्रदेशाच्या नकाशाचा वापर शैक्षणिक साधन म्हणून केला. तिने चार दिवसात ही कविता शिकवण्याचे नियोजन केले होते.

- मुलांना त्यांचा जंगलाचा अनुभव सांगण्यास लावणे.
- सातपुडांचा समजण्यासाठी विविध मार्गाचा प्रयत्न केला.
- मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी समुह चर्चा पद्धती वर्ग कृती म्हणून घेण्याचे ठरवले.
- कविता आत्मविश्वासाने पाठ करण्यास सांगितले.
- कवितेची विभागणी करून समजण्याची पद्धती विकसित करणे.
- माहीत असलेली प्राण्यांची नावे त्यांच्या हिंदी भाषेतून सांगणे.

**दुसरा दिवस :**

- अवघड शब्दांचा अर्थ शोधून त्याचा संदर्भ लावणे.
- समुह पद्धतीने चर्चा करून कवितेची वाटणी करून समजण्याची पद्धत विकसित करणे.
- मिश्र शब्द घेऊन शिकणे.

**तिसरा दिवस :**

- चर्चा करून कविता समजणे.
- विद्यार्थ्यांचे अनुभव वर्गात सांगणे.
- मुलांना कवितेबाबत दिलेले प्रश्न एकत्र सोडवण्यास मदत करणे.

**चौथा दिवस :**

- दिलेल्या कृती मुलांच्या मदतीने पूर्ण करणे.
- मुलांना स्वताची उत्तरे तयार करण्यास मदत करणे.
- यमक साधणारे शब्द तयार करणे.

**पाठ नियोजनाचे सारांश व दिवसानुसार पृथक्करण :**

**पहिला दिवस :** हिनाने मुलांना विचारले की तुम्ही जंगल पाहिले आहे किंवा नाही. त्यांनी पाहिले त्यांना हिंदीतून जंगल बद्दल बोलण्यास सांगितले. शाळेची भाषा हिंदी असल्यामुळे तिने त्यांनी सांगितलेली माहिती, प्राण्याची नावे, पक्षांची नावे लिहून मुलांना हिंदीतून प्राण्यांची नावे सांगण्यास प्रोत्साहन दिले हे जाणून घेण्यासाठी की त्यांना माहीत आहे किंवा नाही. नकाशा घेऊन मुलांना (मध्य प्रदेशचा) सातपुडा शोधण्यास सांगितले. मग कवितेची प्रस्तावना केली. पहिल्याच दिवशी एका मुलांला संपूर्ण कविता वाचण्यास सांगितली, दुसऱ्या मुलाला दोन उतारे वाचण्यास सांगितले. चर्चा करून कविता समजून सांगितली, त्यात काल्पनिक चर्चा करून जंगली प्राण्यांचे जंगलातील रोजचे नियोजन कसे असेल हे सुद्धा शिकवले गेले.

**दुसरा दिवस :** हिनाने दुसरा दिवस कवितेच्या काल्पनिक उजळणीवर भर देऊन सुरू केला. त्यासाठी तिने आधी कवितेचे वाचन करून घेतले. त्यानंतर तिने मुलांना कवितेचे तीन उतारे वाचण्यास सांगितले व त्या उताऱ्यांची विभागणी छोट्या उताऱ्यांमध्ये केले व वर्गातील चर्चा करून त्याचे अर्थ सांगून मुलांना त्या शब्दांपासून वाक्य तयार करण्यास सांगितले. जिथे विद्यार्थी अडले तिथे तिने त्यांना मदत केली.

**तिसरा दिवस :** मोठ्याने कविता वाचन करून व चर्चेद्वारे अर्थ समजून घेणे त्यांनी चालू ठेवले. तिने खात्री करून घेतली की मुले मोठ्याने कविता वाचन करून चर्चेत सहभागी होऊन शब्दार्थ शोधतात व कविता स्वत: समजून घेतात. संपुर्ण प्रक्रियेत तिने त्यांना मदत केली. चर्चा चालू असताना ती सतत त्यांना कवितेचे प्रश्न विचारत होती. चर्चा झाल्या नंतर तिने दोन तीन मुलांना संपूर्ण कविता वाचण्यास सांगितली त्यानंतर तिने फळ्याचे दोन भाग केले, एका भागास नाव दिले. “मला जंगल आवडते आणि दुसऱ्या भागास नाव दिले. मला जंगल आवडत नाही”, मुलांना ते भाग भरून काढण्यास सांगितले आणि चर्चा करून त्यांचा प्रतिसाद त्या भागात लिहिला. कवितेवर आधारित उतारा लिहिण्यास सांगितला. वर्गात फेरी मारून मुलांना तो उतारा लिहिण्यास मदत केली.

**चौथा दिवस :** हिनाने चौथ्या दिवसाची सुरवात तिसऱ्या दिवशी शिकवलेल्या मुद्द्यांच्या उजळणीने केली. कवितेच्या शेवटी दिलेल्या प्रश्नांनकडे ती वळाली. तिने आधीच कवितेची चर्चा बारकाईने घेतल्यामुळे विद्यार्थ्यांनी लगेचच थोड्याशा चर्चेनंतर प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरवात केली. यमक साधणारे शब्द देऊन दुसरे समान शब्द मुलांना कवितेतून शोधण्यास सांगितले. ज्या मुलांना ते अवघड वाटत होते. त्यांच्यासाठी तिने उदाहरण फळ्यावर लिहिले. ज्या मुलांनी उत्तर दिले त्यांचे तिने कौतुक केले. काही मुलांनी उत्तर दिले जे बरोबर नव्हते तरी तिने त्यांना प्रोत्साहान दिले. तिने परत मुलांना उतारा लिहिण्यास सांगितला ज्याचे शिर्षक होते. एका दिवसासाठी तुम्हाला जंगलात एकटे सोडले तर.” मुलांनी लिहिण्यास सुरवात केली व ज्या मुलांनी प्रश्न विचारले त्यांना हिनाने फेरी मारत असताना मदत केली.

Notes

**आपली प्रगती तपासा - 6**

1) हिनाच्या पाठ नियोजनानुसार कोणत्या दिवशी विद्यार्थ्यांच्या मदतीने प्रश्न सोडविण्याचे तिने ठरवले होते?

   अ) पहिला दिवस  ब) दुसरा दिवस  क) तिसरा दिवस  ड) चौथा दिवस

2) भाषेच्या वर्गात नकाशा दाखवण्याचे कारण काय होते?

3) हिनाने कवितेचा अर्थ व स्पष्टीकरण न सांगताही, हिना ही उत्तम शिक्षिका आहे हे स्पष्ट करा.

4) जर तुम्हाला जंगलात एकटे सोडले तर तुम्ही काय कराल? असा प्रश्न विचारल्यावर मुलांमध्ये कोणते अध्ययन कौशल्य वाढण्यास मदत झाली?

5) कविचेच्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे स्वत: मुलांना लिहिण्यास सांगणे योग्य आहे का? तुमचे मत मांडा.

## 8.6.3 अक्षरांचे अध्यापन

दिल्ली येथील देवनगर सरकारी शाळेत लोकेश पहिलीच्या वर्गाला शिकवतो. त्या शाळेत जाणारी मुले खूप गरीब आहेत. बऱ्याच मुलांचे पालक मजूर आहेत. त्यांना त्याच्या स्वत:चे घर देखील नाही. जिथे बांधकाम चालू असेल तिथे ती रहातात बांधकाम पूर्ण झाल्यावर दुसरीकडे रहाण्यास जातात. ते सारखे एका शहरातून दुसऱ्या शहरात कामाच्या ठिकाणी जातात म्हणून ही मुले एका शाळेत जास्त काळ राहू शकत नाहीत. एका शाळेत तीन ते चार महिने राहतात किंवा एक वर्ष. गैर हजरीचे ह्या मुलांचे प्रमाण खूप आहे.

वर्गात 15 मुले आहेत. वर्गात आणखी पाच मुलं आहेत जी ह्या पंधरा मुलांचे भाऊ किंवा बहिणी आहेत पण त्यांनी प्रवेश घेतलेला नाही. वर्गात दीड वर्षा पासून ते पाच व सहा वर्षाची मुले आहेत. अर्थात एकदम लहान मुले वर्गाचा भाग नाहीत पण त्याला संपूर्ण वर्गाची काळाजी घ्यावी लागते. वर्गात बसण्यास बाक व डेक्स नाहीत. काही मुले बस्करावर बसतात, तर काही मुले घरून बसण्याकरता मॅटस किंवा छोटी चटई आणतात.

लोकेशला वर्गात हिंदी शिकवावे लागते. त्याने प्रथम वर्गात जे दिसते त्याचे नाव सांगण्यास सांगितले. त्या वस्तू म्हणजे पंखे, खुर्ची, वह्या इत्यादी त्याने मुलांना चित्र काढण्यास सांगितले व त्या चित्रांखाली त्यांची नावे लिहिण्यास सांगितले. त्याचे पाठ नियोजन येणाऱ्या चार दिवसांसाठी खालील प्रमाणे होते.

Notes

- अक्षरांसोबत संदर्भ पण शिकवणे.
- गोष्ट सांगण्याच्या पद्धतीने मूळ अक्षरे शिकवणे.
- मुलांना त्यांचे मत मांडण्यासाठी वेळ देणे.
- त्यांचा शब्दसंग्रह वाढवणे.

त्याचे दिवसानुसार पाठ नियोजन खालील प्रमाणे होते.

**पहिला दिवस :** ra अक्षर संदर्भा सोबत किंवा संदर्भ देऊन त्याची ओळख करून द्यावी.

**दुसरा दिवस :** ka अक्षरांची ओळख संदर्भासहीत देणे व कविता मोठ्याने वाचून अक्षर कवितेतून ओळखून त्याला रीतीप्रमाणे गोल करणे.

**तिसरा दिवस :** sa आणि la अक्षरांची ओळख संदर्भासहीत देणे व कविता मोठ्याने वाचून अक्षर कविवेतून ओळखून त्याला रीतीप्रिमाणे गोल करणे.

**चौथा दिवस :** त्याच शब्दातून अक्षर ओळखणे व नवीन अक्षरांच्या आधारे शब्दांना दर्जा देणे.

**सारांश आणि दिवसाप्रमाणे नियोजनाचे पृथक्करण :**

लोकेश 'ra' अक्षर खेळाद्वारे मुलांना शिकवण्याचे ठरवतो. तो मुलांना त्याची नावे सांगण्यास सांगतो. ज्यांच्या गावात 'ra' अक्षरे आहेत. मग तो ती फळ्यावर लिहितो व 'ra' ला गोल करतो. नंतर तो वर्गात एक कृती करण्याचे ठरवतो ज्यात जादुगार एका बॉक्स मधून फक्त 'ra' असणारे शब्द बाहेर काढतो. तो फळ्यावर एक बॉक्स काढतो आणि काल्पनिक जादूगर त्यातून मुद्दाम 'ra' असणारे शब्द बाहेर काढतो जसे rumaal, rickshaw, radio, kachra इत्यादी ह्या पद्धतीने त्याने बरेच 'ra' शब्द मुलांना अत्यंत रंजनात्मक पद्धतीने शिकवले व ते शब्द फळ्यावर लिहिले. मग मुलांना 'ra' असणारे कोणतेही दोन शब्द लिहिण्यास सांगतो.

**दुसरा दिवस :** दुसऱ्या दिवशी लोकेश 'ka' अक्षरे त्याच पद्धतीने शिकवण्याचे ठरसतो जसे 'ra' शिकवले होते. तो फळ्यावर एक बॉक्स रेखाटतो आणि मुलांना विचारतो की जादुगर कोणते शब्द बाहेर काढणार. मुलांनी 'ka' अक्षरे असणाऱ्या बऱ्याच शब्दांची कल्पना केली व लोकेशने ते सर्व शब्द फळ्यावर लिहिले. दुसरा बॉक्स 'ra' शब्दांसाठी रेखाटून मुलांना फळ्यावर बोलावून 'ra' शब्दांनी तो बॉक्स भरण्यास सांगितले. संपूर्ण वर्गात त्याने संयम ठेवला.

**तिसरा दिवस :** लोकेशने तोच भाषिक खेळ 'sa' आणि 'la' अक्षरे शिकवण्यासाठी वापरला. पुस्तकातून दोन कविता त्याने वाचल्या आणि त्याच दोन अक्षरांना त्याने गोल करण्यास सांगितले, मुलांना तीच चार अक्षर एकत्र शब्दांमध्ये शोधण्यास व गोल करण्यास कठीण गेले. मग लोकेशन काम बदलले व एकाच मूळ अक्षराला एका वेळेस गोल करण्यास सांगितले.

**चौथा दिवस :** आता मुलं चार अक्षरे ओळखू शकत होती. आता उजळणी घेण्याची वेळ होती कारण मुलांनी अक्षरे पाठ केली होती. मग लोकेशन ते सर्व शब्द लिहिले ज्यांची मदत त्याने ते चार अक्षरे शिकवण्यासाठी घेतली होती. मग त्याने मुलांना चार बॉक्स रेखाटण्यास सांगितले व ते शब्द त्या त्या बॉक्समध्ये घालण्यास बजावले ज्या मध्ये मूळ अक्षराचे नाव होते मग त्याने salwar हा शब्द मुलांना दाखवला व विचारले हा शब्द कोणत्या बॉक्समध्ये जाईल. मुलांना निर्णय घेणे कठीण होते कारण ह्या शब्दात असणारे तीन मूळअक्षरे त्यांनी लिहिली होती, मग लोकेशन नेहमीप्रमाणे चर्चा करून मुलांना समजावले व ते बरोबर उत्तर घेऊन आले की तो शब्द तीन बॉक्समध्ये जाईल. अशा पद्धतीने मुले चार अक्षरी शब्द लिहिण्यास व वाचण्यास शिकली.

Notes

**तुमची प्रगती तपासा - 7**

1) चौथ्या दिवसाचे लोकेशचे नियोजन काय होते.
   (अ) 'sa' अक्षर शिकवणे (ब) 'la' अक्षर शिकवणे
   (क) 'cha' अक्षर शिकवणे (ड) उजळणी

2) तुम्हाला असे वाटते का लोकेशने अक्षरे शिकवण्यासाठी योग्य पद्धत अवलंबली? जर हो असेल तर का?

   ----------------------------------------------------------------

   ----------------------------------------------------------------

   ----------------------------------------------------------------

3) लोकेशने 'salwar' शब्द कोणत्या बॉक्सचा आहे हे सांगण्यासाठी विद्यार्थ्यांसोबत चर्चेत एवढा वेळ का घालवला? तो सरळ ते उत्तर सांगू शकत होता?

   ----------------------------------------------------------------

   ----------------------------------------------------------------

   ----------------------------------------------------------------

## 8.6.4 नमूना पाठ नियोजन – 4 – राधाचा वर्ग

राजस्तानच्या अतारु विभागामध्ये राधा ही उच्च प्राथमिक शिक्षिका आहे. शाळेत येणारी मुले गाव व शहरातून येतात. बरेच पालक हे किराणामालाच्या दुकानात काम करणारी, छोट्या हॉटेल मध्ये काम करणारी, बुटांच्या दुकानात काम करणारी व शेतात काम करणारी आहेत. जी मुलं शाळेत रोज येतात ती शेती व्यवसाय असणाऱ्या पालकांची आहे. शाळेतून गळतीचे प्रमाण किंवा राधाच्या वर्गातून बाहेर पडण्याचे प्रमाण हंगाम घेण्याच्या वेळेवर अवलंबून असते कारण मुलांना त्यांच्या पालकांना पीक काढण्यासाठी मदत करायची असते. राधा आठवी इयत्तेतील एकेचाळीस विद्यार्थ्यांना शिकवते. जर संधी मिळाली तर कविता शिकवण्यावर तिचा भर असतो. आपण तिने तयार केलेले पाठ नियोजन पाहू जे ती पाऊस सुरू असताना वर्गात शिकवणार होती.

**नियोजनाचे सर्वसाधारण उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे होते.**

- कवितेच्या चर्चेत विद्यार्थ्यांचा उत्साही सहभाग असणे.
- मुलांना कवितेचे काल्पनिक चित्र तयार करण्यास सांगणे.
- चर्चा पद्धतीप्रमाणे त्यांचे भाषिक कौशल्य विकसित करणे.
- इंग्रजी कवितांचे अध्ययन करण्यास मुलांचा आत्मविश्वास वाढवणे.

**ठराविक दिवसाप्रमाणे तिच्या वर्गाचे उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत :**

**पहिला दिवस :**

1) पावसाचा अनुभव इतरांना सांगणे व त्यावर चर्चा करणे.
2) कविता मोठ्याने म्हणणे वर्ग कृती वाढवणे.
3) चर्चात्मक पद्धतीने कवितेच्या अर्थावर चर्चा करणे.
4) अवघड शब्दांचे अर्थ शोधण्यासाठी समुहकृती पद्धती अवलंबणे.

**दुसरा दिवस :**

1) चित्र तयार करून कवितेत दिलेले सर्वनामांवर वर चर्चा, चित्रांच्या आधारे करणे.
2) कवितेची पार्श्वभूमीवर चर्चा करणे.

Notes

**तिसरा दिवस :**

1) विशेषण शिकवून कवितेतील विशेषणे शोधण्यास सांगणे.

**चौथा दिवस :**

2) कवितेच्या शेवटी दिलेल्या प्रश्नांवर कार्य करणे.

**दिवसानुसार कृतीचा सारांश**

**पहिला दिवस :** राधाने मुलांना पावसाबद्दलचा त्यांचा अनुभव सांगण्यास सांगून चर्चात्मक पद्धतीने प्रश्न उत्तरे करून घेतले. मग तिने खेळ सुरू केला. त्या कृती प्रमाणे प्रत्येक मुलाला रेन (rain) हा शब्द ऐकल्यावर जो शब्द त्याच्या मनात येईल तो आठवायचा. मुलाला मग पूर्ण कविता वाचवण्यास सांगितली कृती करून कविता वाचण्यास सांगितली.

**दुसरा दिवस :** राधाने मुलांना त्यांच्या गावाचे चित्र काढण्यास सांगितले. जेव्हा तिला कळाले की मुलांना गावाचे चित्र काढण्यास कठीण जात आहे. तेव्हा तिने उद्दिष्ट बदलून त्यांना त्यांचे घर ते शाळेचा मार्गाचे चित्र जवळपासच्या खूणांसह काढण्यास सांगतले. जे कवितेचा एक भाग होते. मग तिने मुलांना एका मोठ्या झोपडीचे व झाडाचे चित्र काढण्यास सांगितले आणि फळ्यावर शब्दयोगी अव्यय जसे  under, in, out etc लिहिले. शब्दयोगी अव्यय झोपडीच झाडाच्या चित्राच्या आधारे तिने स्पष्ट केले. मुलांना तिने इंग्रजीतून सूचना दिल्या. सूचना लहान वाक्यात होत्या जसे 'झाडाखाली आलेल्या बाहूलीचे चित्र काढा. मुले कृती करण्यात व्यस्त झाल्यावर तिने वर्गात फेरी मारली.'

'Around' and 'behind' या दोन शब्दांचा अर्थ स्पष्ट करण्यास अवघड होत परंतु राधाने बरीच उदाहरणे देऊन त्यांना ते दोन शब्द स्पष्ट केले. अशा पद्धतीने वर्ग संपला.

**तिसरा दिवस :** राधाने कविता मुलांना मोठ्याने वाचण्यस सांगितली व प्रश्न उत्तर पद्धतीने त्यांना काही गोष्टी समजून सांगण्यास सांगितल. तिने फळ्यावर (Garden) शब्द लिहिला. राधाने त्यांना green, huge, big etc - शब्द किंवा हे विशेषण वापरून. garden शब्दाचा वाक्यात प्रयोग करण्यास सांगितले. मग तिने कवितेत आलेल्या विशेषणांना गोल करण्यास सांगितले अशा पद्धतीने विद्यार्थ्यांना आपले ज्ञान वाढवता येते.

**चौथा दिवस :** राधाने प्रश्न उत्तरे सोडवून घेण्यास सुरवात केली. तिने मोठ्याने प्रश्न वाचले. मुलांना इंग्रजीमध्ये प्रश्न जे समजले नाहीत तेवढे तिने ते हिंदी व स्थानिक भाषेतून त्यांना प्रश्न समजावून सांगितले व उत्तरे देण्यास त्यांना प्रोत्साहन दिले. मुलांनी स्थानिक भाषेतुन दिलेली उत्तरे तिने लिहिली. मग ती उत्तरे तिने चर्चा करून इंग्रजीतून फळ्यवर लिहिली. शेवटी मुलांनी फळ्यावरील प्रश्नांचे उत्तर लिहून काढले आणि तो पाठ संपला.

**तुमची प्रगती तपासा - 8**

1) राधा कोणता विषय शिकवत होती?

अ) हिंदी   ब) इंग्रजी   क) विज्ञान   ड) गणित

2) राधाने शेवटच्या दिवशी मुलांना फळ्यावर लिहिलेली उत्तरे वहीत लिहिण्यास सांगितली. मुले त्यामुळे एखादी भाषा शिकले का?

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

3) तुम्ही तिसरी इयत्तेला तिच कविता शिकवत आहात असे समजून पाठ नियोजन तयार करा.

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

### 8.6.5 गोष्ट पद्धती तंत्र – परिणामकारक पाठ नियोजन

हरियानातील फरिदाबाद येथे कौशल पाचवीच्या वर्गाला इंग्रजी शिकवतो. त्याच्या वर्गात पंचवीस विद्यार्थी आहेत जे मध्यम वर्गीय कुटुंबातील आहेत. काही मुलांचे पालक रोजंदारीवर काम करणारे मजूर आहेत. तर काही रस्त्याच्या बाजूला बसून फळे विकणारे आहेत. मुलांना घरचे काम करून आपल्या बहिणभावंडांचा सांभाळ करावा लागतो.

आज कौशल हरियाना बोर्डच्या क्रमिक पुस्तकातील नव्वा धडा शिकवणार आहे. नरेंद्र नावाच्या मुलाच्या बालपणाबद्दल हा धडा आहे पुढे जाऊन तो मोठा माणूस बनतो. कौशलने वर्गात जाण्याआधी धडा वाचला.

**पहिला दिवस :** कौशलने मुलांना त्यांच्या बालपणाचा अनुभव सांगण्यास सांगितले. कौशल्याने त्यांना सांगितले की तुम्ही काय काय मज्जा करत होता, कोणत्या शिक्षा तुम्हाला दिल्या जात होत्या. त्यावर चर्चा करा. त्याने त्याच्या स्वताच्या बालपणाची गोष्ट मुलांना सांगितली जेणेकरून मुलानंमधील लाजाळूपणा व प्रतिबंध निघेल, त्यामुळे मुलांनी आपल्या बालपणाचे अनुभव सांगितले. कौशलने वर्गात धडा मोठ्याने वाचण्यास सुरवात केली कारण त्याच्या वर्गातील मुलांना इंग्रजी वाचता येत नव्हते. आणि जे वाचू शकत होते ते फक्त दोन ते तीन शब्द. त्याने तो धडा आवाजात चढ – उतार करून व वेगवेगळ्या कृती करून वाचला. बऱ्याचदा त्याने स्पष्टीकरण करण्यासाठी स्थानिक भाषेचा वापर केला. नरेंद्रच्या बालपणावर आधारित तीन उतारे त्याने वाचले. त्याने मुलगा नरेंद्र लहान मुले म्हणून कसा होता? असा मुलांना प्रश्न विचारला. त्यावर त्यांचे मत विचारले. व परत गोष्ट वाचण्यास सुरवात केली. मुलांनी नरेंद्र बद्दल जे मत तयार केले होते त्याबद्दल बोलण्यास सुरवात केली. स्पष्टीकरण व चर्चा झाल्यावर कौशलने खाली दिलेल्या प्रश्नांची यादी तयार केली.

नाव : ______________________________

वय : ______________________________

आई काय करते : ______________________________

आईचे काम : ______________________________

वडिलांचे नाव : ______________________________

वडिल काय करतात : ______________________________

तुम्हाला काय आवडते? ______________________________

तुम्हाला काय आवडत नाही? ______________________________

पहिली प्रश्नावली म्हणून कौशलने मुलांना पुस्तकातून नरेंद्रची माहिती शोधण्यास सांगितली. मुलांना माहिती शोधण्यास व लिहिण्यास अवघड गेले. कौशलने मुलांना दिलेली प्रश्नावलीत एकमेकांची माहिती लिहिण्यास सांगितली. सुरवातीला मुले आणि मुलींना एकमेकांशी बोलण्यास संकोच वाटत होता परंतु नंतर ते एकमेकांशी बोलू लागले.

**दुसरा दिवस :** कौशलने पहिल्या दिवसाच्या कृती बद्दल बोलण्यास सुरुवात केली स्थानिक भाषेचा वापर करून ती गोष्ट पुन्हा वाचली व काही अवघड शब्द देखील वापरले. वर्गातील मुलांचे चार भाग केले व नरेंद्र बद्दल चर्चा करून त्याचे मुद्दे लिहिण्यास सांगितले. त्याने मुलांना स्थानिक भाषेतून बोलण्याचे स्वातंत्र्य दिले. वर्गात मुले बोलत असल्यामुळे आवाज वाढला होता. कौशलने वर्गात फेरी मारताना त्यांना हळू बोलण्यास सांगितले.

**तिसरा दिवस :** मुलांनी आपले काम समुहात पूर्ण केले. प्रत्येकाच्या कामाच्या दर्जा प्रमाणे कौशलने त्यांना नंबर दिले. चर्चेतून मुद्दे काढून त्याने ते फळ्यावर लिहिले. फळ्यावरील मुद्दे घेवून वर्ग संपेपर्यंत चर्चा चालू होती.

Notes

**चौथा दिवस :** कौशलने धड्याच्या शेवटी दिलेया प्रश्नांची उत्तरे, धडा वाचत असताना शोधण्यास सांगितले. मुले उत्तर शोधत. असताना कौशल फळ्यावर लिहित होता. अशा पद्धतीने त्याने चर्चात्मक रितीने संपुर्ण प्रश्न पूर्ण करून घेतले.

**तुमची प्रगती तपासून पहा – 9**

1) दुसऱ्या दिवशी गोष्ट वाचताना कौशलने कोणती भाषा वापरली?

   अ) स्थानिक भाषेतील शब्द    ब) इंग्रजी शब्द

   क) उर्दू शब्द    ड) हिंदी शब्द

2) कौशलने मुलांना नरेंद्र बद्दल लिहिण्याचे का थांबवले व एकमेकांनबद्दल लिहिण्यास का सांगितले?

3) कौशलने वर्गाचे चार भाग का केले?

4) गटकार्य मुलांचे अध्ययन परिणामकारक करण्यासाठी कशी मदत करते?

5) चर्चात्मक पद्धतीने अध्ययन केल्यास वर्गात जास्त आवाज होतो? तुमच्या मतानुसार अशा पद्धतीने वर्ग घेणे चांगले आहे का? तुम्हाला असे वाटत नाही का की वर्गाची शिस्त त्यामुळे मोडते? स्पष्टीकरणास आपले उत्तर लिहा.

## 8.7 मोठे चित्र व जाहिराती (Posters and Advertising)

परिणामकारक पाठ नियोजनासाठी मोठे चित्र व जाहिराती फार महत्त्वाच्या असतात. ते आपल्या जीवनाशी व परिसराशी संबंधित गोष्टी फार सोप्या आणि आनंददायी मार्गाने दर्शवतात, आजपर्यंत जाहिराती आणि सामान्य मोठी चित्र देखील औपचारिक शैक्षणिक साधने म्हणून वापरली गेली नाहीत. जरी ह्या सर्व छोट्या गोष्टी असल्या तरी शिक्षकांशी आणि विद्यार्थ्यांशी त्या ठराविक पद्धतीने जोडल्या गेल्या आहेत.

आपण निरनिराळ्या प्रकारचे फलक, मोठी चित्र व जाहिराती, वेगवेगळ्या शाळा, ऑफिस, दुकाने, मार्केट इत्यादी ठिकाणी पाहतो. आपल्या ते समजण्यासाठी फार कष्ट घ्यावे लगत नाही. कारण ते इतके साध्या हेतूने बनवलेले असतात की कमीत कमी शिकलेल्या लोकांनाही सहज समजते. अशा प्रकारच्या वस्तू वाचन कौशल्य वाढवण्यासाठी मदत करतात. अशा मार्गाने एखादा दुसरी भाषा सुद्धा शिकू शकतो. अनेक मार्गाने आपण त्याचा वापर करू शकतो. आपण प्रकल्प कार्यासाठी मुलांना मोठी चित्र, सहीचा फलक, किंवा कोणतीही जाहिरात बनवण्यास सांगू शकतो.

चित्र व लेखन करून उत्तम प्रकल्प बनवा. आपण मोठ्या चित्रांचा वापर वाचन तसेच चित्रकार्ड स्पष्टीकरण व सादरीकरणासाठी देखल वापरू शकतो.

प्राथमिक किंवा छोट्या वर्गांसाठी जसे इयत्ता 3 री विद्यार्थी चित्रांमधून किंवा चित्र बघून शब्दांची यादी पद्धतशीर तयार करू शकतात. आपण त्यांना माहितीचा फलक दाखवून त्याचा अर्थ विचारू शकतो आणि त्या फलकाचा उद्देश काय हे चित्र किंवा चिन्हांद्वारे आणि त्यात काय संदेश आहे हे देखील विचारू शकतो. मूलभूत रित्या काय सुचवत आहे ते सांगू शकतात. आपण मुलांना ते संदेश त्यांच्या शब्दांत सांगण्यास सांगू शकतो.

**तुमचे ज्ञान तपासा – 10**

1) आपल्याला आजूबाजूच्या परिसरातील चित्र व जाहिराती काय सूचवतात.

   अ) अवघड मार्ग　　ब) अनावश्यक मार्ग

   क) साधे व आकर्षक मार्ग　　ड) कंटाळा आणणारे मार्ग

2) तुम्ही तुमच्या परिसरात पाहिलेली 20 चित्रे आणि माहिती फलकाची यादी तयार करा.

   ------------------------------------------------------------

   ------------------------------------------------------------

   ------------------------------------------------------------

3) कोणत्या प्रकारचे चित्र (पोस्टर्स) आपण पाचवी इयत्तेतील विद्यार्थ्यांच्या पाठ नियोजनासाठी तयार करू शकतो? ह्या संदर्भात विचारता येतील अशा पाच प्रश्नांची यादी तयार करा.

   ------------------------------------------------------------

   ------------------------------------------------------------

   ------------------------------------------------------------

4) तुमच्या मतानुसार भाषा अध्ययन वर्गात पोस्टर्स आणि जाहिरातीच महत्त्व काय आहे? पोस्टर्स आणि जाहिराती दुसऱ्या ठिकाणी वापरू शकतो काय?

   ------------------------------------------------------------

   ------------------------------------------------------------

   ------------------------------------------------------------

5) इयत्ता 1 ली व 2 री इयत्तेसाठी पाठ नियोजन जाहिरातींचा वापर करून करा व तीच जाहिरात एक शैक्षणिक साधन म्हणून इयत्ता चौथी साठीपाठ नियोजन तयार करा.

   ------------------------------------------------------------

   ------------------------------------------------------------

   ------------------------------------------------------------

## 8.8 पाठ नियोजन कसे तयार करायचे

वर्गात दोन महत्त्वाचे घटक असतात. शिक्षक आणि विद्यार्थी दोन्ही घटक ज्ञान प्राप्तीच्या अंतीम व दोघांच्या ज्ञानाची वाढ एकत्रत होत असते कारण दोन्ही घटक. अध्ययन प्रक्रियेत असतात. दुसरे महत्त्वाचे घटक ते वर्गात असतात ते म्हणजे क्रमिक पुस्तक, धडे, परीक्षा, मुलांना मिळालेला अनुभव, पालकांचा अपेक्षा, इत्यादी. पाठ टाचणाचे नियोजन करताना ह्या सर्व बाबी लक्षात ठेवाव्या लागतात. कठोर पाठ नियोजन आणि अध्यापनात लवचिकता महत्त्वाची आहे.

त्यासाठी नियोजन लक्षात ठेवून ठाम उदिष्टे ठरवून शेवटच्या क्षणात तडजोड करावी लागते. जी उद्दिष्टे ठरवलेली असतात ती शिक्षिकेने लिहून काढली पाहिजेत म्हणजे ती दृष्टीक्षेपामध्ये राहतील व हळूवार प्रगती साधू शकेल शिक्षकाला परिस्थितीनुसार वर्ग कृती बदलावी लागली तरी

Notes

चालेल. आपण बघू पाठ नियोजन कसे तयार करायचे आणि पाठ कसा विभागायचा, मात्र भाषा आली पाहिजे ही गोष्ट लक्षात ठेवा.

1. वर्गाची वेळ : शिक्षकांना आधी माहीत हवे की आठवड्यात व वर्षात त्यांना किती तास मिळतात, प्रत्येक धड्याप्रमाणे तुम्हाला मिळणारा वेळ तुम्हाला तुमचे उदिष्ट साध्य करण्यास उपयोगी पडेल. शिकवण्याचे तास आणि शिकवण्याचे दिवस तुम्हाला वर्षभराचे नियोजन करण्यास मदत करते व पूर्ण अभ्यासक्रम ध्येय आणि उदिष्टांप्रमाणे पूर्ण होऊ शकेल.
2. वर्गातील विद्यार्थी संख्या आणि विद्यार्थ्यांचा वय गट
3. धड्याचे नाव
4. पूर्वज्ञान : विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान तपासणे गरजेचे आहे. पूर्वज्ञान तुमच्या पाठ नियोजनासाठी व तुमचे ध्येय आणि उदिष्टे साध्य करण्यासाठी संबंधित आहे. जर एखादा शिक्षक तिसरीच्या वर्गाला इंग्रजी शिकवत असेल तर तो अपेक्षा करेल त्या विद्यार्थ्यांना इंग्रजी अक्षरे व अंक माहित पाहिजेत. काही विद्यार्थ्यांना ते माहीत नसेल तर शिक्षकाला त्याच्या नियोजनात अशी तडजोड करावी लागेल की कमीत कमी पात्रतेची मुले सुद्धा त्या नियोजनात ज्ञान साध्य करू शकतील.
5. सामान्य उद्दिष्ट : हे उद्दिष्ट तुम्हाला पाठातून व नियोजनातून साध्य करायचे असते.
6. ठराविक उदिष्ट : हे उदिष्ट दिवसानुसार नियोजनाशी संबंधित आहे. ठराविक तासाला किंवा दिवसाला वर्गात काय झाले ते स्पष्ट करते.
7. पद्धत किंवा प्रक्रिया : वर्गात प्रगतीचे सामान्य आणि ठराविक उद्दिष्ट प्रगतीच्या दिशेन धड्यानुसार किंवा पाठानुसार साध्य करण्याबाबत आहे.
8. स्वत:चे मुल्यमापन : हा रकाना काहीही न लिहिता तसाच वर्गाचे मुल्यमापन झाल्यावर शिक्षकाने तो भरला पाहिजे. काय बरोबर झाले किंवा काय चुकले हे त्याने तिथे लिहिले पाहिजे. ठरवलेले उदिष्ट साध्य झाले किंवा नाही तसेच वर्गात तुम्हाला नियोजनात काय व का बदल करावे लागले हे सांगता आले पाहिजे.
9. सल्ला : ह्या भागात तुम्हाला तुमचे वगातील अनुभव लिहून काढता येतात. आणि तुम्ही ठरवलेल्या नियोजनात तडजोड करण्यास मदत करते. पहिल्या दिवसाच्या अध्ययन कृतीतून जे तुम्ही नियोजन केले असेल ते यशस्वी होईल किंवा नाही हे पडताळून पहाता येईल.

**तुमची प्रगती तपासा – 11**

1) ज्या वेळेस तुम्ही नियोजन करत आहात त्यावेळेस साधारणपणे किती गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत?

   अ) चार   ब) पाच   क) नऊ   ड) बारा

2) स्वयं मूल्यमापन म्हणजे काय?

   ------------------------------------------------------------
   ------------------------------------------------------------
   ------------------------------------------------------------

3) ठराविक उद्दिष्टे आणि सामान्य उदिष्टांमधील फरक कोणता?

   ------------------------------------------------------------
   ------------------------------------------------------------
   ------------------------------------------------------------

4) पाठ नियोजनात करताना कोणत्या घटकांचा समावेश केला पाहिजे?

   ------------------------------------------------------------
   ------------------------------------------------------------
   ------------------------------------------------------------

या घटकातून नमुना पाठ नियोजन कसे तया करायचे हे समजले असेल. तुम्ही निरिक्षण केले असेल महिमाने तिचे पाचवीच्या वर्गाचेपाठ नियोजन कसे केले असेल. कोतरा येथील शाळेत जपान या घटकावर तिचा पाठ होता.

उदा. आपण पाहिले महिमाने जपान बद्दल बोलण्यास सुरवात केली आणि मग त्यांचे सण व संस्कृती बद्दल माहिती दिली. जपान हा देश नेमका कुठे आहे हे दाखवण्यासाठी तिने नकाशाचा आधार घेतला आणि जपानची राजधानी टोकिओ बद्दल देखील बोलली. तिने त्यांच्या भाषा, कपड्यांची पद्धत, विधी, सामाजिक शैली, जेवण, फुलांचे काम इत्यादी बद्दल सांगून जपानचे खरे चित्र त्यांच्यासमोर उभे केले. ह्या नंतर त्यानी धड्यात दिलेल्या चित्रांबद्दल, अवघड शब्दांबद्दल चर्चा केली असेल. सर्व प्रयत्न विद्यार्थी केंद्रित असतात. तो पाठ समजून सांगण्याची पद्धत त्यासाठी घेतलेली समुहकृती आणि वैयक्तिक सहभाग. प्रत्येक उतारा समजून सांगितल्यावर तुम्ही प्रश्न विचारू शकता. दहाव्या धड्यात प्रकल्पाच्या भागात असे अपेक्षित आहे की मुलांनी एकत्रितरित्या जपानवर आधारीत भरपुर साहित्य जमा केले पाहिजे. शिक्षिकेने प्रकल्पकामाचे प्रदर्शन वर्गात मांडू शकतील.

## 8.9 सारांश

- जर आपण पाठ नियोजन केले तर अधिक चांगल्या पद्धतीने शिकवू शकतो.
- यशस्वी पाठ नियोजन करण्यासाठी शिक्षकाला विद्यार्थ्यांची पार्श्वभूमी वर्गातील परिस्थिती, धड्याचा अर्थ व पार्श्वभूमी माहीत पाहिजे.
- प्राथमिक स्थरावर मुलांना जी भाषा येते त्या भाषेतून बोलण्यास परवानगी दिली पाहिजे.
- मुलांनी वर्गकृतीत सहभाग घेतला पाहिजे, फक्त शिक्षकच बोलले तर ते एकतरफी झाल्यासारखे होईल.
- असे काही नाही की जे तुम्ही वर्गात शिकवण्याचे नियोजन करता तेवढेच मुलं शिकतात. मुलांना त्यांच्या स्वतःच्या प्रक्रिया व विचार आहेत जे ते अध्ययनासाठी वापरतात आणि म्हणून विचार करणाऱ्या कृतींबद्दल तुम्हाला मुलांना कसे व्यस्त ठेवता येईल याचा विचार पाठ नियोजन तयार करताना शिक्षकाने केला पाहिजे.
- विद्यार्थ्यांनी दिलेल्या उत्तरांमध्ये चुका शोधण्यापेक्षा मुलांनी त्या प्रश्नाचे उत्तर देताना काय केले आहे ते पहाणे आवश्यक आहे. अध्ययनाची तपासणी चुकांच्या आधारे नाही तर ज्ञान प्राप्तीच्या आधारे केली पाहिजे. विद्यार्थ्यांचे काय बरोबर आहे हे शिक्षकाने पाहिले पाहिजे. परंतु दुर्दैवाने आपण चुकांवर लक्ष केंद्रित करतो.
- वर्गात येण्यापूर्वी जर शिक्षकांनी तो पाठ किंवा धडा दोन ते तीन वेळेस वाचला व वेगवेगळ्या कृती आणि तडजोडीबाबत जर विचार केला तर ते सोपे जाते.
- पाठ नियोजन करण्यापूर्वी शिक्षकाला विद्यार्थी संख्या मुलांचा वयोगट, वर्गातील परिस्थिती आणि विद्यर्थ्यांची किंवा त्यांच्या पाठा बाबतच्या ज्ञानाची पार्श्वभूमी माहित पाहिजे.

**कृती**

- तीन पाठ टाचण तयार करा :

  1) कवितेवर 2) गोष्टीबाबत 3) नाटकाबाबत विद्यार्थ्यांवर तो पाठ घेऊन बघा. तुमचे अनुभव लिहा.

## 8.10 वाचणासाठी व संदर्भासाठी सुचवलेले पुस्त

हिंदी भाग – 2 (2000) पटणा : बिहार स्टेट क्रमिक पुस्तक प्रसिद्धी कॉरपोरेशन लिमिटेड.

इंग्लिश बुक – 5, (2004) पंचकुला : हरियाणा गव्हरमेंट क्रमिक पुस्तक

## 8.11 घटकावरील अभ्यास

1. जे नमुना पाठ तुम्ही पाहिले आहेत त्या नमुना पाठ टाचणातुन तुम्हला काय समजले त्याची यादी करा. खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे चर्चा करा.
   अ) शिक्षकाची भूमिका
   ब) मुलांचा वर्गातील सहभाग
   क) विषयाचे काम
   ड) प्रश्न – उत्तरांची चर्चा करण्याची पद्धत
2. महिमाचा वर्ग आणि दुसऱ्या वर्गात महत्त्वाचा फरक काय होता?
3. एखाद्या वर्गाला शिकवण्यास सुरवात करण्यापूर्वी तुम्ही कोणत्या प्राथमिक वस्तु गोळा केल्या पाहिजेत व का? पाठनियोजन करताना त्याच्यामुळे काय फरक पडेल?
4. जर तुम्ही महिमाच्या जागेवर असता तर तुम्ही जपानचा धडा कसा शिकवला असता? पाठ नियोजन तयार करा.

# घटक 9 : शैक्षणिक साहित्य काही नवे आयाम

**संरचना :**

9.0 प्रस्तावना
9.1 अध्ययन उद्दिष्टे
9.2 शिक्षणासाठी आवश्यक साहित्य
9.3 शैक्षणिक साहित्य कशासाठी?
9.4 शैक्षणिक साहित्य किंवा अध्ययन-अध्यापन साहित्य
9.5 वस्तु व प्रतिरुपे प्रदर्शनासाठी
9.6 अध्ययन-अध्यापन साहित्य कशाप्रकारे मदत करते?
9.7 चांगले शैक्षणिक साहित्य म्हणजे काय?
9.8 एखादा केवळ एखाद्या शैक्षणिक साहित्याबरोबर काय करू शकेल?
9.9 भाषा अध्यापनात कार्डचा वापर
9.10 अध्ययनाच्या संदर्भात भाषा अध्यापनाचे साहित्य
9.11 भाषेच्या वर्गात शक्य ते साहित्य
9.12 साहित्याची उपलब्धता
9.13 साहित्य कसे वापरावे?
9.14 साहित्याची निवड कशी करावी? घटकाचे शेवटीचा स्वाध्याय
9.15 समारोप
9.16 सुचविलेले वाचन व संदर्भ
9.17 घटकाचे शेवटी स्वाध्याय

Notes

## 9.0 प्रस्तावना

काळजीपूर्वक विचार केला तर सभोवतालची प्रत्येक वस्तु शैक्षणिक साहित्य म्हणून वापरता येते. एका अर्थात शाळा, वर्ग मैदान इत्यादी ठिकाणी दगड, पाने, धूळ गोट्या इत्यादी शैक्षणिक साहित्य असते. अलिकडे काही शैक्षणिक साहित्य गुंतागुंतीचे व तांत्रिक होत चालले आहे. अशी एक भ्रामक कल्पना बनत आहे की जे काही इलेक्ट्रॉनिक किंवा महाग ते ते उत्तम शैक्षणिक साहित्य असते. माहिती तंत्रज्ञानाला मदत देण्याने संगणक, इंटरनेट, वेबसाईट, नेटवर्क इत्यादी नव्या प्रकारचे साहित्य व नावे आपल्या भोवती आहेत. एक वेळ अशी होती की रेडिओ, दूरदर्शन, टेपरेकॉर्ड इत्यादी म्हणजे चांगले शैक्षणिक साहित्य असे समजले जात होते. त्यापूर्वी छोट्या वस्तू, भित्तीचित्रे, फ्लॅशकार्ड इत्यादी म्हणजे शैक्षणिक साहित्य अस समजत असत. अलिकडे त्यांचे महत्त्व कमी झाले आहे. आत्ताच्या काळातही हे साहित्य वेळेवर व पुरेशा संख्येने शाळेपर्यंत पोहचत नाही.

अलीकडील वर्षात अध्ययन-अध्यापन क्रियेचा अर्थ समजल्याने विद्यार्थ्याची क्षमता व अभिरूची इत्यादीमध्ये आमूलाग्र बदल झाला आहे. या बदलाच्या संदर्भात शैक्षणिक साहित्याचा अर्थ, वापर व प्रकार नव्याने तपासून पहाण्याची गरज निर्माण झाली आहे.

शैक्षणिक साहित्याचे वर्गीकरण करण्याचे अनेक प्रकार आहेत. एक वर्गीकरणाचा मार्ग म्हणजे शिक्षकासाठी शैक्षणिक साहित्य व विद्यार्थ्यासाठी शैक्षणिक साहित्य असा आहे. दुसरा प्रकार म्हणजे दृश्य व तोंडी इत्यादी. या वर्गीकरणांचा हेतू व वापरावयाची पद्धत यात फरक आहे. शैक्षणिक साहित्य अध्यापन पद्धतीसाठी योग्य आहे किंवा नाही हो स्वत:हून सांगत नाही हे लक्षात घेतले

Notes

पाहिजे. शैक्षणिक साहित्याचे वापरासंबंधी नियोजन कसे आहे हा मुख्य प्रश्न आहे. वर्गात कोणतेही साहित्य कसे दिसेल त्याच्या उपयोगाने कोणती उद्दिष्ट्ये पूर्ण होतील या प्रश्नांची चर्चा या घटकात करणार आहोत.

## 9.1 अध्ययनाची उद्दिष्टे

**हा घटक वाचल्यावर तुम्ही**

- शैक्षणिक साहित्याचे प्रकार सांगू शकाल.
- आवश्यक शैक्षणिक साहित्य कोणते ते समजू शकाल.
- चांगले शैक्षणिक साहित्य कोणते यावर तुमचे मत व्यक्त करू शकाल.
- अध्ययन–अध्यापन साहित्य व शैक्षणिक साहित्य यातील फरक सांगू शकाल.
- भाषेच्या अध्यापनात अध्ययन साहित्याचा वापराचे विश्लेषण करू शकाल.
- अध्ययन साहित्य कधी व कसे वापरावे ते सांगू शकाल.

## 9.2 वाङ्मयीन युक्त्या

कुठल्याही वर्गात कोणते तरी शैक्षणिक साहित्य उपलब्ध असण्याची आवश्यकता असू शकते हे ओळखणे महत्त्वाचे आहे त्याचप्रमाणे त्या उपलब्ध असल्या पाहिजेत. सध्या आपण या तथ्याकडे लक्ष देत नाही की चांगले शिक्षण देणे शक्य व्हावे म्हणून काही साहित्य उपलब्ध असले पाहिजे, त्याती काही लगेचच आपल्या मनात येते पण काही साहित्य असे असते की जे स्पष्ट नसते. उदाहरणार्थ : प्रत्येक बालकाला बाक, टेबल वा खुर्ची बसायला लागते, उजेडाचे स्त्रोत, शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय, स्वच्छतागृहे व इतर गोष्टी आवश्यक असतात. नवे शैक्षणिक धोरण 1986 म्हणजे देशातील शालेय शिक्षणात सुधारणा घडवून आणण्यासाठी महत्त्वाचा टप्पा आहे. यातला महत्त्वाचा मुद्दा म्हणजे गरजा ओळखून प्रत्येक शाळेत त्या उपलब्ध करणे, यात वर्गांची कमीत कमी संख्या, बैठक व्यवस्था, खेळाचे साहित्य, ग्रंथालयातील पुस्तके इत्यादींचा समावेश होतो. तुमच्यासाठी स्वत:च्या शाळेचा विचार करणे उपयुक्त ठरेल आणि शाळा व्यवस्थितपणे कार्यरत असण्यासाठी कोणते साहित्य उपलब्ध असणे आवश्यक आहे हे स्वत:शी ठरविणे योग्य होईल.

शाळेतील या आवश्यक साहित्या व्यतिरिक्त इतर शैक्षणिक साहित्य अध्यापनासाठी आवश्यक असते.

**तुमची प्रगती तपासा 1**

1) हे साहित्य आवश्यक आहे का? कारणांसह सांगा.

(अ) तक्ता (ब) प्रतिकृती (क) बाक (ड) भाषा कार्डे

2) शाळेत कोणते आवश्यक साहित्य उपलब्ध हवे?

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

3) तुमच्या मते तुमच्या शाळेत कोणत्या प्रकारचे साहित्य उपलब्ध नव्हते?

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

Notes

## 9.3 शैक्षणिक साहित्य कशासाठी?

साहित्याबद्दल पहिला महत्त्वाचा प्रश्न म्हणजे त्याचा प्रमुख उपभोक्ता कोण आहे? आपल्याला अध्ययन अध्यापन म्हणजे काय या गोष्टीच्या समजण्यावर या प्रश्नाचे उत्तर अवलंबून आहे. आपला दृष्टीकोन शिक्षकासाठी त्यांचा उपयोग कसा आवश्यक आहे हे त्याच्या / तिच्या नजरेतून स्पष्ट करण्याचा हवा, प्रतिकृती किंवा मूर्त प्रतिनिधीत्व सादर करण्याचा हवा. याचा अर्थ असा की शिक्षक बालकांना योग्य स्पष्टीकरण देतात. आपण बालकाने साधारणपणे शांत असण्याची व काळजीपूर्वक ऐकण्याची अपेक्षा करतो, तो / ती शिक्षकाचे शब्द लक्षात ठेऊन ते वहीत उतरवून घेतात किंवा जर त्याला / तिला शिक्षकाने सांगितले असेल तर साहित्याचा वापर करतात. या तत्त्वामुळे तक्ते, स्लाईड, प्रतिकृती इत्यादी, वस्तूचे प्रतिनिधीत्व करण्याचा मार्ग आहे हे बालकाला माहिती होते. ही अध्यापक केंद्रित पद्धत आहे आत्तापर्यंत ती सामान्यतः मान्यता व लोकप्रिय पद्धत आहे. आतासुद्धा अनेक जण तिच्यावर विश्वास ठेवतात. या पद्धतीत अध्यापन साहित्य फक्त शिक्षकांकडूनच वापरले जाते. बालके साहित्याकडे केवळ बघू शकतात. ते साहित्य वापरू किंवा हाताळू शकत नाहीत. जर बालकांनी साहित्याला स्पर्श केला तर त्याची हानी होईल अशी शिक्षकांना भिती वाटते. आधीच्या घटकात वाचल्याप्रमाणे हा दृष्टीकोन प्राथमिक स्तरावरील बालकांसाठी उपयुक्त नाही. आता प्रत्येक बालक स्वतःच्या ज्ञानाची बांधणी स्वतःच्या पद्धतीने करते असा विश्वास आहे. शिक्षक यात केवळ मदत करू शकतात. इतरांनी तयार केलेल्या तार्कीक बांधण्या समजून घेण्यापेक्षा स्वतःच्या तार्कीक पद्धतीचा वापर करून स्वतः बांधणी करणे हे बालकासाठी अधिक महत्त्वाचे आहे. आता बालकाने स्वतः साहित्याचा वापर करणे ही अधिक पुरस्कृत पद्धत आहे. त्याने / तिने विविध संकल्पनांसाठी स्वतःची तार्कीक घडणी करणासाठी त्याला / तिला साहित्य मदत करते. यासाठी बालकाला साहित्याशी आंतरक्रिया करून, त्याचे परीक्षण करून त्याचा विविध कारणांसाठी वापर करणे, त्याच्या भागाची बांधणी किंवा उलगडणी करणे, इत्यादींची संधी मिळाली पाहिजे. या अध्यापन क्रियेत, साहित्य, शिकणाऱ्या बालकासाठीच असते म्हणून ते कायम त्यांच्याजवळ हवे किंवा त्याला सहज उपलब्ध हवे.

भाषेच्या वर्गात साहित्याचा वापर, इतर विषयातील उपयुक्ततेनुसार, वैशिष्ट्यपूर्ण रितीने केला जातो. भाषेच्या वर्गात कोणत्या प्रकारचे साहित्य लागते व ते दोन संकल्पनांच्या अध्यापनात कसे वापरावे हे पुढील भागात पाहू.

आपण काही लोकप्रिय संज्ञांचाही विचार करू आणि त्यांचे अध्यापनाच्या दोन दृष्टीकोनाच्या संदर्भात परीक्षण करू. त्याचबरोबर भाषाध्यापनाच्या दृष्टीनेही त्यांचे परीक्षण करू.

शैक्षणिक चर्चेमध्ये अध्ययन–अध्यापन साहित्य ही संज्ञा लोकप्रिय आहे. त्याचप्रमाणे अध्यापन–साहित्य ही संज्ञाही वारंवार वापरली जाते. या दोन संज्ञांचा वापर समानार्थाने केला जातो. तरीही या दोन संज्ञा वेगवेगळ्या प्रकारचे साहित्य व त्यांच्या वापराबद्दल वेगळ्या प्रकारचे दृष्टीकोन निर्देशीत करतात.

**तुमची प्रगती तपासा 2**

1) TLM याचे विस्तृत रूप म्हणजे –

------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

2) अध्ययन–अध्यापन साहित्य मुलांपर्यंत पोचले पाहिजे हे महत्त्वाचे व आवश्यक का आहे?

------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

Notes

3) अध्यन–अध्यापन साहित्याचा अर्थ काय आहे?
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

4) प्राथमिक वर्गांसाठी अध्यापनाचा अलिकडचा कोणता दृष्टीकोन योग्य समजला जात नाही.
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

## 9.4 अध्यापन अध्ययन साहित्य व अध्यापन साहित्य

सर्व वर्गात व सर्व विषयात कोणत्याही संदर्भाशिवाय सर्व समस्यांची जागतिक उकल म्हणून अध्यापन–अध्यायन साहित्याकडे बघितले जाते. अध्यापन–अध्ययन साहित्याचा वापर जादुई आहे व त्याने सर्व गोष्टी बदलतील असा विश्वास आहे. अध्यापन–अध्ययन साहित्य तयार करण्यासाठी कार्यशाळा घेतल्या जातात. त्यात थर्माकोल, चार्टपेपर, रंग आणि सर्व प्रकारचे साहित्य उपलब्ध असते. अध्यापक ह्यांची कला, कल्पना, प्रदर्शित करून, खूप कष्ट घेऊन केलेल्या, सुंदर व शोभिवंत प्रतिकृतीचे प्रदर्शन करतात.

## 9.5 प्रतिकृती व वस्तुंचे प्रदर्शन

जर आपण या प्रतिकृतींच्या दर्जाचे विश्लेषण उपयुक्ततेच्या संदर्भात केले तर आपल्याला पुढील 3 प्रश्न पडतात.

1) या प्रतिकृतींमुळे बालकाला विचार करण्यास मदत होता का? त्यांचा वापर त्याला समजून बांधणीसाठी आधार म्हणून स्वंतत्र कल्पना करून त्या व्यक्त करण्यासाठी होतो का?

**किंवा**

प्रतिकृती केवळ माहिती सादर करतात, प्रत्येकाला हे समजून घ्यावे लागते व त्याच पद्धतीने स्पष्ट करावे लागते.

2) विद्यार्थी प्रतिकृतींबरोबर काही करतात का? त्यांना स्पर्श करतात का? त्यांच्यात बदल करतात का? किंवा त्यांची पुनर्मांडणी करतात का?

**किंवा**

बालकांना त्यांच्यापासून दूर रहावे लागते, कारण जर बालकांनी त्यांचा वापर केला किंवा त्यांना स्पर्श केला तरी त्या मोडतील किंवा खराब होतील.

3) बालकांना त्या वस्तूंपर्यंत पोचता येते व त्या वस्तू त्यांना हाताळता येतात.

**किंवा**

प्रतिकृतीची एक वस्तू बनवणेसुद्धा अवघड असते. प्रत्येक प्रतिकृतीला खूप वेळ व संसाधने लागतात. प्रत्येक बालकाला ते शक्य होत नाही व जवळ बाळगणे शक्य होत नाही.

वास्तवात जर साहित्य अशा प्रकारचे असेल की किंवा या संज्ञेत त्याचे वर्णन येत असेल तर ते अध्ययन–अध्यापन साहित्य नाही अध्ययन–अध्यापन साहित्य म्हणजे अध्ययनासाठीचे व अध्यापनासाठीचे साहित्य होय. खरे तर असे साहित्य, ज्याचे वर्णन नंतरच्या विधानांतून येते त्याची भूमिका विद्यार्थ्यांसाठी नगण्य असते. हे साहित्य अध्यापनाला मदत करते, म्हणजे ते अध्यापन साहित्य आहे.

अध्ययन अध्यापन साहित्य व अध्यायन साहित्य दोन्ही उपयुक्त असतात. पण उपयुक्ततेबाबत व कशाप्रकारे उपयुक्तता आहे या विचार करणे महत्त्वाचे आहे. आपल्याला हे ओळखले पाहिजे की वर्गात साहित्याची उपलब्धता ही उत्तम अध्यापन क्रियेचे समर्थन असत नाही.

नेहमी चांगले अध्ययन–अध्यापन साहित्य व अध्यापन साहित्य म्हणून सादर केले जाणारे साहित्य म्हणजे विविध प्रकारचे तक्ते, थर्माकोल व प्लॅस्टिकने बनविलेल्या प्रतिकृती इ. ही अध्यापनाला पूरक असणारी काही उदाहरणे असू शकतात, पण तो शिक्षक विद्यार्थ्यांसाठी काय करू शकतो याचे उदाहरण असते. त्यांचा अध्ययन–अध्यापन पद्धतीत फारसा उपयोग होत नही. सामान्यत: ती तयार करायला शिक्षकाला खूप दिवस लागतात आणि वर्षानुवर्षे ती अध्ययन–अध्यापन साहित्याच्या खोलीत प्रदर्शनासाठी मांडलेली असतात. पण वर्गात विद्यार्थी त्यांना स्पर्श करू शकत नाहीत किंवा काळजीपूर्वक खूप वेळ पाहू शकत नाहीत. प्रतिकृती खराब होईल या भितीपोटी हे होते. प्रतिकृती हे कलेचे काम समजले जाते आणि ती करायला खूप वेळ लागतो. जर मोडतोड झाली तर पुन्हा तयार करणे अवघड असते.

अशाच प्रकारची अध्यापन साहित्याची उदाहरणे सर्व शाळात व डायेटमधे दिसतात. त्यांच्यामधे, वापरल्या जाणाऱ्या साहित्यात, रंगात व बनविण्यातील कौशल्यातच काय तो थोडासा बदल असतो. या प्रतिकृती बनविणे हे आव्हानात्मक काम आहे आणि त्यासाठी शिक्षकाच्या हस्तकौशल्याची गरज असते. मात्र बालकाला त्याचा उपयोग अपवादानेच होतो. मुले एकदा ती पहातात, बहुदा आश्चर्याने, नंतर त्यांना विसरतात. अध्ययन होत नाही.

## 9.6 अध्यापन–अध्ययन साहित्य कशाप्रकारे मदत करते?

आपल्याला स्वत:चे स्वत:ला हे विचारावयास हवे की आपल्याला विद्यार्थ्यांना काय शिकवायचे आहेत व ते कसे शिकणार आहेत. आपण खरोखरच मुलाला ओळखत असलो तर अध्ययन क्रियेत मुलांनी क्रियाशील असले पाहिजे व तशा संधी मुलांना पुरविल्या गेल्या पाहिजेत. या क्रियेत साहित्य मदत करू शकते. उदाहरणार्थ : बालकांना जर वर्गीकरणात गुंतवून ठेवायचेच असेल तर मूर्त गुणधर्मावर आधारीत गट बनविण्यास सांगणे योग्य होईल. हे गुणधर्म म्हणजे रंग, आकार, वजन किंवा अन्य काही असू शकतील. गट करण्याच्या या प्रक्रियेत त्याला गुणधर्मांचा विचार करावा लागेल आणि त्यासाठी नेमका शब्द शोधावा लागेल. पर्यावरण शिक्षणाचा एक भाग म्हणून तसेच भाषा विकासाचा घटक म्हणूनही, गट पाडण्याच्या क्रियेचा सराव देण्यासाठी विद्यार्थ्यांना साहित्य वापरून कृती करायला सांगितल्या पाहिजेत; तरीही अध्ययन क्रिया पुढे नेण्याच्या दृष्टीने कृतीत सतत सुधारणा करणे, कृती त्यांच्या पातळीची असणे व योग्य साहित्याची निवड करणे आवश्यक आहे.

आपण असे स्वाध्याय अनेक स्तरांवर तयार करू शकतो. आपण विद्यार्थ्यांना दिलेल्या गुणधर्मानुसार वस्तू वेगळ्या करायला सांगू शकतो किंवा आपण विद्यार्थ्यांना वस्तूचे परीक्षण करण्यास, त्याबद्दल विचार करण्यास व त्यानुसार वर्ग करण्यास सांगू शकतो. हळूहळू विद्यार्थ्यांना गुणधर्म व गट करणे याबाबत एकत्रपणे स्वाध्याय देऊ शकतो. उदाहरणार्थ : विद्यार्थ्यांना गोल किंवा इष्टिकाचिती आकाराच्या वस्तू शोधण्यास सांगू शकतो. या क्रियेमुळे विद्यार्थ्यांची वर्गीकरण क्षमता वाढते. क्षमता विकसित झाल्याने विविध स्तरांवरील वर्गीकरण करण्याची क्षमता ही वाढते. यामुळे केवळ भाषेतच सुधारणा होते असे नाही तर विविध भाषातील शब्द वापरण्याच्या क्षमता वाढण्यात मदत होते.

आपण पहातो की उपलब्ध साहित्य अनेक प्रकारे वापरता येते व बालकांना व्यवस्थितपणे प्रत्येक विषयात वापरता येते. प्रत्येक विषयात विविध प्रकारचे साहित्य वापरल्याने विद्यार्थ्यांना अध्ययनात मदत होते.

Notes

**तुमची प्रगती तपासा 3**

1) यापैकी कशात, विद्यार्थ्यांची भूमिका नगण्य आहे?

(अ) अध्ययन–अध्यापन साहित्य (ब) अध्यापन साहित्य

(क) अध्ययन (ड) प्रतिकृती

2) अध्ययन अध्यापन साहित्य म्हणजे जादू नव्हे. हे विधान काय सांगते?

3) अध्ययन–अध्यापन साहित्य व अध्यापन साहित्य यात काय फरक आहे?

4) अध्ययन–अध्यापन साहित्य बालकापर्यंत पोचणे का गरजेचे आहे?

5) अध्ययन–अध्यापन साहित्य कशाप्रकारे अध्ययनात मदत करते? ही सुविधा कशाप्रकारे पुरविली पाहिजे?

## 9.7 चांगले अध्यापन साहित्य म्हणजे काय?

जेव्हा आपण असे म्हणतो की चांगले शैक्षणिक साहित्य शिक्षकाला त्याचे मुद्दे स्पष्ट करण्यासाठी किंवा माहिती देण्यासाठी नसते, तेव्हा एक प्रश्न पडतो. अध्यापनात मदत व्हावी म्हणून काही जादा साहित्याची आवश्यकता आहे का? फळा, खडू, पाठ्यपुस्तके इत्यादी साहित्य वर्गात असले पाहिजे का? जर आपली सुद्धा सुरू असलेली शैक्षणिक साहित्य व त्यांचे उपयोग याबद्दलची समजूत योग्य नाही तर आपण वर्गात साहित्य कसे वापरावे? हा फलकाचा एक योग्य पर्याय, यापेक्षा काहीतरी जास्त असू शकते का? हे तपासण्यासाठी बालक कसे शिकते व अध्ययन क्रिया कशी असते याबद्दल आपल्याला जे जे माहिती आहे त्या सर्वांचा विचार करावा लागेल.

आपल्याला अध्ययन–अध्यापनाबद्दलची सध्याची समजूत लक्षात घ्यावी लागेल. यातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे बालके सुद्धा नवे अनुभव किंवा कल्पना यांचा संबंध पूर्वज्ञानाशी जोडतात. नवीन ज्ञान प्राप्ती ज्ञानाच्या संदर्भातच मिळविली जाते. हे स्पष्ट आहे की मूर्त व तात्काळ अनुभव बालकाला आकलनात मदत करतात. तसेच अमूर्त कल्पनांशी झगडून त्या आत्मसात करायला मदत करतात. खरे तर प्रत्येक बालक हे स्वत:च्या पद्धतीने करतच असते. विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वाची आहे व त्याचा सहभाग अत्यंत आवश्यक आहे हे आपण जाणतोच. शाळेत तो कधीही निष्क्रिय प्रेक्षक वा केवळ श्रोता कधीच असू शकत नाही. बालकाच्या मूर्त अनुभवांचा अर्थ लावून त्याला अध्ययनाला मदत करेल अशा प्रकारचे साहित्य असले पाहिजे.

यावरून साहित्य असे असले पाहिजे की जे बालकाला नीट हाताळता येईल. व नवे ज्ञान मिळविण्यासाठीच्या प्रयोगाला मदत करेल. साहित्य मोडेल किंवा खराब होईल ही भिती मनात न

बाळगता, बालकाला त्याचा उपयोग करता आला पाहिजे व उपयोग करून कृती करता आल्या पाहिजेत. स्वतःच्या ज्ञानाची बांधणी स्वतः करण्यासाठी अध्ययन–अध्यापन साहित्य बालकाला मदत करू शकते. बालके साहित्याशी खेळू शकतील, ते वापरण्याची, त्याचे विश्लेषण करण्याची, तसेच सर्व अध्ययन कृतीची पुनरावृत्ती करण्याची संधी साहित्यामुळे मिळाली पाहिजे. अमूर्त कल्पना समजण्यासाठी त्याच्या मूर्त प्रतिनिधीत्वाचे निरीक्षण (अध्ययन–अध्यापन साहित्याच्या रूपात) करणे उपयुक्त ठरते. तसेच आव्हानात्मक परिस्थितीत विविध संदर्भातील संकल्पनांना धिराने सामोरे जाण्याची संधी मिळते. संकल्पनात्मक ज्ञानाच्या बांधणीत याची मदत होते.

हे नमूद करणे आवश्यक आहे की प्रसंगी बालक (मूर्त प्रतिनिधित्वाशिवाय) संकल्पना समजून ती वापरण्यासाठी सक्षम असते. यावरून हे समजून येते की साहित्याचा वापर हे आकलनासाठीचे साधन आहे व ती अध्ययन–अध्यापन प्रक्रियेतील एक वस्तू नाही. जोपर्यंत वर्गाची उद्दिष्ट नक्की होत नाहीत तोपर्यंत साहित्याच्या वापराचा काहीही उपयोग होत नाही. असे म्हणणे योग्य ठरेल की विविध वयातील, अध्यापनाच्या विविध स्तरातील व विविध शाखातील बालकांसाठी अध्ययन–अध्यापन साहित्याचा अर्थ एकच असणार नाही. विषयाच्या सर्व भागांसाठीही तो एक असणार नाही. अध्ययन–अध्यापन साहित्याच्या वापराचे तंत्राचे स्वरूप भिन्न असू शकते.

सद्यस्थितीत शिक्षकाच्या कलात्मकता सर्जनशीलता या क्षमतांचे प्रदर्शन इतरांना करण्यासाठी शैक्षणिक साहित्य बनविले जाते. हे खोलीला किंवा प्राचार्यांच्या कार्यालयाला सजविण्यासाठी वापरले जाते. अध्ययन अध्यापन साहित्याची चर्चा करत असतांना हे महत्त्वाचे नाही की बालकाला त्याचा काय उपयोग आहे किंवा बालक त्याच्याबरोबर कसे काम करू शकेल. जर निरीक्षण, परीक्षण, उचलणे, फेकणे, विविध प्रकारे हाताळणे आवश्यक असेल तर त्याचे स्वरूप वेगळे असले पाहिजे. बालकांना साहित्य वापरायचे स्वरूप, प्रदर्शित करावयाच्या साहित्यापेक्षा वेगळे असले पाहिजे ते खूप महाग व सहजपणे मोडणारे असे असणार नाही.

वर्ग जिथे विद्यार्थी, चांगले आकलन होण्याची संधी देणाऱ्या अध्ययन–अध्यापन कृतींमधे सहभागी होतीत, ती आकर्षक असली पाहिजे. पण ती आकर्षकता खोली कशी दिसते यावर अवलंबून असलेली नको. खोली सुंदरच दिसली पाहिजे व तशीच राहिली पाहिजे हे आवश्यक नाही. पण खोलीचा मुलांना सर्व वेळेस उपयोग झाला पाहिजे. खोलीने मुलांचे स्वागतच केले पाहिजे आणि ही खोली आपली आहे अशी भावना निर्माण झाली पाहिजे. कशालाही स्पर्श केल्यावर खोलीत अस्वछता वा मोडतोड होईल अशी भावना निर्माण व्हावयास नको. आपण येथे खेळू शकू व राहू शकू अशी भावना निर्माण व्हावयास हवी. प्राथमिक शाळेचे सौंदर्य हे आहे की त्यातील विद्यार्थी आनंदी, उत्साही व चेतनेने भरलेले असले पाहिजे. हे सौंदर्य रंगीत भिंती, सुंदर तक्ते किंवा भिंतीवर लटकणारे इतर साहित्य यात नसते. जर आपल्याला प्राथमिक शाळेतील वर्ग सुंदर व आकर्षक बनवायचे असतील तर बालकांना कृतीशील बनविणारे साहित्य व कृती तेथे हव्या. तेथे बालकांना सक्षम व मोकळेपणा वाटला पाहिजे. त्यांना असे वाटले पाहिजे की खोलीतील जागा व साहित्य हे स्वतःचे आहे तरच संकल्पना व अनुभवांच्या विकासाला तेथे पाठबळ मिळेल.

**तुमची प्रगती तपासा 4**

1) प्राथमिक शाळेतील वर्गाच्या सौंदर्याचे दर्शक काय आहेत?

(अ) रंगीत भिंती (ब) रंगीत तक्त

(क) आनंदी व व्यस्त बालके (ड) इतर आकर्षक साहित्य

2) चांगल्या शैक्षणिक साहित्याचे गुण कोणते असावे?

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

Notes

3) अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत विद्यार्थ्यांनी भूमिका आवश्यक का आहे?

-------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

4) शैक्षणिक साहित्याची खोली कशी दिसावी?

-------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

## 9.8 एकाच साहित्याबरोबर आपण काय करू शकतो?

अध्ययनासाठी खूप साऱ्या साहित्याची गरज नसते. प्रत्येक कामासाठी नव्या प्रकारच्या साहित्याची गरज असते असे नाही. जर उद्दिष्टे स्पष्ट असतील व आपण काळजीपूर्वक विचार करत असू तर एकाच प्रकारच्या साहित्याचे आपल्याला अनेक प्रकारे उपयोग होतील. हा उपयोग केवळ एका विषयासाठी नसेल तर अनेक विषयांसाठी तेच साहित्य चालेल. उदाहरणार्थ आपण घनाकृती फासा दिला तर मुलांना त्याच्याशी कायकाय करणे अपेक्षित आहे. आपण घनावर ठिपके रंगवून आणि तो फासा म्हणून वापरू शकू. मुलांना गोट्या गोळा करायला सांगू आनखी एक खेळ खेळू, ज्यात फाशावरील ठिपक्याइतक्या गोट्या उचलायच्या असतात. आता खेळ बदलू व तो फासा तोन-तीन वेळा वा अनेक वेळा फक्त होणारी एकूण संख्या शोधायला सांगता येईल. जर हा खेळ गटात खेळला तर कोणत्या मुलाला जास्त गोट्या मिळतात ते पहाता येईल. तसेच कोणत्या मुलाला कमीत कमी गोट्या मिळतात ते पाहू. अशा प्रकारच्या आणखी खेळांचा विचारही करता येईल. फासा फेकून येणाऱ्या संख्येची नोंद करू किती वेळा एखादी संख्या येते ते पाहू; त्यामागे काही क्रम आहे का हेही पहाता येईल.

आपण घन कागदावर ठेऊन पाहू. कागद झाकण्यासाठी किती घन लावतात ते पाहू, त्यावर कागदाच्या क्षेत्रफळाची कल्पना येईल. या घनांबरोबर मुले काहीही करू शकतील. मुले घन वापरून अनेक आकार बनवू शकतील. बनलेला आकार कसा दिसतो याचे वर्णनही करू शकतील. जर तुमच्याकडे अक्षरकार्डे, शब्द कार्डे वा चित्र कार्डे असतील तर त्यातील कोणतीही कार्डे अध्ययनाच्या अनेक रंजक कृती करण्यासाठी वापरता येतील.

## 9.9 भाषाध्यापनासाठी कार्डांचा उपयोग

भाषाध्यापनाच्या संदर्भात कार्ड वापरण्याचा एक हेतू म्हणजे बालकाला असांकेतिकीकरण (decode) शिकविण्यास मदत करणे. चित्र कार्डे व शब्द कार्डे यांच्या जोड्या जुळविण्यास देता येतील. एक शब्दकार्ड देऊन तसेच दुसरे कार्ड शोधायला सांगता येईल. अनेक शब्दकार्डे एकत्र करून गोष्ट तयार करता येईल. त्याचप्रमाणे चित्रे व चित्रकार्डे यांचा उपयोग करून संभाषण, चर्चा, कल्पना विस्तार, गोष्टी, वर्णन इत्यादी सादर करता येईल. सुरुवातीला हे तोंडी असेल नंतर ते लिहीता येईल. कोणत्याही वर्गासाठी या कार्डांचा उपयोग कृतींमधून, विविध पातळ्यांवरील विविध उद्दिष्टांसाठी करता येईल. उदाहरणार्थ : वर्ग पहिला व वर्ग तिसरा यासाठी शब्दकार्डाच्या उपयोगाचा विचार करू.

एकच साहित्य अनेक कामांसाठी वापरता येते व उद्दिष्टांनुसार व अध्ययन-अध्यापनातील आकलनानुसार त्यांचा उपयोग ठरतो हे स्पष्ट आहे. जेव्हा व्यक्तिला हे समजते की बालकाला काय

शिकायचे आहे, त्यातल्या पायऱ्या व कृती कोणत्या आहेत, तेव्हाच अध्ययन–अध्यापन साहित्याचा वापर उपयुक्त होईल. अर्थातच या कृतींमध्ये गुंतून रहाण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये हवह. एकदा हे घडले की परिसरातून साहित्य शोधणे अजिबात अवघड नाही.

Notes

**तुमची प्रगती तपासा 5**

1) भाषाध्यापनासाठी कार्ड वापरण्याचा हेतू:
   (अ) वाचन शिकताना असांकेतिकीकरण करण्यास मदत करणे.
   (ब) चित्रे पहाणे
   (क) चित्रे तयार करणे.
   (ड) अक्षरे लिहिणे
2) वर्गात चेंडूचा उपयोग कोणकोणत्या विविध मार्गांनी करता येईल?
   ------------------------------------------------------------
   ------------------------------------------------------------
   ------------------------------------------------------------
3) भाषाध्यापनात 'शब्दकोडे' व 'चित्र कार्डे' कशी वापरता येईल?
   ------------------------------------------------------------
   ------------------------------------------------------------
   ------------------------------------------------------------

## 9.10 भाषाध्यापनात अध्ययनासाठी वापरायाच्या साहित्याची जाण.

भाषाध्यापनात अध्ययनासाठी वापरावयाच्या साहित्याची जाण भाषेच्या अध्ययन – अध्यापनातला दृष्टीकोनातील फरकांमुळे साहित्य व त्याच्या उपयोगाच्या पद्धतीत महत्त्वाचे बदल होतात. जर एखादी कविता किंवा गद्य विद्यार्थ्यांना केवळ स्पष्ट करणे हाच उद्देश असेल तर अध्यापनाची क्रिया व साहित्य एकाच प्रकारचे असेल. याउलट असे उद्दिष्ट असेल की विद्यार्थ्यांला स्वतंत्र विचार करणारी संवेदनशील, हुशार व्यक्ती व साहित्याभ्यासात रूची घेणारी असेल, बनवायची आहे. तर या अपेक्षा वेगळ्या आहेत. जर विद्यार्थ्यांने स्वतःच्या भाषेत विचार व कल्पना व्यक्त करणे. अपेक्षित असेल तर साहित्याचा प्रकार व वापरावयाची पद्धत वेगळी असेल.

आपल्याला ही गोष्ट स्पष्टपणे माहिती हवी की बालकाला फक्त पुस्तकातील कविता, योग्य उच्चारण व आवाजातील चढ उतारांसह पाठ करायला हवी आहे का ती पाठ करून तालासुरात म्हणणे व नव्या कविता पाठ करून म्हणणे अपेक्षित आहे.

बालकाला पाठ केलेले निबंध लिहायला लावायचे का त्याने त्याचे अनुभव का कल्पना लिहिणे अपेक्षित आहे? बालक आत्मविश्वासाने नव्या संदर्भात भाषेचा वापर करीत आहे हेही पहायचे आहे. जर बालकाला स्वतंत्र, प्रभावीपणे भाषेचा वापर करणारा बनवायचे असेल, तर वर्गातून बालकाला त्याचे तिचे विचार व्यक्त करायला व कल्पनांचे जाळे विणायला संधी मिळाली पाहिजे.

यांसाठी नवी वाटणारी, आकर्षक, उत्साहवर्धक कल्पनेच्या जगात नेणारी चित्रे हवी. कथा निर्माण करण्यासाठी बालकांना एकत्र काम करायच्या संधीची गरज असते. अशा क्रियांची रचना केली पाहिजे की ज्यात स्वातंत्र्य आहे व कल्पना आहेत. असे काही साहित्य असू शकते की जे उत्प्रेरक (Catalyst) म्हणून काम केले. बालकांना विचार करण्यात चर्चा करण्यात व नवनव्या कल्पनांकडे विचार वळविण्यासाठी चर्चा करण्यात व नवनव्या कल्पनांकडे विचार वळविण्यासाठी त्यांचा उपयोग होईल.

कथन करणे व मोठ्याने वाचन करणे या अध्यापन क्रिया बालकाला ज्ञानाच्या मर्यादीत क्षेत्रात ठेवतात व मनाचा विकास होणे थांबवितात. नव्या कल्पना आत्मसात करायची त्याची क्षमता मर्यादित करतात. भाषेच्या मुक्त वापराकरता शैक्षणिक प्रक्रिया व साहित्य असे हवे की जे विद्यार्थ्याला स्वतंत्रपणे विचार करू देईल व कल्पनांची निर्मिती करू देईल. त्याची वर काही उदाहरणे दिली आहोत, पण आपण इतर अनेक गोष्टीही करू शकतो. एखादे प्रसंगचित्र वा कोलाज किंवा चित्रांचा क्रमवार संच विद्यार्थ्यांना गोष्टी बनवायला संधी देण्यासाठी आपण वापरू शकतो. यात बालक केवळ चित्रे समजून घेत नाही तर मर्यादेबाहेर जाऊन त्यावर विचार व्यक्त करू शकतात. स्वत:च्या भाषेत अभिव्यक्ती करू शकतात.

**तुमची प्रगती तपासा 6**

1) बालकांनी भाषेचा वापर नव्या संदर्भात आत्मविश्वासाने करण्यासाठी आपण काय करू शकतो?
   (अ) त्यांच्या कल्पना मुक्तपणे व्यक्त करण्यासाठी बालकांना संधी द्या.
   (ब) बालकांला प्रश्नांची पाठ केलेली उत्तरे देण्यात सांगा.
   (क) चित्रात दिलेली कविता पाठ करावयास सांगा.
   (ड) बालकाला विशिष्ट प्रकारचे गद्य व कविता यांचे स्पष्टीकरण द्या.
2) वर्गात भाषाध्यापनासाठी सहज उपलब्ध होणारे साहित्य कोणते? हे साहित्य वापरून मुले काय काय करू शकतील?
3) बालकामधे भाषा विकास होण्यासाठी कथन करायची व कथा तयार करण्याची संधी देणे याची कशाप्रमाणे मदत होईल?

## 9.11 भाषेच्या वर्गात कोणते साहित्य वापरावे?

भाषेच्या वर्गात साहित्य वापरण्याचा हेतू हा फक्त बालकाला विविध भाषेतील धड्यांची ओळख करून देणे हा असत नाही तर त्यांच्या भाषिक क्षमता वाढवणे हा हेतू असतो. याचा अर्थ असा की आपल्याला अशी संसाधने पुरवावी लागतील की जी त्याला भाषिक क्षमता व समज यात वाढ करतो. हे साहित्य लिखित किंवा तोंडी असू शकते. या व्यतिरिक्त आपल्याला शिक्षक व बालक यांनी ज्यावर लिहावे अशा साहित्याचीही गरज आहे. लिखाण हा भाषा अध्यापनातील एक महत्त्वाचा भाग आहे. लहान बालकांना वर्गात असे साहित्य हवे असते जे नवे शब्द वापरण्यास किंवा संभाषणात भाग घेण्यास भदत करते. भाषेच्या विविध प्रकारे केलेल्या उपयोगाचे श्रवण हा बालकांसाठी महत्त्वाचा भाग असतो व आवाजातील चढ उतार व विराम समजण्याची क्षमता त्यांना प्राप्त होणे आवश्यक असते. हा त्यांच्या भाषिक क्षमतेचा भाग आहे. जर आपण आवश्यक साहित्याची यादी बनवायचा प्रयत्न केला तर आपल्याला ते दोन भागात विभागता येईल. एक म्हणजे लेखी व दुसरा म्हणजे तोंडी. लेखी साहित्यात पाठ्यपुस्तके व कार्यपुस्तिका हा महत्त्वाचा घटक आहे. बरोबरच आपण तक्ते, भित्तीपत्रके, कविता, गाणी किंवा तक्ते वापरू शकतो. शब्द, अक्षरे,

Notes

शब्द चित्रे किंवा कार्डे, ग्रंथालय (नियतकालिके, पुस्तके, वर्तमानपत्रके पाक्षिके इ.) असे साहित्यही उपयुक्त ठरते.

तोंडी साहित्य म्हणजे रेडीओ, टेपरेकॉर्डर, सी. डी, फिल्म यांद्वारे मुलांपर्यंत पोहचणारे साहित्य. हे बालकाला केवळ कविता किंवा नाटके ऐकण्याची संधी देते असे नाही. तर शारीरिक हालचाल कशी करावी, आवाजातील चढउतार कसे असावे व तालासुराचे ज्ञान देण्यात मदत करणे, श्रवण क्षमता आकलनांसह वाढविण्यास मदत करते. उच्चारण तसेच अभिव्यक्तीची विविध रुपे जाणून घेऊन त्यांना दाद देण्याची संधी देते. हे सरळ आहे की तोंडी साहित्य, (सॉफ्टवेअर) मग टेप असो की सीडी, ते चांगल्या दर्जाचेच हवे. केवळ चांगले उपकरण (हार्डवेअर) असून चालणार नाही.

संगणक व इंटरनेट बालकांना उपलब्ध झाले तर ते अनेक मार्गांनी मदत करते. ते व्यक्तिगत अभिव्यक्तीतच मदत करते असे नाही तर विविध चित्रे व दृश्ये यांची मदत घेण्यासही सक्षम करते. वर्गात फिल्म प्रक्षेपित करण्यासाठी त्याचा वापर करता येईल. दृकश्राव्य साहित्याला भाषा विकासात प्रचंड महत्त्व आहे. प्रत्येक शिक्षक कविता तोंडपाठ म्हणून दाखवू शकत नाही. तसेच प्रगावीपणे गाऊ शकत नाही म्हणून चांगल्या कविता व गाणी, गोष्टी ऐकण्यासाठी उपलब्ध केले पाहीजेत. हे सर्व इंटरनेट व संगणकाच्या सहाय्याने करता येईल. चांगला व योग्य कार्यक्रम कसा निवडावा व त्याचा योग्य वापर कसा करावा हे शिक्षकाला माहिती असेल हे शक्य होईल.

इतर संकल्पनांच्या विकासात सुद्धा भाषेच्या वर्गाची मदत होते. आधी म्हटल्याप्रमाणे वस्तुंची गटात विभागणी करणे, त्यांच्या गुणधर्मांचा अभ्यास करणे, सूचना वाचून प्रयोग वा कृती करणे, निरीक्षणांचे विश्लेषण करणे, सामन्यीकरण करणे, निरीक्षणावर आधारित तार्कीक विधाने करणे हे सर्व भाषाध्यापनाचे भाग आहेत. यासाठी लागणाऱ्या साहित्याची चर्चा पूर्वीच केली आहे. शास्त्राचे गणिताचे व समाजशास्त्राचे पुस्तक हे सुद्धा भाषेच्या विकासासाठीचे साधन आहे हे समजणे महत्त्वाचे आहे. प्रकल्प, उपक्रम, बालकाना दिलेल्या सूचना सुद्धा भाषेच्या अध्ययनासाठी मदत करणारी सुयोग्य साधने आहेत.

**तुमची प्रगती तपासा 7**

1) यातील कोणते साहित्य तोंडी साहित्याचा भाग नाही?

   (अ) रेडीओ (ब) पाठ्यपुस्तके (क) सी डी प्लेअर (ड) फिल्म प्रक्षेपक

2) तोंडी अध्यापन साहित्य म्हणून कोणते साहित्य वापराल? का?

   ------------------------------------------------------------
   ------------------------------------------------------------
   ------------------------------------------------------------

3) भाषाध्यापनात ग्रंथालयाचा कसा उपयोग होतो?

   ------------------------------------------------------------
   ------------------------------------------------------------
   ------------------------------------------------------------

4) भाषाध्यापनासाठी चांगल्या साहित्याचा विचार करताना काय लक्षात ठेवले पाहिजे?

   ------------------------------------------------------------
   ------------------------------------------------------------
   ------------------------------------------------------------

Notes

## 9.12 साहित्याची सुलभ उपलब्धी

निसर्गत: खूप सारे साहित्य आपल्याभोवती उपलब्ध असते. काही साहित्य जे सहज उपलब्ध नसते ते मिळवावे लागते. काही खरेदी करावे लागते. निवडलेले साहित्य महाग नसणे व जवळपासच्या बाजारात उपलब्ध असणे गरजेचे आहे. काही साहित्य खूप मोठ्या संख्येने विकत घेऊन, मग त्याचे वाटप करण्यात येते. जर शिक्षकाला साहित्य विकत घ्यायचेच असेल तर ते सहज उपलब्ध असावे व त्यासाठी आर्थिक संसाधनांची सोय असावी. यासाठी एक सुव्यवस्थित पद्धत असावी.

मागील दोन दशकांमध्ये शाळेत साहित्य उपलब्ध असण्याबाबत प्रयत्न केले गेले. खूप प्रयत्नानंतर आता शालेय व्यवस्थेमधे, प्रत्येक प्राथमिक शिक्षकाकडे साहित्य विकत घेण्यासाठी पैशाची तरतूद आहे. शिक्षकाने स्वत:च्या पसंतीप्रमाणे साहित्य विकत घेऊन ते वापरावे हे तत्व यामागे आहे. हिशेबाचे नियम सोपे आहेत, त्यामुळे साहित्याचा अधिक वापर होणे शक्य आहे. काही ठिकाणी शाळांना व शिक्षकांनी या पैशाचा चांगल्याप्रकारे उपयोग करावा यासाठी दबाव असतो. अर्थातच जरी शिक्षकाला हे साहित्य घेणे शक्य असले तरी वर्गात त्याचा योग्य वापर होईल याची खात्री देता येत नाही. साहित्याच्या योग्य वापराची खात्री करण्यासाठी प्रभावी प्रयत्नांची गरज आहे.

सामान्यत: शाळा व शिक्षक हे साहित्य प्रदर्शनासाठी किंवा दर्शनीय साहित्य बनविण्यासाठी कच्चा माल विकत घेतात. शिक्षक व मुख्याध्यापक हे साहित्य शाळेत ठेवण्यासाठी तयार नसतात. शिक्षकांना ज्यांना उपयुक्त साहित्य घ्यावयाचे आहे त्यांना पुरेसे आर्थिक स्त्रोत असत नाहीत. जेथे विविध व उपयुक्त साहित्य निवडून घ्यायला व खरेदी करायला मिळेल अशी ठिकाणे नाहीत. शाळेजवळील बाजारात, चांगल्या कॅसेट किंवा तक्ते जे विद्यार्थ्यांना भाषेसाठी व त्यांचा सहभाग वाढविण्यासाठी उपयुक्त आहेत, ते उपलब्ध नाहीत.

सध्या प्रत्येक राज्य शिक्षण विभाग, जिल्ह्यातील काही शाळा निवडून त्यात एक आकर्षक साहित्याची खोली मुलांसाठी बनविण्याचा विचार करत आहे. या कल्पनेच्या उपयुक्ततेचा विचार करण्यासाठी अनेक गोष्टी लक्षात घ्यावा लागतील. आपल्याला या खोलीचा हेतू व उपयुक्तता यावर विचार करावा लागतो. सद्य:स्थिती लक्षात घेऊन शिक्षणासाठी अशा खोल्या तयार करण्यावर विचार करावा लागेल. जर अशी खोली खूप शाळांमधे उपलब्ध करायची असेल तर प्रत्येक खोलीला किती खर्च येईल याचा अंदाज घ्यावा लागेल. प्रत्येक मुलामागे यासाठी किती खर्च होईल व उपयुक्ततेच्या प्रमाणात तो खर्च असेल का हे पहावे लागेल. या खोल्या प्रदर्शनासाठी असतील का आणि मुलांना साहित्याचा वापर करण्याची परवानगी असेल का याचा विचार करावा लागेल. जर विद्यार्थ्यांना वापर न करता येण्याजोगी परिस्थिती असेल तर मोठ्या प्रमाणावर खर्च करता येणार नाही. जर प्रत्येक मुलामागील खर्च जास्त असेल तर याप्रकारचे साहित्य कोणताही हेतू पूर्ण करणार नाही.

**तुमची प्रगती तपासा 8**

1) साहित्य निवडतानाचे तत्व म्हणून खालीलपैकी कोणते बरोबर नाही.

   (अ) साहित्य फार महान असावे  (ब) जवळील बाजारात ते उपलब्ध असावे.

   (क) साहित्य फार महाग नसावे.  (ड) साहित्य विकत घेऊन ते शाळेला देण्यात यावे.

2) साहित्य उपलब्ध नसणे ही समस्या कशी सोडवाल?

3) वर्गात भाषाध्यापनासाठी निवडलेल्या साहित्याचा योग्य वापर करण्यासाठी काय पूर्वतयारी कराल?
---------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------

4) वर्गासाठी साहित्य निवडतांना काय लक्षात ठेवाल?
---------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------

## 9.13 साहित्याचा वापर कसा करावा.

या घटकात, साहित्य व त्याचा अध्यापनात उपयोग तत्वांचा पुनरुच्चार करणे उपयुक्त होईल. वर्गात शिक्षकांना साहित्याचा योग्य वापर करण्यासाठी ही तत्वे उपयुक्त ठरतील.

1. साहित्य सहज उपलब्ध असावे. जरी हे साहित्य शिक्षकालाच वापरायचे आहे तरी त्याची पूर्वतयारी करावीच लागेल. बाकासाठी हे अस्वस्थ करणारे असते की शिक्षक योग्य साहित्य शोधेपर्यंत त्यांना थांबावे लागते. यामुळे अध्ययनात सातत्य व अभिरूची यात खंड पडतो
2. हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की, साहित्याचा वापर केवळ प्रदर्शनासाठी नको तर अध्ययनात झाला पाहिजे. साहित्य अध्यापन करत नाही, शिक्षकांना हे माहिती पाहिजे की कोणते साहित्य कोणत्या परिस्थितीत उपयुक्त आहे. पाठ अर्थपूर्ण करण्यासाठी अध्ययन – अध्यापन साहित्य हे साधन आहे. बालकाची अभिरूची व क्षमता लक्षात घेऊन अध्यापन साहित्याच्या निवडीचे काम शिक्षकानेच करायचे आहे.
3. जर खूप साहित्य वापरायचे असेल तर ते एकावेळी एक असेच वापरावे, जेव्हा दोन साहित्यातील संबंध दाखवायचा असेल तेव्हाच ती एकत्रितपणे दाखवावीत.
4. विद्यार्थ्यांना जलदपणे वाटता येण्यासाठी साहित्य योग्य प्रकारे साठविले गेले पाहिजे, महत्त्वाची गोष्ट म्हणजे जर मुलांना साहित्य वाटून नंतर ते परत गोळा करावयाचे असेल तर मुलांचा सहभाग घेतला पाहिजे. त्यांना जबाबदारीची जाणीव होऊन त्यांनी मदत केली पाहिजे. या सहभागामुळे साहित्य वाटणे व गोळा करणे यासाठी खूप जास्त वेळ लागणार नाही.
5. वापरतांना साहित्याची मोडतोड होणे शक्य आहे, हे मान्य करावे लागेल. मोडके साहित्य टाकून देऊन नवे साहित्य वापरण्याची पद्धत असली पाहिजे. जेव्हा बालक पुस्तके वाचतात, तक्ते हाताळतात, खडू किंवा रंगाचा उपयोग करतात. तेव्हा हे साहित्य फाटू, तूटू शकते किंवा वापरून संपते. या सगळ्याला परवानगी व मान्यता न देणारी पद्धत, साहित्याच्या वापराचा मारक ठरते.

**तुमची प्रगती तपासा 9**

1) बालक साहित्याचा वापर करताना यातील काय शक्य नाही?
   (अ) साहित्याची मोडतोड होणे.
   (ब) साहित्य संपणे.
   (क) साहित्याचा घसारा
   (ड) जसे आहे तसेच रहाणे.

Notes

2) शैक्षणिक साहित्याचा वापर करताना कोणते तत्व वापरावे?

3) वर्गात साहित्य योग्यप्रकारे ठेवणे महत्त्वाचे का आहे?

## 9.14 साहित्य निवडीचा पाया

कोणते साहित्य त्याने / तिने मिळवावे लागेल, कोणते विकत घ्यावे लागेल व कशावर महत्त्व द्यावे लागेल. याबद्दल प्रत्येक शिक्षकाला विचार करावा लागेल. योग्य साहित्य निवण्यासाठीची तत्वे खालील प्रमाणे :

1. पहिले तत्व म्हणजे शैक्षणिक साहित्य असे हवे की त्याने शैक्षणिक उद्दिष्टे पूर्ण केली पाहिजेत. त्यांच्यामुळे आपल्याला करावयाच्या कामाची शक्यता वाढली पाहिजेत. त्यांच्यामुळे आपल्याला करावयाच्या कामाची शक्यता वाढली पाहिजेत. त्यांच्यामुळे आपल्याला करावयाच्या कामाची शक्यता वाढली पाहिजे, बालकांना संधी पुरविल्या पाहिजेत. उदाहरणार्थ बालकातील स्व अभिव्यक्तीचा विकास व्यवस्थितपणे घडवून आणण्यासाठी आपल्याला तशी संधी देणारी चित्रे निवडावी लागतील.
2. दुसरे तत्व : साहित्य अनेक हेतूंसाठी वापरता आले पाहिजे. आपण असे साहित्य मिळविले पाहिजे की ते लवचिकपणे वापरता येईल व शिक्षकांची त्याप्रमाणे तयारी करून घेता येईल.
3. तिसरे तत्व म्हणजे साहित्य, सहजपणे कोणतेही जादा प्रयत्न करायला न लागता उपलब्ध असले पाहिजे. ते पुरेशा संख्येने असले पाहिजे व फारसे महान नको. बालकांना त्याचा वापर करता आला पाहिजे. थर्माकोलच्या प्रतिकृति मोडू शकतात व स्पर्श केल्यास तुटू शकतात. साहित्य बालकाला वापरण्यासाठी आहे हे लक्षात ठेवले पाहिजे.
4. चौथे तत्व : मुले वापरणार आहेत म्हणून काही खास काळजी घ्यावी लागेल असे नको. ती संरक्षणदृष्ट्या हानीकारक नकोत.
5. पाचवे तत्व : शिक्षक व बालक दोघांनी निर्मिती प्रक्रियेत सहभागी होणे आवश्यक आहे. आधीच ठरविलेले व निवडलेले साहित्य शाळेत, शिक्षकाला पाठविणे योग्य नाही. शिक्षक व बालक दोघांचाही सहभाग असणे आवश्यक आहे.
6. त्यांना वर्गात साहित्य वापरायच्या विविध मार्गांबद्दल विचार करण्याची व ते आत्मसात करण्याची संधी मिळाली पाहिजे. साहित्य निवडणे व बनविणे प्रक्रियेतील शिक्षकाच्या सहभागाबद्द आपल्याला सर्वांना माहिती आहे. साहित्य निवडण्यात ते मिळविण्यात व इतर बाबतीत शिक्षक व बालक त्यांना काहीच करावयाचे नसते.

साहित्य बालकाबरोबर वापरतांना शिक्षकाला मिळणारा अनुभव, नवे साहित्य बनविताना उपयोगी पडतो. शिक्षकांवर विश्वास ठेवता येत नाही, व दुसऱ्या कोणीतरी साहित्याची निवड केली पाहिजे हा सर्वसामान्य दृष्टीकोन आहे. सध्याही अशाच पद्धत की साहित्य दुसऱ्या कोणीतरी ठरवून शिक्षकाला उपलब्ध करून दिले जाते. अशा केंद्रिभूत पद्धतीचा फारसा चांगला अनुभव नाही या

वस्तुस्थितीनंतरही हा दृष्टीकोन बदलत नाही. अजूनही असेच मानले जाते की शिक्षकाला स्वत:चे साहित्य निवडण्याची व मिळविण्याची संधी मिळणे योग्य नाही.

**तुमची प्रगती तपासा 10**

1) वर साहित्य निवडण्यांच्या किती तत्वांची चर्चा केली आहे?

   (अ) 2 (ब) 4 (क) 5 (ड) 8

   तुमच्या मते त्यातील सर्वात महत्त्वाचे कोणते? का?

2) शिक्षकाचा साहित्य निवडण्यात, वा बनविण्यात वा वापरण्यात सहभाग असणे आवश्यक का आहे?

3) साहित्य निवडीतील दोन महत्त्वाची तत्वे लिहा.

## 9.15 समारोप

बालकांना अध्ययनासाठी काही साहित्य शाळेत हवे हे आवश्यक आहे. त्यात चट्या, बाक, स्वच्छतागृहे, पिण्याचे शुद्ध पाणी इत्यादींचा समावेश होतो. त्यांना आपण आवश्यक मुलभूत साहित्य म्हणतो. त्या व्यतिरिक्त इतर साहित्यास आपण शैक्षणिक साधने म्हणतो. त्यात तक्ते, प्रतिकृती भाषाकार्डे इत्यादीचा समावेश होतो. शिक्षकाला शिकविण्यासाठी व बालकाला शिकण्यासाठी, या शैक्षणिक साहित्यरूपी साधनाची मदत होते. यामुळेच या साहित्याला अध्ययन अध्यापन साहित्य असे म्हणतात. शैक्षणिक साधने वापरण्याच्या नव्या दृष्टीकोनानुसार साहित्य बालकापर्यंत पोचले पाहिजे. याचा अर्थ असा की मुले त्यांना स्पर्श करू शकतील, हाताळू शकतील, त्यांचे परिक्षण करू शकतील आणि त्यांच्या आधरे कृतीही करू शकतील. साहित्याची मोडतोड होण्याबद्दल कोणतीही भिती नको. चांगले शैक्षणिक साधन अनुभवांना मूर्तता देते. व बालकाला शिकायला मदत करते. प्रत्येक कृतीसाठी व कार्यासाठी शैक्षणिक साहित्य असणे आवश्यक आहे. जर आपण काळजीपूर्वक विचार केला तर एकाच प्रकारचे साहित्य अनेक कामांसाठी वापरता येते.

भाषाध्यापनात शैक्षणिक साहित्याचा वापर केवळ विविध भाषांचा परिचय करून देणे यासाठी करत नाहीत तर त्या भाषा वापरण्याची क्षमता वाढविणे यासाठी होतो. याशिवाय आपण हे शिकलो की शिक्षक व बालक दोघांचाही सहभाग साहित्य निवडणे व बनविणे किंवा वापरणे यामध्ये असला पाहिजे.

## 9.16 सुचविलेले वाचन व संदर्भ

Dewan, H. K. 2008. TLM Vs. Teaching Aids. Buniyadi Shiksha 18:7-11. (Published by Vidya Bhawan Society and Azim Premji University)

http://jtmadhavan.wordpress.com/2010/07/08 teaching-learning-materials-english/

http://www.teachercreated.com/books/language-arts.

Notes

## 9.17 स्वाध्वाय

1) मुलभूत आवश्यक साहित्यव शैक्षणिक साहित्य यात काय फरक आहे? उदाहरणांसह स्पष्टकरा.
2) शैक्षणिक साहित्याबद्दल नवा दृष्टिकोन कोणता?
3) चांगल्या शैक्षणिक साहित्याची मुलभूत वैशिष्ट्ये कोणती? उदाहरणे द्या.
4) साहित्य निवडण्याचे आधार कोणते?
5) साहित्य वापराची तत्वे कोणती?
6) शिक्षणप्रणालीमधे साहित्याच्या मोडतोडीसाठी काही तरतूद असली पाहिजे. या विधानाचा अर्थ काय आहे?

# घटक 10 : मूल्यमापन

Notes

**संरचना :**

10.0 प्रस्तावना

10.1 अध्ययन उद्दिष्टे

10.2 मूल्यमापनाचे सध्याचे मार्ग

10.3 मूल्यमापन कशासाठी ?

10.4 भाषा मूल्यमापनातील काही मुद्दे

10.4.1 श्रवण व संभाषण

10.4.2 लेखन

10.4.3 अभिव्यक्ती

10.5 भाषेतील मूल्यमापनाच्या पद्धती

10.5.1 तोंडी परीक्षा

10.5.2 निरीक्षण

10.5.3 लेखी परीक्षा

10.6 गद्य, पद्य व नाट्य मूल्यमापनासाठी काही उपक्रम

10.6.1 काव्य

10.6.2 गद्य

10.6.3 नाटक

10.7 समारोप

10.8 सुचविलेली पुस्तके व संदर्भ ग्रंथ

10.9 घटकाच्या शेवटीच्या अभ्यास

## 10.0 प्रस्तावना

या घटकात आपण भाषेच्या वर्गात मूल्यमापन कसे केले जाते हे समजून घेणार आहोत. मूल्यमापन म्हणजे काय व त्यात कशा कशाचा समावेश होतो? भाषा अध्ययनाच्या मूल्यमापनाच्या संदर्भात असे कोणते मुद्दे आहेत ज्यावर अधिक भर दिला पाहिजे? आपण सध्याची मूल्यमापन प्रक्रिया ही पाहणार आहोत व ती उद्दिष्टांची पूर्तता करते कां याचेही परीक्षण करणार आहोत. आपण मूल्यमापनाच्या काही पर्यायी मार्गांचा विचार करु या ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अध्ययनाबद्दल नावड निर्माण होणार नाही. मूल्यमापन प्रक्रियेने विद्यार्थ्यांमध्ये विविध क्षमता व आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी प्रेरित केली पाहिजे. मूल्यमापन हे विद्यार्थी व शिक्षक दोघांनाही मदत करते. आपण अशा काही कृती व प्रश्न पहाणार आहोत. ज्यांच्यामध्ये विधायक मूल्यमापन करण्याची क्षमता आहे.

## 10.1 अध्ययन उद्दिष्टे

हा घटक वाचल्यानंतर तुम्ही या गोष्टीसाठी सक्षम व्हाल.

- सद्यस्थितीतील मूल्यमापन प्रक्रियेचे फलित समजून घेणे.

- मूल्यमापनाची गरज समजणे.
- भाषिक क्षमतांचे मूल्यमापन करण्याच्या विभिन्न मार्गाचे विश्लेषण.

## 10.2 सद्यस्थितीतील मूल्यमापन प्रक्रिया

आपल्याला मूल्यमापन प्रक्रिया ही उद्दिष्टांची पूर्तता करण्याच्या दृष्टिने सक्षम आहे का हे विचारण्याची गरज आहे ज्याचे मूल्यमापन होणे गरजेचे आहे त्याचेच मूल्यमापन करण्याचे मार्गदर्शन ही प्रक्रिया करते कां? सध्याची ही मूल्यमापन प्रक्रिया जाणून घेण्यासाठी आपण भाषा वर्गाचे विश्लेषण करूया.

**उदाहरणार्थ 1**

इ. 3 रीच्या प्राथमिक शाळेतील भाषा शिक्षकांनी एक परीक्षा घेतली. त्या परीक्षेत विद्यार्थ्यांना पुस्तकातील गोष्ट सांगण्यास सांगितले. वर्गात तीस विद्यार्थी होते. मयंक खेरीज प्रत्येक विद्यार्थी ती गोष्ट सांगू शकला. अनेक विद्यार्थ्यांना दहा पैकी सहा गुण मिळाले. प्रकृतीला सर्वात जास्त म्हणजे आठ गुण मिळाले व मयंकला दोन गुण मिळाले. जेव्हा शिक्षकांनी वर्गात मयंकचे गुण सांगितले तेव्हा मुले मयंककडे पाहून हसू लागली व त्याला चिडवू लागली. मयंकला हे समजत नव्हते कि त्याला इतके कमी गुण का मिळाले. त्याने इतरांसारखीच गोष्ट सांगितली होती तो अत्यंत दु:खी होऊन खाली बसला. नंतर त्याने शिक्षकांना विचारले की बाकी सर्व विद्यार्थ्यांपेक्षा त्याला कमी गुण का मिळाले. शिक्षक म्हणाले, "मी तुला पुस्तकातील गोष्ट सांगण्यास सांगितले होते तुझ्या मनात येईल ती नाही." त्यानंतर मयंकला दुसरे दिवशी शाळेत यावेसे ही वाटत नव्हते आणि तो वर्गातील कोणत्याच कृतीमध्ये सहभागी होत नव्हता. त्याच्या पालकांना त्याला शाळेत पाठविण्यामध्ये खूपच अडचणी येत होत्या.

**उदाहरणार्थ 2**

असेच इ. 3 रीतील भाषेच्या वर्गाचे उदाहरण आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुस्तकातील गायीवरील पाच वाक्ये बघून लिहायला सांगितली ती वाक्ये अशी होती.

1) गाय आपली माता आहे.
2) गाईला चार पाय असतात.
3) गाय गवत खाते.
4) गाय दूध देते.
5) गाईचे शेण गोवऱ्या करण्यासाठी वापरले जाते.

शिक्षिकेने विद्यार्थ्यांना ही पाच वाक्ये पाठ करून परीक्षेत लिहिण्यास सांगितली. ती म्हणाली की प्रत्येक वाक्यास एक गुण आहे आणि जो कोणी सर्व वाक्ये अचूक लिहिल त्याला पूर्ण गुण मिळतील.

शिक्षिकेने सांगितल्याप्रमाणे सर्व वर्ग वाक्ये पाठ करू लागला. या परीक्षेत बऱ्याच विद्यार्थ्यांनी ही वाक्ये शिक्षिकेने दिली होती त्याच प्रमाणे लिहिली. नीलमनेही पाच वाक्ये लिहिली पण ती शिक्षिकेने सांगितलेल्या वाक्यांपेक्षा वेगळी होती. ती वाक्ये अशी होती.

1) गाय आपली माता आहे.
2) गाईला चार पाय असतात.
3) आमच्या घरी खूप गायी आहेत.
4) गाईच्या दुधातून आम्हाला पैसे मिळतात.
5) जीतूच्या गायीला वासरु आहे.

सर्व विद्यार्थ्यांना 5 पैकी 5 गुण मिळाले पण नीलमने इतरांएवढीच पाच वाक्ये लिहिली असतानाही तिला दोनच गुण मिळाले. तिने लिहिलेल्या वाक्यात काहीही चूक नव्हती तरी सुद्धा तिला कमी गुण मिळाले.

ही फक्त दोन उदाहरणे आहेत पण आपल्या देशातील मूल्यमापनाबाबतचे नियम दाखविणारी आहेत. अशा प्रकारच्या मूल्यमापनामुळे विद्यार्थ्यांवर ताण वाढतो, तसेच असुरक्षितता आणि अपमान झाल्याची भावना वाढीस लागते. पाठ्यपुस्तक पाठांतराने लक्षात ठेऊन व मौखिक उत्तरे देऊन खरे तर भाषेच्या क्षमतांचे मूल्यमापन होऊ शकत नाही. मूल्यमापनामध्ये मुलांच्या कल्पनाशक्ती व सृजनशीलतेलाही स्थान मिळाले पाहिजे.

आजच्या मूल्यमापनात जे काही घडत आहे ते म्हणजे एक औपचारिक बंधनात मूल्यमापन बांधले गेले आहे.

तोंडी परीक्षा एक दिवस सांगितल्या जातात तर दुसऱ्या दिवशी स्वतंत्रपणे लेखी परीक्षा घेतल्या जातात. अशा प्रकारच्या मूल्यमापनामुळे मुलांच्या मनात भिती आणि अपमानाची भावना निर्माण होते. अध्यापन– अध्ययन प्रक्रियेपेक्षा हे पूर्णपणे वेगळेच घडत आहे. प्रश्नपत्रिकांची निर्मिती कोणीतरी एकजण करतो तर शिकविणारा त्याच्यापेक्षा वेगळाच कोणीतरी असतो. जो प्रश्नपत्रिका तयार करतो त्याला, मुले, त्यांची पार्श्वभूमी व आत्तापर्यंत त्यांनी काय केले आहे ती काय शिकली आहेत यापैकी काहीच माहिती नसते.

**तुमची प्रगती तपासा 1**

1) सध्याच्या मूल्यमापन प्रक्रियेत खालीलपैकी कोणती अवस्था विद्यार्थ्यांसाठी शक्य नाही?
   a) ताणाची अवस्था
   b) असुरक्षिततेची अवस्था
   c) काळजीची व अपमानाची अवस्था
   d) आनंदाची अवस्था
2) जर तुम्ही शिक्षक असता तर मयंकच्या उत्तराचे मूल्यमापन तुम्ही कसे केले असते?
   ----------------------------------------------------------------
   ----------------------------------------------------------------
   ----------------------------------------------------------------
3) तुम्हाला काय वाटते निलमला कमी गुण पडण्याची कारणे कोणती? ती योग्य आहेत का? सोदाहरण स्पष्ट करा.
   ----------------------------------------------------------------
   ----------------------------------------------------------------
   ----------------------------------------------------------------

## 10.3 मूल्यमापन कशासाठी?

मूल्यमापन हे एक साधन आहे जे शिक्षक व विद्यार्थी दोघांनाही उपयुक्त आहे. मूल्यमापनातून आपल्याला प्रत्येक मूल लक्षात घेऊन त्याची क्षमता, वय, गरज, अध्ययनाचा वेग, त्याची आत्ताची अध्ययन पातळी हे जाणून घेण्यास मदत करते व दुसऱ्या बाजूस शिक्षकाला हे कळते की प्रत्येक विद्यार्थ्याबाबत कोणत्या प्रकारची कार्यवाही करायला हवी.

मूल्यमापन हे मुलांना फक्त गुण देण्यासाठीच करायचे नसते. मूल्यमापनाचा हा हेतू कधीच नसतो की सर्वात जास्त गुण मिळविणाऱ्या पासून सर्वात कमी गुण मिळविणारा विद्यार्थी अशी श्रेणीबद्ध रचना करणे. (दुर्दैवाने असेच काहीसे घडत आहे.) मूल्यमापनाचे उद्दिष्ट हे असते की

शिक्षकाला तिच्या अध्यापनातील त्रुटी शोधून वर्गातील तिचा अध्यापनाचा पुढचा टप्पा ठरविता यावा. मूल्यमापनातून मुलाला हे समजावे व त्याने सांगावे कि पूर्वी ती जिथे होती त्यापेक्षा तिच्यात कोणता बदल झाला आहे व किती प्रगती झाली आहे. मूल्यमापनातून पालक व शिक्षक हे सांगू शकले पाहिजेत कि मुलाच्या गरजा काय आहेत आणि विद्यार्थ्यांची प्राविण्य पातळी सुधारण्यासाठी कोणत्या योजना करता येईल? सध्याचे मूल्यमापन हे विद्यार्थी उत्तीर्ण झाला कि अनुत्तीर्ण किंवा त्याने किती गुण मिळवले हे सांगण्यावरच अधिक भर देते पण त्याचा अवाका इतका मर्यादित नाही आहे. मूल्यमापनामध्ये विद्यार्थ्यांच्या संपादनाची पातळी मोजण्यापेक्षा अध्यापन-अध्ययन प्रक्रिया अधिक परिणामकारक कशी होईल यासाठी अधिक कष्ट घेतले पाहिजेत उदा. जेव्हा भाषेचा शिक्षक मूल्यमापन करेल तेव्हा त्यांनी हे पाहिले पाहिजे कि मूल किती वाचू शकते? ते किती चांगल्या प्रकारे वाचू शकते? ते ओघवतेपणाने वाचते कि घाईगडबडीने थांबत थांबत वाचते? ते जे काही ऐकते त्यापैकी किती त्याला समजते? ते किती आत्मविश्वासाने स्वत:ला प्रकट करते? ते त्याचे विचार लेखनात लिहू शकते का? त्याची शब्दसंपत्ती किती आहे व वाक्यरचनेवर त्याचे किती नियंत्रण आहे? मूल्यमापन आपल्याला अध्ययनाचा वेग व दिशा सविस्तरपणे समजून घेण्यास मदत करते. उदाहरणार्थ एखादे मूल वाचू शकत नसेल तर त्याचे कारण काय. ते काही अक्षरे ओळखू शकत नाही कि शब्द व वाक्ये ही अर्थपूर्ण घटक म्हणून जाणून घेण्याची क्षमताच त्याच्यात विकसित झालेली नाही? किंवा हे असे काही उदाहरण आहे का कि अक्षरामागे अक्षरे वाचता येतात पण अर्थ जाणून घेऊन वाचण्याची क्षमता नाही ही सर्व माहिती विद्यार्थ्याला जाणून घेण्यामध्ये आपल्याला महत्त्वाची मदत करते.

अत्तापर्यंत आपण फक्त विद्यार्थ्याची वाचन क्षमता व त्याची भाषा समजणे याविषयीच चर्चा केली आहे. आपणाला या माहितीची काळजीपूर्वक नोंद करुन ठेवली पाहिजे. मूल्यमापन करताना आपण प्रत्येक विद्यार्थ्यासाठी वर्णनात्मक शेरा दिला पाहिजे हे शेरे खूप सविस्तर असायला हवेत अशी आवश्यकता नाही पण प्रत्येक शेरा हा सुस्पष्ट असायला हवा. विद्यार्थ्याचे निरीक्षण करताना काय आढळले याचे वर्णन करणारा असा शेरा असावा.

उदा. इयत्ता पहिलीत नवीन प्रवेश घेतलेल्या बालकाबद्दल खालील शेरा हा अतिशय मर्यादित व अपुरा आहे. "जया पुस्तकात रुची दाखवते." तुमच्या शेऱ्याचा आधार हा मांडला गेलाच पाहिजे हा शेरा खालील प्रकारे ही लिहिता आला असता.

"जयाला पुस्तकांची आवड आहे. मोठ्या सुट्टीमध्ये ती पुस्तकांच्या कोपऱ्यात जाऊन पुस्तके पाहताना आढळली. नंतर तिने एक पुस्तक उचलले व त्यातील एक एका चित्रांचे खूपवेळ निरीक्षण करताना आढळली. ते प्राण्यांवरील पुस्तक होते."

हे वर्णन बालकाचे वर्तन दाखवते आणि प्रत्यक्ष काय घडले होते याचे वर्णन करते. हे फक्त मतप्रदर्शन राहात नाही. जेव्हा 2 ते 4 महिन्यांच्या कालावधीत बालकाबाबतच्या अशा 7/8 शेऱ्यांची नोंद तुम्ही करता तेव्हा तुम्हाला त्या बालकाच्या भाषा अध्ययनातील क्षमता थोड्या सविस्तरपणे माहीत होतील. शेरे असे असावेत कि अध्ययन-अध्यापन प्रक्रियेतून मूल काय शिकत आहे हे स्पष्ट झाले पाहिजे. असे शेरे आपल्याला परिस्थितीची सत्यता दाखवून पुढील मार्ग दाखवतात. उदा. आपल्याला वाचन शिकताना येणाऱ्या अडचणी माहित झाल्या आहेत आणि आता आपल्याला त्यावर उत्तर शोधायचे आहे आता त्या मुलाला वाचन शिकविताना आपल्याला काही कृतींची तयारी करायला हवी तसेच काही अभ्यासही द्यायला हवेत किंवा दुसऱ्या काही पद्धती वापरून त्याला वाचन सुधारण्यात मदत करायला हवी. मूल्यमापन करताना आपण त्या बालकाचे सादरीकरण हे फक्त त्याच्याच आधीच्या कामगिरीशी तुलना करून ठरवायला हवे. दुसऱ्या कोणत्याही मुलाच्या कामगिरीशी किंवा प्रगतीशी त्याची तुलना करणे उपयुक्त ठरणार नाही. प्रत्येक मुलाची अध्ययनाची एक गती असते आणि त्याला अध्ययनासाठी लागणारा वेळ हा दुसऱ्यापेक्षा भिन्न असतो. उदाहरणार्थ

आपल्याला हे माहित आहे कि काही मुले वाचायला, समजून घ्यायला आणि बोलायला सहजपणे शिकतात पण अवघड संकल्पना खूप उशिराने शिकतात. आपण मुलांची गरज ओळखून सर्वच विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली पाहिजे फक्त जे पटकन शिकतात त्यांनाच फक्त प्रेरीत करणे योग्य नाही हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. मूल्यमापन ही एकाच झटक्यात होणारी किंवा दर तीन महिन्याने हाती घेण्याची प्रक्रिया नाही तर ती आजीवन चालणारी प्रक्रिया आहे.

**तुमची प्रगती तपासा 2**

1) मूल्यमापन करताना आपण कोणती गोष्ट लक्षात ठेवलीच पाहिजे.

   एका विधानासमोर बरोबरची खूण (✓) करा.

   a) मुलीच्या प्रगतीची तुलना तिच्या मागील वर्षीच्या अध्ययन पातळीशी करणे.

   b) एका मुलाच्या प्रगतीची तुलना अन्य मुलांशी करणे.

   c) एका मुलाच्या प्रगतीची तुलना जी मुले लवकर शिकतात व जास्त शिकतात त्यांच्याशी नको.

   d) मुलाच्या प्रगतीची तुलना जे मुल लवकर संभाषण शकते त्याच्याशी करणे.

2) मूल्यमापनाची प्रक्रिया विद्यार्थीकेंद्रित का असली पाहिजे? या प्रकारच्या प्रक्रियेचे लाभ कोणते?

3) अध्यापन–अध्ययन प्रक्रियेशी मूल्यमापन कसे जोडले गेले आहे? यावर तुमचे विचार लिहा.

4) तुम्ही मुलाच्या वाचनाच्या क्षमतेवरील शेरे वाचले आहेत. आता त्याच प्रमाणे तुम्ही निरीक्षण केलेल्या बालकाच्या लेखनाची क्षमता वर्णन करणारा शेरा लिहा. तुमच्या शेऱ्याच्या आधाराबाबत स्पष्टीकरण करा.

## 10.4 भाषा मूल्यमापनातील मुद्दे

अचूक शब्दाचे अचूक व्याकरणासह व अचूक वाचन व विरामचिन्हांसह लेखन करणे याला 'शुद्ध व अचूक भाषा' असे म्हटले जाते. दुसरीकडे ज्या क्षमता बालकाला बोलणे, वाचणे व लिहीणे याचा सुखद अनुभव देतात तसेच त्यांना व्यक्त होण्यास संधी मिळते त्यालाच ओघवतेपणा म्हणता येते. या मध्ये जास्त भर हा बालकाने काय जाणले यावर आहे आणि त्याने व्याकरणाच्या किती चुका केल्या यावर नाही.

प्राथमिक स्तरावरील मूल्यमापन करताना या ओघवतेपणावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. बिनचुकपणा व शुद्धता या गोष्टी नंतर येऊ शकतात. प्राथमिक स्तरानंतर आपण शुद्धता व ओघवतेपणा यांचा समतोल सांभाळू शकतो आणि दोन्ही बाबींकडे लक्ष देऊ शकतो.

आपल्याला विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या भाषिक क्षमता कोणत्या स्तरापर्यंत प्राप्त केल्या हे मूल्यमापनातून माहीत व्हायला हवे असते. मूल्यमापन सुरु करण्यापूर्वी परीक्षकाने हे लक्षात घेतले पाहिजे की अध्ययन कर्त्याला विविध प्रकारच्या व सराव करण्याच्या संधी उपलब्ध करून दिल्या

आहेत ना. अध्ययन कर्त्याला अशा संधी मिळाल्या नसतील तर त्याचे केले गेलेले मूल्यमापन निरर्थक ठरते. या घटकात आपण या क्षमतांचे लहान लहान मुद्यांमध्ये विभाजन करून त्यांचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न करणार आहोत या कल्पना तुम्हाला समजाव्यात म्हणून असे केले जाणार आहे. आपण जर कृतींच्या माध्यमातून मूल्यमापन केले तर प्रत्येक कौशल्यासाठी वेगळी कृती रचना करण्याची गरज राहणार नाही. आपण एक अशी कृती घेऊ शकतो जिच्या द्वारे आपण तीन, चार किंवा त्यापेक्षा अधिक क्षमतांचे मापन करू शकतो. महत्त्वाच्या क्षमतांचा आपण मूल्यमापनात समावेश करू शकतो.

### 10.4.1 श्रवण व भाषण

विद्यार्थी चित्राचे वर्णन करु शकतात. ते मोकळेपणाने स्वत:ला व्यक्त करतात व जे ऐकले आहे त्यावर आपली मते मांडू शकतात. ते श्रवण अनुभव संवाद, व्याख्यान किंवा चर्चा असे असू शकतात. माहिती मिळवण्यासाठी विचारलेल्या प्रश्नांवर ते अचूक शब्दात व पूर्ण वाक्यात उत्तरे देऊ शकतात. त्यांना माहित असलेल्या गोष्टींबद्दल, लोकांबद्दल व घटनांबद्दल ते बोलू शकतात.

### 10.4.2 वाचन व आकलन

यातील मुख्य मुद्दा वाचन हे समजून उमजून होणे हा आहे मग तो एखादा स्वतंत्र शब्द असो कि पूर्ण वाक्य. वाचन हे खोलवर ठसण्यासाठी संदर्भपूर्ण असले पाहिजे. आपण सुरवातीला ठाऊक असलेले शब्द ओळखण्याची क्षमता तसेच शब्द समजून घेऊन वाचनाची क्षमता यांचे मूल्यमापन करू शकतो. नंतर बालक चित्राबरोबर लिहिलेले शब्द व वाक्ये वाचू शकले पाहिजे. त्यानंतर गोष्टींचे वाचन व वाचलेल्या साहित्यातील मुख्य मुद्दे सांगता आले पाहिजेत. त्याला/तिला चित्रात शब्द दाखविता आले पाहिजेत व त्यानुसार त्या संदर्भात वाचन करता आले पाहिजे.

### 10.4.3 लेखन

लेखन कार्य तपासताना अध्ययनकर्ता अक्षरे व शब्द लिहू शकतो आहे का ते पहा. नंतर त्याना पुस्तकात न पहाता अक्षरे व शब्द लिहिण्यास सांगून ती तपासा त्यानंतर त्यांनी वाचलेले किंवा बोललेल्या प्रश्नांची उत्तरे किंवा एका वाक्यात लिहायला सांगून ती तपासा. नंतरची पायरी ही असेल कि ते दोन ते तीन वाक्यात वर्णन लिहू शकतील किंवा तोंडी सांगितलेले अपरिचित शब्द लिहू शकतील.

### 10.4.4 प्रकटन

यामध्ये अध्ययनकर्ता त्याने/तिने पाहिलेल्या वस्तू किंवा प्रसंगांची चित्रे काढू शकला पाहिजे व त्यानंतर त्याने स्वत:च्या कल्पनेने चित्रे काढणे अपेक्षित आहे. तसेच त्याला/तिला कविता, कथा किंवा प्रसंग यांचा अभिनय करता आला पाहिजे. त्याला/तिला माती किंवा अन्य वस्तुंच्या सहाय्याने वस्तू बनविण्यास सांगून त्याचे मूल्यमापन केले पाहिजे. त्यांना गोष्टी रचायला सांगून किंवा गोष्टींचा विस्तार करायला सांगूनही आपण त्यांच्या अभिव्यक्तीचे मूल्यमापन करू शकतो.

**तुमची प्रगती तपासा 3**

1) ओघवतेपणा म्हणजे काय?

   a) वाक्य अचुकपणे उच्चारणे.

   b) अचुकपणे लिहिणे.

   c) स्वत:ला आनंदाने व्यक्त करण्यासाठी बोलणे, वाचणे आणि लिहिणे.

   d) व्याकरणाचे नियम स्पष्ट करणे.

2) बालक अर्थ समजून घेऊन वाचतो का त्याचे मूल्यमापन करण्यासाठी कोणत्या कृती वापरता येतील?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

3) बोलण्याची व ऐकण्याची क्षमता यांचे मूल्यमापन करताना तुम्ही कोणत्या गोष्टी लक्षात घ्याल?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

## 10.5 भाषा अध्ययनातील मूल्यमापनाच्या पद्धती

भाषिक मूल्यमापन प्रामुख्याने शक्यतो लेखी आणि तोंडी परीक्षांवर आधारित असते. प्रश्नपत्रिका ही पाठ्यपुस्तकावर तयार केली जाते व त्यात ही भाषेच्या आकलनाची क्षमता तपासण्यापेक्षा स्मरणावर आधारित प्रश्न विचारले जातात. मूल्यमापनाच्या नव्या पद्धतीमध्ये तोंडी अभिव्यक्ती, कल्पनाशक्ती, निरीक्षण इ. सर्व घटकांचा समावेश व्हायला हवा. **राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005** मध्ये सुद्धा मूल्यमापन पद्धतीत बदल करण्याची गरज आहे यावर भर दिला आहे. भाषेच्या मूल्यमापनाच्या संदर्भात पुढील काही मूल्यमापन पद्धती वापरणे शक्य आहे.

### 10.5.1 तोंडी परीक्षा

ही दोन्ही प्रकारची औपचारिक व अनौपचारिक अशी असावी. विद्यार्थ्यांशी विविध विषयांवर बोलणे, प्रश्न विचारणे, गटचर्चांचे आयोजन करणे, विद्यार्थ्यांना अभिनय किंवा मूक अभिनय करायला लावणे या गोष्टीही अध्यापन–अध्ययन प्रक्रियेच्या घटक झाल्या पाहिजेत. यांच्या माध्यमातून ही भाषिक क्षमतांचे मूल्यमापन करता येते. खाली काही औपचारिक कृती दिल्या आहेत. त्यांचे वर्गात व्यवस्थापन करता येईल.

**प्रश्नोत्तर सत्र :**

या मध्ये मुलांना प्रश्न विचारता येतील. सुरवातीला अशा स्वरूपाचे प्रश्न विचारावेत ज्यामध्ये सर्व विद्यार्थ्यांना उत्तरे देता येतील हे प्रश्न त्यांच्या सभोवतीची परिस्थिती, त्यांचे दैनंदिन जीवन, त्यांचे अनुभव, त्यांच्या गरजा यांच्या संदर्भातील असावेत. या सत्राने शिक्षकाने परीक्षक म्हणून विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पना साकारण्याच्या विपुल संधी प्राप्त करून दिल्या पाहिजेत. अर्थातच शिक्षक हा चांगले प्रश्न निर्माण करण्याची क्षमता व कला साध्य झालेला असायला हवा. या प्रश्नोत्तर सत्राद्वारे विद्यार्थ्यांची शब्दसंपत्ती, उच्चारण आणि वाक्यरचना या क्षमता तपासता येतील.

**कथा कथन :**

मुलांनी वाचलेली किंवा ऐकलेली गोष्ट त्याच्या स्वत:च्या शब्दात सांगणे व मूल्यमापनाचा महत्त्वाचा प्रकार होऊ शकेल. काही वेळा त्याने स्वत: रचलेली गोष्ट सुद्धा तो सांगू शकेल. आपणे हे उद्दिष्ट सुद्धा लक्षात घेतले पाहिजे त्याचबरोबर विद्यार्थ्याचे हावभाव ही मूल्यमापन करताना लक्षात घेतले पाहिजेत. या बरोबरच कथेचे सादरीकरण आणि त्यातील प्रसंगांची योग्य क्रमवारी याचे ही मूल्यमापन केले पाहिजे.

**प्रकट वाचन :**

प्रकट वाचनाची क्षमता तपासताना उच्चारण, अर्थानुसार स्वरातील चढउतार, विशिष्ट शब्दोच्चारावर योग्य तो आघात देऊन त्यातून त्या शब्दाचा अचूक अर्थ स्पष्ट करणे यांचे मूल्यमापन

करता येईल. प्रकट वाचनासाठी पाठ्यपुस्तकात समाविष्ट असलेल्या विविध भावनांचे प्रकटीकरण करणारे उतारे, लहान किंवा मोठ्या संभाषणाचे भाग, नाटकाचा अंश किंवा इतर पाठ्यपुस्तकातील अंश प्रकट वाचन परीक्षणासाठी निवडता येतील. वाचत असताना मूल योग्य उच्चारण करत नसेल, तसेच प्रश्नचिन्ह, उद्गारवाचक चिन्ह लक्षात घेऊन वाक्यातील भावना व्यक्त करणारे स्वराघात करीत नसेल तरी त्याला मधेच थांबवू नये. यामुळे विद्यार्थ्यात भिती किंवा नावड उत्पन्न होऊ शकते. मुलाला अचूक उच्चारण व बरोबर वाचन कसे शिकवायचे हे तुम्ही ठरवू शकता.

### पाहिलेल्या, ऐकलेल्या किंवा वाचलेल्या गोष्टींचे वर्णन

भाषिक क्षमता तपासताना वर्णन करणे हा ही महत्त्वाचा दृष्टीकोन आहे. सुरवातीला प्राथमिक वर्गांसाठी विद्यार्थ्याला एखादी वस्तू दाखवून, चित्र दाखवून, किंवा एखादी ओळखीची कृती दाखवून त्या संदर्भात वर्णन करण्यास सांगता येते. अगदी प्रारंभीच्या स्तरावर वर्णन हे एका वाक्याने सुद्धा सुरू करता येऊ शकते.

**तुमची प्रगती तपासा 4**

1) जर मुलाला योग्य उच्चार करता येत नसेल किंवा प्रश्नचिन्ह, उद्गारवाचक चिन्ह यातून योग्य भाव व्यक्त करता येत नसतील तर शिक्षकाने काय करावे?
   a) लगेचच त्याला थांबवावे.
   b) त्याचे उच्चारण सुधारावे.
   c) तोच शब्द किंवा आवाजातील चढउतार अनेक वेळा करुन घ्यावा.
   d) लगेचच थांबवू नये.
2) प्रश्नोत्तर सत्रातील प्रश्नांचे स्वरूप कसे असावे?
   ------------------------------------------------------------------
   ------------------------------------------------------------------
   ------------------------------------------------------------------
3) खाली दिलेले चित्र खेळाच्या मैदानाचे आहे. या चित्राकडे पाहून इ. 2री व इयत्ता 5 वीतील मुले काय लिहितील?
   ------------------------------------------------------------------
   ------------------------------------------------------------------
   ------------------------------------------------------------------

### 10.5.2 निरीक्षण

जेव्हा तुम्ही वर्गात शिकवत असता तेव्हा विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रियांचे अनौपचारिकपणे निरीक्षण ही करत असता. या निरीक्षणांची नोंदणी केली गेली पाहिजे. ही नोंदणी तुम्हाला विद्यार्थ्यांच्या मुक्त प्रतिक्रियांद्वारे भाषिक क्षमता तपासण्याची संधी उपलब्ध करुन देईल. यामध्ये विद्यार्थ्यांना गुण किंवा श्रेणी देण्यापेक्षा आपण तीन किंवा पाच बिंदूची पदनिश्चयन श्रेणी वापरू शकतो. ते कोष्टक खालील स्वरूपानुसार असेल.

| वर्णन | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
|---|---|---|---|---|---|
| **शब्द ज्ञान** | | ✓ | | | |
| **ओघवतेपणा** | | | | ✓ | |
| **वाक्यरचना** | | | ✓ | | |
| **हावभाव** | | | | | ✓ |

या कोष्टकातील 5 म्हणजे उत्कृष्ट सादरीकरण, 3 म्हणजे साधारण व दोन किंवा त्याहून कमी अंक हे दाखवितात की मुलाला ती क्षमता प्राप्त करण्यासाठी अधिक संधी मिळण्याची आवश्यकता आहे.

## 10.5.3 लेखी परीक्षा

अशा प्रकारच्या परीक्षेत प्रश्नपत्रिकेवर लक्ष केंद्रित करणे फार महत्त्वाचे असते. प्रश्नपत्रिका अशी असावी की ज्यातून वाचलेले समजून घेणे, कल्पना आणि सृजनशीलता, मुक्त प्रतिक्रिया, मत ठासून मांडण्याची क्षमता, सुवाच्य लेखन, तुलना करण्याची क्षमता, फरक जाणण्याची क्षमता इ. भाषिक क्षमतांचे मूल्यमापन शक्य झाले पाहिजे. प्रश्नपत्रिकेने स्मरणाखेरीज इतरही क्षमता तपासता आल्याच पाहिजेत याच बरोबर टीकात्मक प्रतिक्रिया देण्याची क्षमता ही तपासता आली पाहिजे. प्रश्नांद्वारे विद्यार्थ्याला त्याचे अनुभव व्यक्त करण्याची संधी मिळाली पाहिजे प्रश्न असे असावेत की ज्यातून त्याची विश्लेषण क्षमतेचा विकास होईल. विद्यार्थ्यांची उत्तरे त्यांच्या शब्दात असावीत. पुस्तकातील किंवा शिक्षकाने लिहून दिल्याप्रमाणे भाषा असावी असा आग्रह धरू नये.

**अनुलेखन :**

भाषिक क्षमता तपासण्यासाठीचे साधन म्हणून अनुलेखनाचाही उपयोग करता येतो. बोललेले ऐकण्याची क्षमता तपासण्यासाठी ही महत्त्वपूर्ण पद्धती आहे. परंतु अनुलेखनाचा साधन म्हणून वापर करण्यासाठी ते नेहमीच्या अनुलेखनापेक्षा वेगळे असले असले पाहिजे. सध्या अनुलेखनाकडे विद्यार्थ्यांची भाषिक क्षमता तपासण्याची परीक्षा म्हणून पाहिले जात नाही पण भाषा अध्ययनाचे साधन म्हणून पाहिले जाते अनुलेखनाद्वारे विद्यार्थ्याची ऐकून आकलन होण्याची क्षमता आणि लेखन क्षमता तपासून या क्षमतांचा योग्य विकास आराखडा करता यावा व तो विद्यार्थ्याने प्राप्त केलेल्या पातळीवर आधारित आराखडा बनविता यावा यासाठी मदत मिळते.

इयत्ता 3 रीपासून सरावाचे साधन म्हणून सुद्धा अनुलेखन वापरता येईल. अनुलेखनासाठी परिच्छेद निवडताना खूपच काळजी घेतली पाहिजे. परिच्छेद निवडताना तो परिपूर्ण व विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अर्थपूर्ण असावा. तो विद्यार्थ्यांच्या पातळीपेक्षा एक पातळी वरची असलेला आणि संदर्भाने अर्थपूर्ण असावा. यामुळे आपणास वर्गात येण्याआधी मुलाने स्वत: होऊन काय शिकले आहे त्याचे मूल्यमापन करता येते.

अनुलेखन देण्याची सर्व प्रक्रिया ही योग्य प्रकारे नियोजन केलेली असावी व निश्चित कालावधी ठरवून त्यानुसार घेतली जावी. ही प्रक्रिया खालील टप्प्यांनुसार विभागलेली असावी.

**पायरी क्र. 1 :** शिक्षकाने निवडलेला उतारा समान ओघवतेपणाने, आवाजातील योग्य चढउतारांसह, आणि हावभावासह सामान्य गतीनेच वाचला पाहिजे. यावेळी विद्यार्थ्यांनी हे वाचन लिहिण्यापेक्षा फक्त ऐकले पाहिजे. यामुळे परिच्छेदातील विषय त्यांना समजेल व बौद्धिक दृष्ट्या पुढील कृतीसाठी तयार असतील.

**पायरी क्र. 2 :** वरील पद्धतीने वाचन केल्यानंतर शिक्षकाने तो परिच्छेद आता थोडा सावकाश वाचावा ज्यायोगे मुलांना लिहिणे सोपे वाटेल.

**पायरी क्र. 3 :** शिक्षकांनी तो परीच्छेद पुन्हा सावकाश वाचावा. याच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना त्यांनी केलेल्या चुका दुरुस्त करता येतील तसेच काही जागा सुटल्या असतील तर ती रिकामी जागा भरण्यासाठी या वाचनाची मदत मिळू शकेल.

प्रत्येक वाचन हे 6 ते 8 मिनिटांच्या अवधीनंतर करावे.

अशा प्रकारच्या अनुलेखनातून अध्ययनकर्त्याला आपल्या चुका ओळखून दुरुस्त करता येतात. यामुळे अध्ययनकर्त्याला त्याच्या निर्णयक्षमतेनुसार शिकण्याची व स्वत:च्या चुकांमधून शिकण्याची मदत मिळते. विद्यार्थ्याने त्याच्या/तिच्या स्वत:च्या वहीत केलेल्या दुरुस्त्यांमधून

शिक्षकाला त्याच्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या अध्ययनाची पातळी समजण्यास मदत होते. शिक्षक जेव्हा अनुलेखन तपासून दुरुस्त करतील तेव्हा विद्यार्थ्यांकडून होणाऱ्या मुख्य चुका त्यांच्या लक्षात येतील व पुढील अनुलेखनाच्या नियोजनासाठी त्यांचा उपयोग त्यांना होईल. म्हणून जर आपण अनुलेखनाचा योग्य प्रकारे उपयोग केला तर त्यातून फक्त विद्यार्थ्याचे अध्ययनच घडणार नाही तर शिक्षकाला ही विद्यार्थ्याची अध्ययन पातळी तपासण्यासाठी व त्या संदर्भात पुढील योजना ठरविण्यासाठी सहाय्य मिळते.

**तुमची प्रगती तपासा 5**

1) श्रवण व संभाषणाचे मूल्यमापन करण्याचा योग्य मार्ग म्हणजे –
   a) बोलणे
   b) ऐकणे
   c) बोलणे व ऐकणे
   d) अनुलेखन
2) मौखिक परीक्षेतून (तोंडी परीक्षेतून) विद्यार्थ्याच्या कोणत्या क्षमता तपासता येतात?
3) शिक्षिका तिच्या मैत्रिणीशी बोलताना म्हणते, "विद्यार्थ्याने जे लिहिले आहे ते अगदी बरोबर आहे पण मी जसे दिले होते त्या शब्दात त्याने लिहिलेले नाही. मी काय करु त्याचे गुण कमी करु कां?" अशा शिक्षिकेला तुम्ही काय सांगाल ?
4) 'अनुलेखन' देताना त्या बद्दल तुम्ही नवीन काही शिकलात कां? चर्चा करा.

## 10.6 गद्य, पद्य व नाटकाच्या मूल्यमापनासाठी उपक्रम

आपण आत्तापर्यंत क्षमतांच्या मूल्यमापनासंदर्भात चर्चा केली आहे. आपण आता गद्य, पद्य व नाटकाची उदाहरणे पाहू. यासाठी कशाप्रकारचे तोंडी व लेखी प्रश्न तयार करावेत व कोणत्या प्रकारचे उपक्रम घेऊन याचे मूल्यमापन करावे यासाठी खालील काही उदाहरणे पाहू.

### 10.6.1 परीच्छेद

**गाळलेल्या जागा भरण्याची परीक्षा :**

ही परीक्षा विद्यार्थ्याचे भाषेतील प्राविण्य तपासण्यासाठी चांगली पद्धती आहे सर्व प्रकारच्या भाषिक क्षमतांमधील विद्यार्थ्याची प्राविण्य पातळी तपासण्यासाठी आपण या परीक्षेचा उपयोग करू शकतो. यामध्ये मुलांना असे वाक्य दिले जाते कि ज्यात थोड्या थोड्या अंतरावर तेथील शब्द गाळून रिकाम्या जागा ठेवलेल्या असतात.

**गाळलेल्या जागा तयार करण्याची पद्धत:**

यासाठी निवडलेला परिच्छेद हा सुस्पष्ट संदर्भ असलेला आणि अर्थाच्या दृष्टीने परिपूर्ण असावा. निवडलेला पाठ्यांश हा रुचीपूर्ण व आव्हानात्मक असावा. परिच्छेदाची पहिली ओळ आहे

तशीच लिहावी. आणि दुसऱ्या ओळीपासून प्रत्येक ओळीतील पाचवा/सहावा/नववा शब्द गाळावा. परिच्छेदाची शेवटची ओळ पूर्ण लिहावी. प्रत्येक अशा पेपरात कमीत कमी 20 शब्द गाळलेले असावेत.शब्द गाळण्याचा दुसरा मार्ग म्हणजे तो शब्द विशिष्ट प्रकारचा असावा. उदा. फक्त काही क्रियापदे, नामे, सर्वनामे किंवा विशेषणे इ. असे शब्द गाळून अधिक सुधारलेली परीक्षा बनविता येईल. अशा प्रकारची प्रश्नपत्रिका/प्रश्न आपणास विद्यार्थ्यांच्या त्या विशिष्ट शब्दप्रकारासंबंधीच्या क्षमतांबाबत अनुमान करण्यासाठी उपयुक्त ठरतात आणि त्यानुसार आपणास अध्यापनाचे धोरण ठरविता येते.

विद्यार्थ्यांना अशी सूचना दिली पाहिजे कि विद्यार्थ्यांनी तो परिच्छेद दोन/तीन वेळा काळजीपूर्वक वाचलाच पाहिजे व त्यानंतर जागा भरण्यास सुरवात करावी.

त्यांना असे ही सांगावे कि गाळलेल्या जागी फक्त एकच शब्द लिहावयाचा आहे ही परीक्षा इयत्ता 3 पासून सुरू करावी. शिक्षकांनी याचा बऱ्याच वेळा सराव विद्यार्थ्यांकडून करून घ्यावा आणि नंतर हळूहळू ती अधिकाधिक कठीण करावी.

ही चाचणी तपासण्याचे दोन मार्ग आहेत, पहिला म्हणजे त्याच रिकाम्या जागांना गुण द्यावेत जिथे पुस्तकातील अचूक शब्द लिहिले आहेत.

दुसरा मार्ग म्हणजे रिकाम्या जागी पुस्तकात जे शब्द आहेत त्याच्या समान अर्थाचे शब्द भरले आहेत त्यांना गुण द्यावेत. या प्रश्नाचे उदाहरण पुढे दिले आहे.

A tortoise in the pond and a fox in nearby den were good friends. Once when they were chatting about this and that about pond, a leopard arrived on the scene. The fox fled in panic. The tortoise, poor thing, couldn't move fast enough to hide or escape. With one leap, the leopard grabbed him with his mouth and settled down under a tree to make a meal of him. But neither his teeth nor his claws could make a dent in the hard shell of the tortoise. The fox was watching the leopard struggle from his den and thought of a way to save the tortoise. So he came out, approached the leopard, all courtesy and innocence, and said, "I know an easy way to crack the shell of that tortoise. Just throw him into the water. He will soak in it and the water will soften the shell in a few minutes. Try it."

The foolish leopard said, "Never thought of it. What a good idea." and threw the tortoise into the pond. What more could the tortoise have wished for?

**Cloze Test**

A tortoise in the pond and a fox in nearby den were good friends. Once when they were chatting about (1) .......... and that about pond, a (2) ......... arrived on the scene. The fox (3) ...... in panic. The tortoise, poor thing, (4) .......... move fast enough to hide or (5) ........... With one leap, the leopard grabbed (6) ........ with his mouth and settled down (7) .......... a tree to make a meal (8) .......... him. But neither his teeth nor (9) ........ claws could make a dent in (10) ....... hard shell of the tortoise. The (11) ....... was watching the leopard struggle from (12) ...... den and thought of a way (13) ......... save the tortoise. So he came (14) ......., approached the leopard, all courtesy and (15) ........., and said, "I know an easy (16) .......... to crack the shell of that (17) ............ Just throw him into the water. (18) ....... will soak in it and the (19) ....... will soften the shell in a (20) ........ minutes. Try it."

The foolish leopard (21) ........, "Never thought of it. What a (22) ............ idea." and threw the tortoise into (23) ....... pond. What more could the tortoise have wished for?

**परिच्छेदाचे मूल्यमापन करण्यासाठीचे उपक्रम :**

- गोष्ट तुमच्या स्वत:च्या शब्दात लिहा. (मातृभाषा/घरातील भाषा)

Notes



- गोष्टीला शीर्षक सुचवा.
- हा उपक्रम घेताना शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी बोलले पाहिजे व त्यांना विचारले पाहिजे कि हेच शीर्षक त्यांनी का निवडले, आणि कोणते शीर्षक अधिक योग्य आहे.
- प्रश्न तयार करणे

  हा उपक्रम गटात किंवा वैयक्तिकरित्या ही घेता येईल जर हे काम गटात दिले तर एका गटाने तयार केलेले प्रश्न विचारावेत व दुसऱ्या गटाने उत्तरे द्यावीत. या प्रश्नपत्रिकेवर खालीलप्रमाणे प्रश्न विचारता येतील:

1) Why did the fox flee in panic ?
2) Why did the fox suggest that the tortoise should be thrown in water ?
3) Why did the leopard grab the tortoise ?
4) Why is the leopard in the text called foolish ?
5) Write the full conversation between leopard and the fox in your own words.
6) Identify the idioms and proverbs in the story adn use them in new sentences.
7) Change the story into conversation.

विद्यार्थ्यांना गोष्टीत आढळणाऱ्या वेगवेगळ्या दृष्यांबद्दलही लिहायला सांगता येईल हे गटात करून घेता येईल.

## 10.6.2 कविता

**Special Friend**

Up and down and all around,
There's my shadow on the ground.
Doing everything I do,
Instead of one, he makes me two.
When I run along the **beach**,
There he is **within** my **reach**.
When I build **sand castles** fine,
There are his, right next ot mine.
When I climb high in a tree,
Still he tries to follow me.
But I lose hime in the **shade**,
Can it be that he's **afraid**?

– May Pynchon


1) या कवितेचे मूल्यमापन खालील प्रश्नांच्या आधारे करता येईल.
   1) Who is Rajesh's Special friend ?
   2) Where is Rajesh's friend during the night ?
   3) Do you have such a friend ?
   4) Does your shadow do what you do ?
2) बरोबर उत्तराला ✓ ही खूण करा.
   1) Rajesh's shadow forms when ..................
      a) rain falls on him    b) light falls on him
      b) it is dark    d) it is shade
   2) He loses his shadow when he is .......................
      a) on the branch    b) in the field
      c) in the garden    d) in the shade




Notes

3) वर्गात अभिनय करा.
   a) To climb is to try to go up or ascend. How would you enact climbing ?
   b) Enact how shadow would behave when there is a moving light.
4) What are the words used in the poem to describe
   What the Shadow does ?
5) Shadow Activities.
   Do you know how shadow formed ?
   (तुम्हाला माहीत आहे कां सावली कशी बनते?)
   जेव्हा एखाद्या वस्तूमुळे प्रकाश अडवला जातो तेंव्हा सावली तयार होते.
   तुम्ही हे करुन पाहू शकता.
   1) अंधाऱ्या खोलीत भिंतीसमोर उभे रहा.
   2) कुणाला तरी तुमच्यावर बॅटरीने प्रकाश झोत टाकायला सांगा.
   3) तुमची सावली भिंतीवर पडलेली दिसेल.
   4) आता तुमचे हात वापरून काही मजेदार सावल्या तयार करा.

   a)



   b) तुमची सावली कशी दिसते ते तुम्हाला जाणून घ्यायचे आहे का?
      ठीक आहे. तुम्ही तुमची स्वतःची सावली काढा.
      1) एक कोरा कागद घेऊन तो भिंतीला चिकटवा.
      2) भिंतीसमोर उभे रहा.
      3) कोणाला तरी तुमच्यावर प्रकाशझोत टाकायला सांगा.
      4) दुसऱ्या व्यक्तीला तुमच्या सावलीची बाह्यरेषा (कोऱ्या कागदावर पडलेल्या) काढायला सांगा.



Notes

### 10.6.3 नाटक

आपण नाटकाची संहिता लिहू शकतो तसेच अभिनय ही करू शकतो. अध्ययन कर्त्याने लिहिलेल्या संहितेला कोणती श्रेणी द्यायची हे तिने/त्याने लिहिलेल्या संवादातून त्याला जे व्यक्त करायचे आहे ते प्रकट होते आहे का यावर अवलंबून आहे. आपल्याला पुढील गोष्टी जाणून घेण्याची गरज आहे. अध्ययनकर्ता त्याच्या/तिच्या कल्पना स्पष्ट करू शकला/शकली आहे का? नाटकाच्या पुस्तकात वापरलेल्या शब्दांखेरीज दुसरे (समानार्थी) शब्द तो/ती वापरू शकतो/शकते का? संवाद सोपे आहेत कां? संहिता रुचीपूर्ण आहे कां? हे नाटकाच्या मूल्यमापनासाठी लक्षात घेण्याचे मुद्दे आहेत.

**RAMA, THE SINGER**

| | | |
|---|---|---|
| CHARACTERS : | a) | Rama, the singer |
| | b) | Madhu, Rama's wife |
| | c) | Neighbours |

| | | |
|---|---|---|
| **Rama** | **:** | (Sit with the harmonium and practices singing)<br>Do, Re, Me, Fa, So, La, Te, Do |
| **1st Neighbour** | **:** | (to Rama's wife) Madhu, ask your husband to stop singing. It gives me a headache. |
| **2nd Neighbour** | **:** | He thinks himself to be a good singer but he's awful. |
| **3rd Neighbour** | **:** | He hardly sings. He croaks like a frog. |
| **4th Neighbour** | **:** | He's indeed disgusting.<br>(Neighbours go out) |
| **Rama** | **:** | (Continues singing) Doe, a deer, A female deer<br>Ray – A Drop of golden sun<br>Me – A name I call myself ..... |
| **1st Neighbour** | **:** | All our requests have fallen on deaf ears. |
| **2nd Neighbour** | **:** | We'll have to teach him a lesson. |
| **3rd Neighbour** | **:** | He's as stubborn as a mule. |
| **4th Neighbour** | **:** | (Throws a shoe at him) |
| **Rama** | **:** | No one in this village admires my talent. |
| **Madhu** | **:** | (Comes from the kitchen) Don't worry. You keep on singing. That person will throw the second shoe also and we will have a pair of shoes. |

1) What other title would you like to give to this play?
2) Which character do you admire most in this play? Why?
3) (a) What is the name of Rama's wife?
   (b) Does Madhu enjoy Rama's singing?
4) The 4th neighbour throws a shoe at Rama. Suppose it falls on his face. What would happen next? Complete the play in the same form (dialogue form) as given above.
5) Write conversation between you and your friend about playing some game together.
6) Write a paragraph on something or someone that disturbs you in your day–to–day life. Describe how you would tackle the problem peacefully.
7) Enact the play in groups.

**CLEVER BHOLA**

| | | |
|---|---|---|
| **Characters** | : | Bhola, the villager<br>Bhola's wife – Divya<br>Bhola's child<br>Dabbu, the robber. |
| **Narrator** | : | One day Bhola was going to a nearby village. He had to cross a dense jungle. Suddenly a voice stopped him. |
| **Dabbu** | : | Stop. Stop I said. If you move I will shoot you. |
| **Divya** | : | We are poor people. We have nothing with us. |
| **Dabbu** | : | Nonsense! Everyone says so. Give me whatever you have or I will kill you all. |
| **Bhola** | : | No. No. Leave us all. I will give you my wallet. |
| **Dabbu** | : | Ha! Ha! Ha! See how I befooled you. There are no bullets in this gun. ha ha ha ha. |
| **Bhola** | : | Ha! Ha! Ha! Ha! |
| **Dabbu** | : | Why the hell are you laughing? |
| **Bhola** | : | I also befooled you. There is no money in my wallet. |
| **Dabbu** | : | What! |
| **Bhola** | : | You thought yourself to be very smart. Ha! Ha! Ha! |

1) What other title would you like to give to this play?
2) If you were Bhola, what would you have done in the same situation?
3) (a) What was Dabbu carrying with him? Why?
   (b) Why did Divya say that they are poor people?
4) Suppose Dabbu takes out some bullets after Bhola befooled him. Complete the play in the same form. (dialogue form) as given above.
5) Write a play in story form.
6) Enact the play in groups.

**तुमची प्रगती तपासा 6**

1) अध्ययनकर्त्याची सर्व भाषिक क्षमता प्रभुत्वाचे मूल्यमापन करण्याचा मार्ग कोणता?
   (a) निबंध लेखन (b) कथालेखन
   (c) गाळलेल्या जागा भरा. (d) अनुलेखन
2) 'गाळलेल्या जागा भरा' या परीक्षेबद्दल तुम्हाला काय समजले?
   ----------------------------------------------------------------
   ----------------------------------------------------------------
   ----------------------------------------------------------------
3) 'गाळलेल्या जागा भरा' ही परीक्षा तयार करताना कोणत्या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत?
   ----------------------------------------------------------------
   ----------------------------------------------------------------
   ----------------------------------------------------------------
4) इ. 5 वीच्या पाठ्यपुस्तकातून एक परिच्छेद निवडा. त्याच्यावर गाळलेल्या जागा भरा. ही परीक्षा तयार करा आणि वर्गातील विद्यार्थ्यांच्या भाषिक क्षमतांतील त्रुटी शोधण्यासाठी ती वर्गात वापरा.
   ----------------------------------------------------------------
   ----------------------------------------------------------------
   ----------------------------------------------------------------

5) विद्यार्थ्यांना गटामध्ये नाटकातील काही भाग सादर करायला सांगा. आणि विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, प्रकटीकरण यांचे मूल्यमापन करण्यासाठी पदनिश्चयन श्रेणी तयार करा व विद्यार्थ्यांचा त्यानुसार दर्जा ठरवा.

---------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------

## 10.7 समारोप

या घटकामध्ये सध्याची मूल्यमापन प्रक्रिया बदलण्याची तसेच मूल्यमापनाचे मार्ग बदलण्याची गरज आहे हे आपण पाहिले. मूल्यमापन म्हणजे फक्त पाठ्यपुस्तकातील पाठ्यांशाचे परीक्षण नव्हे तर इतर क्षेत्रातील समज असणे ही गरजेचे आहे. त्याला गुणग्राहकता आवश्यक असते. आकलनातील बदल व क्षमतांचा विकास यांच्या मूल्यमापनाची ही आवश्यकता असते. संपूर्ण सत्राच्या काळात मूल्यमापनाची प्रक्रिया अखंड होत राहिली पाहिजे. व त्यामध्ये अनेक विभिन्न टप्पे असले पाहिजेत. मूल्यमापन प्रक्रियेची नोंद अचूकपणे केली गेली पाहिजे. विद्यार्थ्याला त्याच्या अध्ययनातील विविधतेनुसार, त्यांच्या भिन्न पार्श्वभूमीनुसार आणि भिन्न गरजांनुसार शिकण्याच्या संधी दिल्या गेल्या पाहिजेत. या घटकाबद्दल फक्त काही सूचना खाली दिल्या आहेत. तुम्ही तुमच्या अनुभवानुसार त्यात अधिक भर घालू शकाल.

1) मूल्यमापन करताना विषयज्ञानापेक्षा भाषिक क्षमतांचा विचार झाला पाहिजे.
2) प्राथमिक स्तरावर ओघवतेपणा हा अचूकतेपेक्षा प्रभावी ठरते.
3) विविध क्षमतांचे मूल्यमापन करण्यासाठी तुम्हाला अनेक वेगवेगळ्या परीक्षांची गरज नसते. एकाच उपक्रमातून अनेक क्षमतांचे मापन होऊ शकते.
4) मूल्यमापन विद्यार्थ्याला त्याच्या गरजेनुसार शिक्षण घेण्याची संधी मिळाली पाहिजे. तसेच विद्यार्थ्यांतील अध्ययनाबाबतची विविधता लक्षात घेऊन त्यानुसार मूल्यमापन झाले पाहिजे.
5) मूल्यमापन प्रक्रिया ही संपूर्ण सत्रकालावधीत सुरू असते. आणि बालकाच्या कामगिरीबाबतचे सर्व बाजूंनी मूल्यमापन यात होत असते. आपण **सातत्यपूर्ण व सर्वंकष मूल्यमापन व्यवस्था** असे जे म्हणतो ती याच प्रकारची मूल्यमापन प्रक्रिया असते.

## 10.8 सुचविलेले वाचन व संदर्भग्रंथ

1) NCERT. 2009. *Manual for Assessment*, NCERT, New Delhi.
2) NCERT. 2008. *Understanding of Reading*, NCERT, New Delhi.
3) Vidya Bhawan Society. 2009. *Kites Series. Books for Classes 1 to 8.* New Delhi: Macmillan.

## 10.9 घटकाच्या शेवटीचा अभ्यास

1) सद्यस्थितीतील मूल्यमापन पद्धतीमुळे अध्ययनकर्ता, पालक व शिक्षकांना कोणत्या अडचणींचा सामना करावा लागतो?
2) शिक्षिकेला तिच्या अध्यापनाच्या नियोजनामध्ये मूल्यमापनाची कशी मदत मिळते? स्पष्ट करा.
3) बालकाच्या प्रगतीची तुलना इतर मुलांच्या प्रगतीशी कां करू नये?

4) प्राथमिक स्तरावर तुम्ही ओघवतेपणा व अचूकता यापैकी कशावर अधिक भर द्याल? कां?
5) भाषा अध्ययनातील मूल्यमापनाचे महत्त्वाचे मुद्दे कोणते? कोणत्याही एका मुद्द्याच्या मूल्यमापन प्रक्रियेचे सविस्तर वर्णन करा.

Notes

**मूल्यमापन :**

इयत्ता 3 च्या पुस्तकातून एक उतारा व एक कविता निवडा आणि त्यांच्या मूल्यमापनासाठी प्रश्न तयार करा.